वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



6

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ६

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ६

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ६

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ११ एप्रिल २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी ‘The Mysterious Affair of Styles’ ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून

मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या पाच गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

# कथानुक्रम


- यलो आयरिस
- चोवीस काळे पक्षी
- तिसऱ्या मजल्यावरील सदनिका
- बगदाद पेटीचे गूढ
- मधमाशांचे पोळे

YELLOW IRIS

# यलो आयरिस



भिंतीत बसवलेल्या विजेच्या शेगडीकडे हर्क्युल पायरोने त्याचे पाय ताणले. त्याच्या लालसर उष्ण गजांची व्यवस्थित मांडणी बघून तो शिस्तप्रिय माणूस खूष झाला.

तो स्वतःशी बोलला, “कोळशाची आग नेहमीच आकारहीन आणि वेडीवाकडी असते. त्यात सारखेपणा काहीच नसतो.”

फोनची घंटी वाजली. पायरो उठला. उठतांना तो घड्याळाकडे बघत होता. साडेअकरा वाजायला आले होते. त्याला नवल वाटले, की यावेळी

त्याला कोण फोन करत होते. अर्थात कदाचित तो चुकीचा नंबर असू शकत होता.

विचित्र प्रकारे हसून, तो स्वतःशी पुटपुटला, “कदाचित एखाद्या वर्तमानपत्राचा मालक त्याच्या गावाकडील घराच्या वाचनालयात मृतावस्थेत सापडला असेल. त्याच्या डाव्या हातात ठिपक्यांचे रंगीत फुलांचे झाड असेल आणि पाककलेवरील पुस्तकाचे फाडलेले पान त्याच्या छातीला पिनेने जोडलेले असेल.”

स्वतःच्या या गर्विष्ठ कल्पनेवर खूष होऊन, त्याने फोन उचलला.

लगेच एका स्त्रीचा --- मृदु, घोगरा व कामाची फार घाई असलेला आवाज आला. “कोण, हर्क्युल पायरो का? कोण, हर्क्युल पायरो का?”

‘मी हर्क्युल पायरो बोलतो आहे.”

“मिस्टर पायरो, तुम्ही ताबडतोब येऊ शकता का? --- ताबडतोब --- मला धोका आहे --- खूप धोका आहे --- मला माहिती आहे ---

पायरो कडकपणे बोलला, “ तुम्ही कोण आहात? तुम्ही कुठून बोलत आहात?”

आवाज हळू झाला पण त्यात अजून जास्त तातडी असल्याचे जाणवत होते. “लगेच या --- जीवनमरणाचा प्रश्न आहे --- ताबडतोब --- जार्डीन डेस सिग्नेस --- यलो आयरिस असलेले टेबल --- “

शांतता पसरली --- विचित्र धापा --- फोन बंद झाला.

पायरोला काही कळेना. तो कोड्यात पडला. तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला, “हे काही फार उत्कंठावर्धक दिसते आहे.”

जार्डीन डेस सिग्नेसच्या दारात, जाड लुइगी [ प्रसिद्ध लढवय्या ] पुढे आला. “शुभ संध्याकाळ, मिस्टर पायरो. तुम्हाला टेबल हवे आहे का?”

“नाही. नाही, मी इथे मित्रांना शोधतो आहे. मी बघतो. कदाचित ते अजून इथे आले नसतील. ते यलो आयरिस ही फुले असलेले कोपऱ्यातले टेबल --- जाता जाता एक लहानसा प्रश्न --- जर तो विचारणे योग्य असेल तर --- इतर सर्व टेबलांवर ट्यूलिप्स आहेत --- गुलाबी ट्यूलिप्स --- फक्त एका टेबलावर यलो आयरिस फुले का आहेत?”

लुइगीने त्याचे बोलणारे खांदे शहारवले. विशेष आज्ञा! नक्कीच कुणा एका स्त्रीची आवडती फुले. ते मिस्टर बरटॉन रसेलचे टेबल आहे --- तो एक फार श्रीमंत अमेरीकन आहे.”

“लुगी, एखाद्याने बायकांच्या लहरींचा अभ्यास केला पाहिजे, नाही का?”

लुगी बोलला, “मिस्टर असे म्हणाले होते.”

“मला त्या टेबलावर कुणी ओळखीचे दिसते आहे. मला तिथे जाऊन बोलले पाहिजे.”

जोडीजोडीने नाच चाललेल्या ठिकाणामधून नाजूकपणे वाट काढत पायरो निघाला. ते विशिष्ट टेबल सहाजणांसाठी होते, पण आता तिथे एकजणच बसलेला होता. एक विचारमग्न तरुण निराशेने शँपेन पित होता.

पायरो अपेक्षा करत असलेली ती व्यक्ती नव्हती. टोनी चॅपेल सभासद असलेल्या पार्टीत धोक्याची किंवा क्षोभनाट्याची कल्पना करणे अशक्य होते.

पायरो नाजूकपणे त्या टेबलाशी थांबला.

“आहा, अरेच्या, तू माझा मित्र अँथनी चॅपेल आहेस का?”

तो तरुण मनुष्य ओरडला, “आश्चर्य आहे --- पायरो --- पोलिसांचा कुत्रा! अँथनी नव्हे, माझ्या प्रिय मित्रा, मित्रांसाठी टोनी.” त्याने एक खुर्ची ओढून घेतली.

“ये. माझ्याबरोबर बस. आपण गुन्ह्याबद्दल बोलू. आपण गुन्ह्यासाठी पेयपान करू.” त्याने एका रिकाम्या पेल्यात शँपेन ओतली. पण माझ्या प्रिय पायरो, तू या नाचगाण्यात आणि मौजमजेत इथे काय करतो आहेस? इथे प्रेते नाहीत. अगदी खात्रीने तुझ्यासाठी एकही प्रेत नाही आहे.”

पायरोने शँपेनचा घुटका घेतला.

“माझ्या मित्रा, तू फार आनंदी दिसतो आहेस.”

“आनंदी? मी संकटात सापडलो आहे --- अंधारात चाचपडतो आहे. ते वाजवत आहेत, ती धून कुठची आहे, ते मला सांग. तुला ती ओळखली का?”

पायरोने जागरूकपणे ती धोक्याची घंटी ऐकली.

“कदाचित तुम्हाला सोडून गेलेल्या बाळाला उद्देशून काही?”

तो तरुण म्हणाला, “काही वाईट तर्क नाही. पण एकदा चुकला. ‘प्रेम हे कधीच तुम्हाला बुचकळ्यात पडायला लावत नाही.’ असे त्याला म्हणतात.”

“आहा?”

टोनी चॅपेल दुःखाने म्हणाला, “माझी आवडती धून, माझे आवडते हॉटेल, माझा आवडता बँड --- आणि माझी आवडती मुलगी इथे असून, ती दुसऱ्या कुणाबरोबर नाचते आहे.”

पायरो म्हणाला, “त्यामुळे तू दुःखी आहेस?”

“बरोबर. असे बघा, पॉलीन आणि मी खूप शब्द बोलतो, असे उद्धट, घाणेरडे लोक म्हणतात. शंभरातील पंच्याणव शब्द ती बोलते आणि पाच मी बोलतो. ते पाच शब्द असे असतात, “प्रिये, मी स्पष्ट करू शकतो.” मग ती परत तिचे पंच्याणव शब्द सुरु करते आणि मला वाटते, आम्ही पुढे सरकत नाही.” आणि टोनी पुढे बोलला, “मी विष घेणार आहे.”

पायरो पुटपुटला, “पॉलीन?”

“पॉलीन वेदरबाय. बरटॉन रसेलची तरुण मेहुणी. तरुण, सुंदर, खूप श्रीमंत. आज रात्री बरटॉन रसेल पार्टी देतो आहे. तुला तो माहिती आहे का? त्याचा मोठा व्यवसाय आहे. गुळगुळीत दाढी केलेला अमेरिकन --- उत्साहाने व व्यक्तिमत्वाने भरलेला. त्याची बायको पॉलीनची बहीण आहे.”

“आणि पार्टीत अजून कोण आहे?”

“धून थांबली, की तू त्याना भेटशील. तिथे लोला वॅलडेझ आहे --- तुला माहिती असेल, महानगरातील नवीन खेळात नाचणारी दक्षिण अमेरिकेची नर्तकी, तिथे स्टीफन कार्टर आहे. तुला तो माहिती आहे का? तो मुत्सदेगिरीच्या नोकरीत आहे. खूप गुप्त, शांत स्टीफन म्हणून ओळखला जाणारा. ‘मी काही देशाचे वाचनालय नाही, इत्यादी म्हणणारा’ ते बघा. ते इकडेच आले.”

पायरो उभा राहिला. बरटॉन रसेलशी, स्टीफन कार्टरशी व श्रीमंत, काळ्या पण आकर्षक असलेल्या, लोला वॅलडेझशी त्याची ओळख करून देण्यात आली.

खूप गोरी, खूप तरुण आणि कणसाच्या फुलांसारखे डोळे असणाऱ्या पॉलीन वेदरबायशीदेखील त्याची ओळख करून देण्यात आली.

बरटॉन रसेल म्हणाला, “काय, हे थोर मिस्टर हर्क्युल पायरो आहेत? सर, तुम्हाला भेटून आनंद झाला. तुम्ही बसून आमच्यात सामील होणार नाही का? म्हणजे त्याशिवाय --- “

टोनी चॅपेल तिथे आला.

“त्याची एका प्रेताबरोबर भेटायची वेळ ठरलेली आहे. किंवा मला वाटते, तो गुप्तपणे पळून चाललेल्या पैसे पुरवणाऱ्याला, किंवा मोठे माणिक बाळगणाऱ्या बोरिओबूलागहच्या राजाला भेटायला आला असावा, नाही का?”

“ओहो, मित्रा, तुला असे का वाटते, की मी सतत कामात असतो? एखाद्या वेळी, मी माझे मनोरंजन करू शकत नाही का?”

“कदाचित तुमची येथील कार्टरची भेट ठरली असावी. संयुक्त राष्ट्रसंघाची अलीकडील आंतरदेशीय परिस्थिती सध्या बरी नाही, त्यातील तो आहे. चोरलेले महत्वाचे बेत सापडले पाहिजेत. नाहीतर उद्या युद्ध जाहीर होईल.!”

मध्येच बोलणे तोडत पॉलीन वेदरबाय बोलली, “टोनी, तू इतका टोकाचा मूर्ख असलाच पाहिजेस का?

“पॉलीन, मला माफ कर.” टोनी चॅपेल उंचावरून पडल्यासारखा शांत झाला. “पॉलीन, तू किती कडक आहेस!”

“ती बोलली, “सतत मूर्खपणा करणाऱ्या लोकांचा मी द्वेष करते.”

“मला काळजी घेतली पाहिजे. मला फक्त गंभीर गोष्टीच बोलल्या पाहिजेत.”

“ओहो, तसे नाही, मिस्टर पायरो.” तिने त्याच्याकडे हसून बघितले व विचारले, “तुम्ही खरेच शेरलॉक होम्सच्या जातीचे आहात का आणि तुम्ही नवलपूर्ण तर्कपद्धत वापरता का?”

“आहा, उदगामी तर्कपद्धत --- खऱ्या आयुष्यात ती वापरणे सोपे नाही. पण मी प्रयत्न करू का? तर मग आता मी तर्क करतो, की यलो आयरिस ही तुमची आवडती फुले आहेत?”

मिस्टर पायरो, चूक. दरीतील लिली किंवा गुलाब.”

पायरोने सुस्कारा टाकला. “ठीक आहे मी परत एकदा प्रयत्न करतो. आज संध्याकाळी --- फार लांबची गोष्ट नाही --- तुम्ही कुणाला तरी फोन केला.”

पॉलीनने हसून टाळया वाजवल्या. “अगदी बरोबर.”

“ते तुम्ही इथे पोचल्यावर फार वेळाने नव्हे?”

“परत बरोबर. मी इथे पोचले, त्या मिनिटाला फोन केला.”

“आहा, हे फारसे बरोबर नाही. तुम्ही या टेबलाशी येण्यापूर्वी फोन केला?”

“हो.”

“हे नक्कीच वाईट आहे.”

“हो.”

“ठरवून केलेले वाईट आहे.”

“ओहो, नाही. मला वाटते, ही तुमची फार हुशारी आहे. मी फोन केला होता, हे तुम्हाला कसे कळले?”

“बाईसाहेब, ते मोठे गुप्त गुपित आहे. आणि तुम्ही ज्याला फोन केला होता, त्याचे नाव प पासून किंवा ह पासून सुरु होते?”

पॉलीन हसली. “अगदी चूक. मी कधीच न पाठवलेली काही भीतीदायक पण महत्वाची पत्रे पोस्टात टाकण्यासाठी मी माझ्या नोकराणीला फोन केला होता. तिचे नाव लुईस आहे.”

“मी गोंधळलो आहे --- फारच गोंधळलो आहे.”

परत संगीत सुरु झाले.

टोनीने विचारले, “नाचायचे काय, पॉलीन?”

“टोनी, मला नाही वाटत, एवढ्या लगेच मी परत नाचू शकेन.”

टोनी जगाला उद्देशून कटूपणे बोलला, “हे फार वाईट आहे, नाही का?”

त्याच्या पलीकडील बाजूला उभ्या असलेल्या अमेरिकन मुलीला पायरो हळू आवाजात म्हणाला, “बाईसाहेब, मी तुम्हाला माझ्याबरोबर नाचण्यासाठी विचारायचे धाडस करू शकत नाही. मी फार म्हातारा आहे.”

लोला वॅलडेझ म्हणाली, “तुम्ही काही बोलता. तुम्ही अजून तरुण आहात. तुमचे केस अजून काळे आहेत.”

पायरोने थोडासा काहीतरी दुखल्यासारखा चेहरा केला.

बरटॉन रसेल जडपणे बोलला, “पॉलीन, तुझा मेहुणा आणि पालक म्हणून मी तुला जमिनीवर खेचणार आहे. हा वाल्झ आहे आणि वाल्झ हा फक्त मी करू शकणारा नाच आहे.”

“अर्थात, बरटॉन, आपण नाचूनच बघू.”

“शहाणी मुलगी, पॉलीन, हा तुझा भ्रम आहे.”

ते एकत्र बाहेर गेले. टोनीने परत त्याच्या खुर्चीचा ताबा घेतला. मग त्याने स्टीफन कार्टरकडे पाहिले. तो म्हणाला, “कार्टर, तू छोटासा बडबड्या माणूस आहेस, नाही का? तुझ्या आनंदी बोलण्याने पार्टी चालू राहू दे, काय?”

“चॅपेल, तू काय म्हणतो आहेस, मला कळत नाही.”

त्याला चिडवून दाखवत टॉमी बोलला, “ओहो, तुला कळत नाही --- कळत नाही?”

“माझ्या प्रिय माणसा, जर तू बोलत नसशील, तर पी.”

“नको, आभारी आहे.”

“मग मी पितो.”

स्टीफन कार्टरने त्याचे खांदे शहारवले. “तिथे उभ्या असलेल्या, मी ओळखणाऱ्या एका माणसाशी मला बोलले पाहिजे. इटॉनला मी त्याच्याबरोबर होतो.

स्टीफन कार्टर उठून, थोडे लांब असलेल्या टेबलाशी चालत गेला.

टोनी मलूलपणे बोलला, “इटोनियामध्ये जन्मलेल्या सगळ्यांना कोणीतरी बुडवून टाकले पाहिजे.”

पायरो अजूनही त्याच्या शेजारील काळ्या सुंदरीशी नायक असल्याप्रमाणे बोलत होता. तो पुटपुटला, “मी विचारू शकतो का, मला नवल वाटते, तुमची आवडती फुले कुठली आहेत?”

“आहा, तुम्हाला हे कशाला माहिती करून घ्यायचे आहे?”

लोला वाकली.

“बाईसाहेब, जर मी कुणा बाईला फुले पाठवली, तर ती तिला आवडणारी असली पाहिजेत, याबाबत मी जागरूक असतो.”

मिस्टर पायरो, हा तुमचा मोठा चांगुलपणा आहे. मला मोठी गडद कॅर्नेशन्स किंवा गडद लाल गुलाब आवडतात.”

“छान --- हो, छान! म्हणजे तुम्हाला यलो आयरिस आवडत नाहीत?”

“पिवळी फुले --- नाही --- त्यांच्याशी माझा स्वभाव जुळत नाही.”

"किती शहाणपणा --- मला सांगा तुम्ही आज रात्री इथे आल्यापासून कुणाला मित्राला फोन केला होता का?"

"मी? मित्राला फोन? नाही. हा काय मोठा चौकस प्रश्न आहे!"

"कारण मी चौकस मनुष्य आहे."

तिने तिचे गडद डोळे त्याच्याकडे वळवत म्हटले, "तसे तुम्ही आहात, याबद्दल माझी खात्री आहे. फार धोकादायक माणूस."

"नाही. नाही. धोकादायक नाही, तर धोक्याच्या वेळी उपयोगी असू शकेल, असा --- समजले?"

लोला हसली. तिचे पांढरे शुभ्र दात दिसले. ती हसत म्हणाली, "नाही. नाही. तुम्ही धोकादायक आहात."

पायरोने सुस्कारा टाकला. "मला दिसते आहे, की तुम्हाला कळत नाही. हे फार विचित्र आहे."

टोनी कुठून तरी अवतरला. आणि अचानक बोलला, "लोला, हवेतून खाली उडी मारण्याचे काय? चल तिथे जाऊ."

"मी येते --- हो. मिस्टर पायरो तेवढे धीट आहेत, असे मला वाटत नाही!"

टोनीने तिच्या तिच्याभोवती हात टाकला आणि पायरोच्या खांद्यांवरुन काही शेरेबाजी करून गेला. "अजून पुढे घडणाऱ्या गुन्ह्याबद्दल ध्यान करत बस रे म्हाताऱ्या."

पायरो म्हणाला, “तू म्हणतोस, त्यात तथ्य आहे. ते करणे खूप खोलवर जाणारे असते -- “

तो दोन मिनिटे ध्यानस्थ बसला. मग त्याने त्याचे बोट वर केले. लगेच लुइगी आला. त्याचा मोठा इटालियन चेहरा हास्याने भरलेला होता.

पायरो म्हणाला, “अरे म्हाताऱ्या, मला काही माहिती हवी आहे.”

“मी सदैव तुमच्या सेवेला तत्पर आहे.”

“मला असे हवे आहे, की आज रात्री इथे जमलेल्या लोकांपैकी कुणीकुणी फोन वापरला?”

“मिस्टर, मी तुम्हाला सांगू शकतो, पांढऱ्या कपड्यातील तरुण स्त्री इथे आली तेव्हा तिने फोन केला. मग ती तिचे घड्याळ काढायला गेली. आणि ते करतांना दुसरी बाई तिथून बाहेर आली आणि फोन करायला गेली.”

“म्हणजे बाईसाहेबांनी फोन केला तर? तो तिने रेस्टॉरन्टमध्ये येण्यापूर्वी केला का?

“हो, मिस्टर.”

“अजून कुणी?”

“नाही, मिस्टर.”

“लुइगी, या माहितीमुळे मी आता जोमाने विचार करू शकतो.”

“खरे आहे, मिस्टर.”

“हो, लुइगी, इतर सर्व रात्रींपेक्षा आजच्या रात्रीसाठी मला माझी बुद्धी वापरावी लागणार आहे. लुइगी, काहीतरी होणार आहे आणि काय ते मलाही माहिती नाही आहे.”

“मिस्टर, मी काहीही करू शकतो --- “

पायरोने खूण केली. लुइगी शांतपणे निघून गेला. स्टीफन कार्टर टेबलाकडे परतत होता.

पायरो म्हणाला, “मिस्टर कार्टर, आपण सर्वजण विखुरलेले आहोत.”

कार्टर म्हणाला, “ओहो, ते तसे आहे खरे.”

“तुम्ही बरटॉन रसेलला चांगले ओळखता?”

“हो, बऱ्यापैकी ओळखतो.”

“त्याची मेहुणी, छोटीशी मिस वेदरबाय फारच सुंदर आहे.”

“हो, ती छान मुलगी आहे.”

“तुम्ही तिलाही चांगले ओळखता?”

“बऱ्यापैकी.”

पायरो म्हणाला, “ओहो, बऱ्यापैकी!”

कार्टरने त्याच्याकडे रोखून पाहिले.

संगीत थांबले व सर्वजण परतले.

बरटॉन रसेल वेटरला म्हणाला, “पटकन दुसरी शँपेनची बाटली आण.” मग त्याने त्याचा पेला उंचावला. “इकडे बघा लोकहो, मी तुम्हाला शँपेन पिण्याचे आवाहन करत आहे. खरे सांगायचे, तर आजच्या या पार्टीमागे एक कल्पना आहे. तुम्हाला माहिती आहे, मी सहाजणांसाठी टेबल राखून ठेवले आहे. पण इथे आपण पाचजणच आहोत. त्यामुळे एक जागा रिकामी राहिली आहे. मग एका विचित्र योगायोगाने मिस्टर हर्क्युल पायरो इथे आलेले आहेत. आणि मी त्यांना या पार्टीत सामील होण्याची विनंती करतो.”

“तुम्हाला अजून माहिती नाही, की हा काय योगायोग आहे. तुम्ही बघत आहात की एक खुर्ची रिकामी आहे. जिच्या आठवणीसाठी ही पार्टी दिली जात आहे, ती स्त्री या रिकाम्या जागेवर असायला हवी होती., स्त्रीपुरुषहो, ही पार्टी माझ्या प्रिय पत्नीच्या आठवणीसाठी दिली जात आहे --- आयरिस --- ती चार वर्षांपूर्वी याच तारखेला आपल्याला सोडून गेली.”

टेबलाभोवती थोडी दचकल्यासारखी हालचाल झाली. थंड चेहऱ्याच्या बरटॉन रसेलने त्याचा पेला उंचावला. मी तुम्हाला तिच्या, आयरिसच्या, स्मृतीबद्दल पिण्याचे आवाहन करतो.

“पायरो कडकपणे बोलला, “आयरिस?”

त्याने फुलांकडे पाहिले. बरटॉन रसेलने त्याची नजर पकडत, हळूच मान हलवली.

टेबलाभोवती काही कुजबुज झाली. “आयरिस --- आयरिस --- “

सगळेजण अस्वस्थ व गोंधळलेले दिसू लागले.

बरटॉन रसेल त्याच्या एकसुरी, हळू, अमेरिकन आवाजात पुढे बोलू लागला. प्रत्येक शब्द जड येत होता. “तुम्हाला हे विचित्र वाटेल, की मी तिची पुण्यतिथी --- एका फॅशनेबल हॉटेलात जेवण देऊन --- अशी साजरी करावी! पण याला माझ्याकडे कारण आहे. हो. कारण आहे. मिस्टर पायरोच्या फायद्यासाठी मी स्पष्ट करतो.”

तो पायरोकडे वळला.

“चार वर्षांपूर्वीच्या आजच्या रात्री, मिस्टर पायरो, न्यूयॉर्कमध्ये एक जेवणाची पार्टी आयोजित केली गेली होती. त्यात मी आणि माझी बायको दोघे होतो. वॉशिंग्टनच्या दूतावासातील मिस्टर स्टीफन कार्टर होते. मिस्टर अँथनी चॅपेल हे आमच्या घरात काही आठवडे रहाणारे पाहुणे होते. त्या काळी तिच्या नृत्याने न्यूयॉर्क दणाणून सोडणारी उत्कृष्ट नर्तिका वॅलडेझ बाईसाहेब होती. छोटी पॉलीन --- त्याने तिच्या खांद्यावर थोपटले --- फक्त सोळा वर्षांची होती. पण ती देखील विशेष पाहुणी म्हणून आली होती. पॉलीन, तुला आठवते का?”

तिने थरथरत्या आवाजात म्हटले, “हो, आठवते आहे.”

“मिस्टर पायरो, त्या रात्री एक शोककथा घडली. तिथे ड्रम्स आणि कॅबरे सुरु झाला. दिवे मंद झाले --- फक्त मध्यभागी प्रकाशझोत पडत होता.

पुन्हा दिवे आले, तेव्हा माझी बायको टेबलावर पुढे झुकून पडलेली दिसली. ती मेली होती --- ठार मेली होती. तिच्या वाईन पेल्याच्या तळाशी उरलेल्या वाईनमध्ये पोटॅशियम सायनाईडचा अंश सापडला. आणि उरलेले पाकीट तिच्या हातातील बॅगेत सापडले."

पायरोने विचारले, "तिने आत्महत्या केली का?"

"असे म्हटले गेले --- मिस्टर पायरो, मी मोडून पडलो. कदाचित या घटनेसाठी काही कारण असावे --- असे पोलीसांना वाटले. मी त्यांचा निर्णय मान्य केला."

तो अचानक टेबलावर कोसळला. "पण मी समाधानी नव्हतो --- नाही, चार वर्षे मी विचार करत होतो. मनापासून विचार करत होतो --- आणि समाधानी नव्हतो. आयरिसने स्वतःला मारून घेतले, यावर माझा विश्वास बसत नव्हता. मिस्टर पायरो नक्कीच तिचा खून झाला होता --- त्या टेबलावरील कुणीतरी तो केला होता."

"इकडे बघा, सर --- "

टोनी चॅपेल अर्धवट उठून उभा राहिला.

रसेल म्हणाला, "टोनी, शांत रहा. अजून माझे सांगून झाले नाही. त्यांच्यापैकीच कुणीतरी एकाने तो खून केला --- त्याबद्दल आता माझी खात्री पटली आहे. कुणीतरी काळोखात, अर्धे रिकामे सायनाईडचे पाकीट

तिच्या हातातील बॅगेत टाकले. त्यांच्यापैकी कुणी हे केले, हे मला माहिती आहे. मला सत्य काय ते जाणून घ्यायचे आहे --- "

लोलाचा आवाज उसळला. "तुम्ही वेडे झाला आहात. तिला कोण त्रास देणार? नाही. तुम्ही वेडे झाला आहात. आता मी इथे थांबणार नाही."

ती चालू पडली. ड्रम वाजू लागले.

बरटॉन रसेल म्हणाला, "कॅबरे आपण नंतर बघू. आता हेच चालू राहील. तुम्ही सगळे आहात, तिथेच थांबा. मी नाचाच्या इथे जाऊन सांगतो. मी त्याची वेगळी सोय केली आहे."

तो टेबल सोडून गेला.

कार्टरने शेरा मारला, "हे काही भलतेच चालू झाले. तो मनुष्य वेडा झाला आहे."

लोला बोलली, "हो, तो वेडा झाला आहे."

दिवे मंद झाले.

टॉमी म्हणाला, "मला शक्य असेल, तर बाहेर जातो."

पॉलीन कडकपणे बोलली, "नाही." मग ती पुटपुटली, "ओहो, प्रिय ---ओहो, प्रिय --- "

पायरो पुटपुटला, "हे काय, बाईसाहेब?"

ती कुजबुजत्या सुरात उत्तरली, "हे भयंकर आहे. हे त्या रात्रीसारखेच चालले आहे --- "

खूप लोक म्हणाले, “शू! शू!.”

पायरोने त्याचा आवाज खाली केला. तो कुजबुजला, “तुमच्या कानात थोडी कुजबुज. सर्व काही ठीक होईल.” त्याने तिला आश्वस्त केले व खांद्यावर थोपटले.

लोला ओरडली, “अरे देवा, ऐका.”

‘काय आहे, बाईसाहेब?”

”ही तीच धून आहे --- न्यूयॉर्कमध्ये त्या रात्री याच गाण्याची हीच धून वाजत होती. बरटॉन रसेलनेच ती लावायला सांगितली असेल. मला ती आवडत नाही.”

“धीर धरा. धीर धरा.”

तिथे ती धून थांबून दुसरी सुरु झाली.

मुलगी मध्यभागी आली. काळी कुळकुळीत मुलगी. चमकते डोळे आणि पांढरे शुभ्र दात. तिने खर्जातील आवाजात गायला सुरवात केली --- तो आवाज चौकसपणे हलत होता.

मी तुला विसरले आहे
मी तुझा कधीच विचार करत नाही ज्या
तऱ्हेने तू चालतेस
ज्या तऱ्हेने तू बोलतेस
तू ज्या गोष्टी बोलायचीस

मी तुला विसरलो आहे.

मी तुझा कधीच विचार करत नाही

मी आज नक्की सांगू शकत नाही

की तुझे डोळे निळे होते की करडे

मी तुला विसरलो आहे.

मी तुझा विचार कधीच करत नाही.

मी त्याच्या पार गेलो आहे

पण मी तुझा विचार करतो आहे

मी त्याच्या पार गेलो आहे, असे मी फक्त म्हणतो

पण मी तुझा विचार करतो आहे

तू ----- तू ---- तू -----

हुंदक्यांची धून, खालच्या पट्टीतला सोनेरी निग्रो आवाजाचा जबरदस्त परिणाम. तो भूल घालतो --- मोहिनी घालतो. वेटर्स मंडळींना पण ते जाणवते. सगळी खोली तिच्याकडे बघायला लागते. तिने पसरवलेल्या भावनांची भूल जणू जाड दुलई पांघरते.

एक वेटर हळूच पेले भरत, टेबलाजवळून ‘शँपेन’ असे पुटपुटत जातो. सगळयांचे लक्ष जिचे पूर्वज आफ्रिकेतून आले, त्या काळ्या खोल आवाजात गाणाऱ्या बाईकडेच होते.

मी तुला विसरलो आहे

मी तुझा कधीच विचार करत नाही

ओहो, हे खोटे आहे

मी तुझाच विचार करेन मरेपर्यंत ---

जोराने टाळ्यांचा कडकडाट झाला. दिवे लागले. बरटॉन रसेल पुन्हा त्याच्या जागेवर येऊन बसला.

टोनी ओरडला, “ती गाणारी मुलगी थोर आहे.”

पण त्याचे बोलणे लोलाच्या खालच्या आवाजातील ओरडण्याने तोडले गेले. “बघा --- बघा --- “

आणि ते सगळे बघू लागले. पॉलीन वेदरबायने टेबलावर डोके टेकले.

लोला ओरडली, “ती मेली आहे --- अगदी आयरिससारखीच --- आयरिस न्यूयॉर्कमध्य मेली तशीच.”

पायरोने सगळ्यांना बाजूला होण्याची खूण करत, त्याच्या जागेवरून उडी मारली. तो त्या मुलीवर वाकला. तिचा हात उचलून हातात घेतला आणि त्याला नाडी लागली. त्याचा चेहरा पांढरा पडलेला व कठोर झालेला इतरांना दिसत होता. सगळेजण आतून पार हलले. बधीर झाले. सावकाशीने पायरोने मान हलवली.

“हो, ती मेली आहे --- बिचारी मुलगी आणि मी तिच्या शेजारी बसलो होतो. पण यावेळेस खुनी सुटणार नाही.”

करडा चेहरा झालेला बरटॉन रसेल पुटपुटला, “अगदी आयरिससारखेच --- तिला काहीतरी दिसले --- आजच्या रात्री पॉलीनने काहीतरी पाहिले. फक्त तिची खात्री नव्हती --- आपण पोलीसांना बोलवायला पाहिजे --- अरे देवा, छोटी पॉलीन.”

पायरो म्हणाला, “तिचा पेला कुठे आहे? त्याने तो उचलून नाकाशी नेला. कडू बदामांचा वास --- तीच पद्धत, तेच विष --- “

त्याने तिच्या हातातील बॅग उचलली. “आपण ती उघडून बघू.”

बरटॉन रसेल ओरडला “ही आत्महत्या आहे, यावर विश्वास ठेऊ नका. अजिबात विश्वास ठेऊ नका.”

पायरोने आज्ञा दिली, “थांबा. नाही. यात काही नाही. दिवे एका झटक्यात आले. त्यामुळे खुन्याला वेळ मिळाला नाही. त्यामुळे विष अजून त्याच्याकडे असेल.”

कार्टर म्हणाला, “किंवा तिच्याकडे.” तो लोला वॅलडेझकडे बघत होता.

ती ओरडली, “तुला काय म्हणायचे आहे? मी तिला मारले? हे खरे नाही. मुळीच खरे नाही. मी तिला का मारेन?”

“त्यापेक्षा तुम्ही न्यूयॉर्कमधील बरटॉन रसेलचा विचार करा. अशा गावगप्पा मी ऐकल्या आहेत. अर्जेंटाइन सुंदरी खोडकरपणे हेवा करत आहेत.”

“हे धादांत खोटे आहे. आणि मी काही अर्जेंटीनाहून आलेली नाही. मी पेरूहून आलेली आहे. आहा --- मी तुझ्यावर थुंकते.” ती स्पॅनिशमध्ये म्हणाली.

पायरो ओरडला, “मला शांतता हवी आहे. मी बोलणार आहे.”

बरटॉन रसेल जडपणे बोलला, “प्रत्येकाची झडती घ्यायला हवी.”

पायरो शांतपणे म्हणाला, “नाही, तशी काही गरज नाही.”

“गरज नाही म्हणजे काय?”

“मला, हर्क्युल पायरोला माहिती आहे. मी मनाच्या डोळ्यांनी बघतो. आणि मी आता बोलतो. मिस्टर कार्टर, तुम्ही तुमच्या छातीजवळील खिशांतील पाकीट दाखवाल का?”

“माझ्या खिशात काही नाही. हा काय त्रास आहे --- “

“टोनी, माझ्या चांगल्या मित्रा, जर तू त्याचा खिसा तपासलास, तर बरे होईल.”

कार्टर ओरडला, “तुम्ही गेलात उडत --- “

कार्टरने त्याला विरोध करण्यापूर्वी, टोनीने त्याच्या खिशातून पाकीट काढले. “हे बघा मिस्टर पायरो, तुम्ही म्हणाल्याप्रमाणे पाकीट काढले.”

कार्टर ओरडला, “हे बनवलेले, खोटे आहे,”

पायरोने पाकीट उचलून त्यावरील कागदाचा तुकडा वाचला.

“पोटॅशियम सायनाईड. केस पूर्ण झाली.”

बरटॉन रसेलचा जाडसर आवाज आला, “कार्टर, मला नेहमीच असे वाटत असे. आयरिसचे तुझ्यावर प्रेम होते. तिला तुझ्याबरोबर निघून जायचे होते. तुझ्या चांगल्या करीयरसाठी तुला काही प्रकरण नको होते. त्यामुळे तू तिला विष दिलेस. आताच्या तुझ्या या करणीमुळे तुला फाशी होईल. हलकट कुत्रा!”

पायरो अधिकारवाणीने व ठाम आवाजात गरजला, “शांत रहा. अजून हे संपले नाही. मला, हर्क्युल पायरोला, काहीतरी सांगायचे आहे. टोनी चॅपेल हा माझा मित्र मी इथे आलो, तेव्हा म्हणाला की मी काही गुन्ह्याच्या शोधात आलो आहे. ते अर्धेमुर्धे खरे होते. माझ्या मनात गुन्हा होता. पण म्हणजे गुन्हा रोकण्यासाठी मी आलो होतो. आणि मी तो रोकला आहे. खुन्याने व्यवस्थित बेत आखला --- पण हर्क्युल पायरो एक पायरी पुढे होता. दिवे गेले, तेव्हा त्याने पटकन विचार करून बाईसाहेबांच्या कानात काहीतरी सांगितले. ती हुशार आणि चटपटीत असल्याने पॉलीनने तिचे नाटक उत्तम पार पाडले. बाईसाहेब, शेवटी तुम्ही मेल्या नसल्याचे सगळ्यांना दाखवाल का?”

पॉलीन उठून बसली व जोरजोरात हसू लागली.

ती बोलली, “पॉलीनचा पुनर्जन्म!”

“पॉलीन --- प्रिये.”

“टोनी!”

“माझी गोडुली!”

“देवदूत.”

बरटॉन रसेल श्वास रोधत उद्गारला, “मला काही समजत नाही आहे -- “

“मी तुम्हाला समजाऊन सांगतो, मिस्टर रसेल, तुमचा बेत नीट पार पडला नाही.”

“माझा बेत?”

“हो, तुमचा बेत. अंधारात फक्त तुमच्याकडेच पुरावा होता. फक्त मिस्टर बरटॉन रसेलनेच टेबल सोडले होते. पण तुम्ही अंधाराचा फायदा घेऊन परत आलात. तुम्ही हातात शँपेनची बाटली घेऊन, टेबलाभोवती गोलगोल फिरतांना पॉलीनच्या पेल्यात सायनाईड टाकलेत आणि उरलेले अर्धे पाकीट तुम्ही कार्टरचा पेला उचलण्यासाठी वाकलात, तेव्हा त्याच्या खिशात टाकलेत. जेव्हा प्रत्येकाचे लक्ष कुठेतरी दुसरीकडे असते तेव्हा हिवाळ्यातील अंधाऱ्या रात्री हे करणे, तुम्हाला सोपे होते. आज पार्टी द्यायचे तुमचे खरे कारण हेच होते. गर्दीमध्ये खून करणे सुरक्षित होते.”

“काहीही बरळू नका. पॉलीनला मारायचे मला काय कारण असणार?

“ते कदाचित पैशांसंबंधी असेल. तुमच्या बायकोने तुम्हाला पॉलीनचे पालक नेमले होते, हे तुम्हीच आज पार्टीत सांगितलेत. पॉलीन

वीस वर्षांची आहे. ती एकवीस वर्षांची झाल्यावर किंवा तिचे लग्न झाल्यावर, तुम्हाला तिच्या पालकत्वाचा अहवाल सादर करावा लागला असता. मी असे सुचवतो, की तुम्ही ते करू शकत नव्हतात. तुम्ही ते जाणून होतात. मिस्टर बरटॉन रसेल, मला हे माहिती नाही, की तुम्ही तुमच्या बायकोलाही याच पद्धतीने मारलेत, का तिची आत्महत्या तुम्हाला हे सुचवून गेली, की आज असा गुन्हा करावा. पण मला हे माहिती आहे, की आज गुन्ह्याचा प्रयत्न केल्याबद्दल तुम्ही दोषी आहात. त्यासाठी तुम्हाला कोर्टात खेचायचे की नाही, हे मिस पॉलीनच्या निर्णयावर अवलंबून राहील."

पॉलीन म्हणाली, "नाही. त्याने माझ्या दृष्टीसमोरून निघून जावे. हा देश सोडून जावे. मला काही खटला वगैरे चालवायचा नाही."

"मिस्टर बरटॉन रसेल, तुम्ही इथून लवकर जावे, ते बरे. आणि भविष्यात मी तुम्हाला सावध रहायचा इशारा देतो."

बरटॉन रसेल पडलेल्या चेहऱ्याने उठला.

"तू इथे लुडबुड करणारा, उद्धट, बेल्जियन छोटा माणूस! तू खड्ड्यात जा."

तो रागारागाने बाहेर पडला.

पॉलीनने सुस्कारा टाकला.

"मिस्टर पायरो, तुम्ही नवलपूर्ण आहात."

पायरो म्हणाला, “बाईसाहेब, तुमची कमाल आहे. शँपेन फेकून देऊन तुम्ही मेल्याचे नाटक फार छान केलेत.”

ती शहारुन उद्गारली, “तुम्ही मला योग्य सूचना दिल्यात.”

तो म्हणाला, “तुम्ही मला फोन केला होतात, बरोबर?

“हो.”

“का?”

“मला माहिती नाही. मी काळजीत होते --- का ते माहिती नाही, पण घाबरले होते. बरटॉन मला म्हणाला की आयरिसच्या स्मरणार्थ तो ही पार्टी देतो आहे. मला जाणवले, की त्याचा काही बेत असावा --- पण त्याने मला तो काय आहे, ते काही सांगितले नाही. तो इतका विचित्र आणि उद्दीपित झालेला दिसत होता, की मला काहीतरी भयंकर होण्याची भीती वाटली --- अर्थात त्याला मला खतम करायचे असल्याचे मला कधीच वाटले नव्हते.”

“आणि मग?”

“मी लोकांना तुमच्याबद्दल बोलतांना ऐकले. मला वाटले, जर मी तुम्हाला इथे आणू शकले, तर काही वाईट होणार नाही. मला वाटले की परदेशी असल्यामुळे --- जर मी धोक्यात असल्याचे ढोंग करून आणि इथे काही गूढ चालले असल्याचा आभास निर्माण केला, तर --- “

“तुम्ही क्षोभनाट्याचा विचार केलात व त्यामुळे मला रुची वाटून मी येईन असे तुम्हाला वाटले? त्यामुळेच मी कोड्यात पडलो. निरोप अर्थातच खोटा होता. तो फोन मलाही खोटाच वाटला. पण आवाजातील भीती --- ती खरी होती. मग मी आलो --- आणि तुम्ही मला फोन करून निरोप दिल्याचे अजिबात नाकारलेत.”

“मला तसे करावेच लागले. शिवाय मी फोन केला होता, हे मला तुम्हाला कळू द्यायचे नव्हते.

“आहा, पण माझी तशी खात्री झाली होती. पहिल्यांदा नाही झाली. पण त्या टेबलावर यलो आयरिसची फुले असल्याचे फक्त तुम्हाला आणि मिस्टर बरटॉन रसेल यांनाच माहिती होते.”

पॉलीनने मान हलवली. तिने स्पष्ट केले, “मी त्याला सहाजणांचे टेबल लावायची आज्ञा देतांना ऐकले. पण आम्ही तर फक्त पाचजणच होतो. त्यामुळे मला संशय आला.” ती ओठ चावत थांबली.

“पण तुम्हाला संशय का आला?”

ती सावकाश बोलली, “मी घाबरले होते. मिस्टर कार्टरना --- काहीतरी होईल, म्हणून मी घाबरले होते.”

स्टीफन कार्टरने घसा खाखरला. सावकाशीने पण थोडे फसवल्यासारखे, तो टेबलावरून उठला. तो म्हणाला,

“म --- ला तुमचे आ --- भार मानायचे आहेत, मिस्टर पायरो. मी तुमचा फार ऋणी आहे. माझी खात्री आहे, मी गेलो, तरी तुम्ही मला माफ कराल. आज रात्री घडलेल्या गोष्टी जरा मनाला खटकणाऱ्याच होत्या.”

त्याच्या जाणाऱ्या आकृतीकडे बघत पॉलीन आक्रमकपणे बोलली, “मी त्याचा द्वेष करते. मला नेहमी असे वाटते, की त्याच्यामुळे आयरिसने स्वतःला मारून घेतले. किंवा कदाचित --- बरटॉनने तिला मारले. ते सर्व इतके नकोसे आहे --- “

पायरो शांतपणे म्हणाला, “विसरून जा, बाईसाहेब --- विसरा --- झाल्या गेल्या गोष्टी विसरा. फक्त वर्तमानकाळाचा विचार करा --- “

पॉलीन पुटपुटली, “हो --- तुमचे बरोबर आहे --- “

पायरो लोला वॅलडेझकडे वळला. “बाईसाहेब, जशी रात्र वाढत चालली आहे, तसा मी अधिकाधिक धीट होत चाललो आहे. आता तुम्ही माझ्याबरोबर नाचाल का?”

“ओहो, हो. तुमच्या मिशा मांजराच्या मिशा आहेत. मला तुमच्याबरोबर नाच करण्यात रस आहे.”

“तुम्ही दयाळु आहात.”

टोनी आणि पॉलीन गेले. ते दोघे टेबलावर एकमेकांवर वाकले होते.

“पॉलीन, प्रिये.”

“ओहो, टोनी, मी दिवसभर तुला इतका त्रास दिला आहे. मी मांजरासारखी तुझ्यावर फिस्कारत होते. तू मला क्षमा करशील का?”

“अग राणी, परत आपल्या तारा जुळल्या आहेत. आपण नाचूया.”

ते एकमेकांकडे हसून बघत, गुणगुणत, नाचू लागले.

तुम्हाला कोड्यात टाकणारे प्रेमासारखे दुसरे काही नाही.

तुम्हाला उदास बनवणारे प्रेमासारखे दुसरे काही नाही.

वाईट वाटते आहे.

भारावून गेल्यासारखे वाटते आहे.

भावना उचंबळून आल्या आहेत.

फार सहृदय झाला आहात.

तुम्हाला शरणागत व्हायला लावणारे, प्रेमासारखे दुसरे काही नाही.

तुम्हाला वेडे बनवणारे, प्रेमासारखे दुसरे काही नाही.

कडक, शिवराळ भाषा वापरायला लावणारे,

आत्महत्या करायला लावणारे,

हत्या करायला भाग पाडणारे,

प्रेमासारखे दुसरे काही नाही.

प्रेमासारखे दुसरे काही नाही..

FOUR AND TWENTY BLACKBIRDS

# चोवीस काळे पक्षी



हर्क्युल पायरो त्याचा मित्र, हेन्री बोनीग्टनबरोबर चेल्सी येथील किंग्ज रस्त्यावरील गालँन्ट एन्डेव्होअरमध्ये जेवत होता.

मिस्टर बोनीग्टनला गालँन्ट एन्डेव्होअर आवडत असे. तेथील आरामाचे वातावरण, साधे, खूप पदार्थांची दाटी नसलेले, इंग्लिश जेवण त्याला आवडत असे. त्याला लोकांना सांगायला आवडे, की त्याच्याबरोबर तिथे कोण जेवले. ऑगस्टस जॉन त्याच्याबरोबर जेवला

नसला, तरी त्याचे नाव पाहुण्यांच्या यादीत होते, त्यामुळे त्याने प्रसिद्ध कलाकारांबरोबर लक्ष वेधून घेतले होते. मिस्टर बोनीग्टन स्वतः अगदी कमी कलावंत माणसा सारखा होता --- पण तो दुसऱ्यांच्या कलात्मक कृतींचा अभिमान बाळगत असे.

सहानुभूतीपूर्ण वर्तनाची वेट्रेस मॉलीने मिस्टर बोनीग्टनना, एक जुना मित्र म्हणून, अभिवादन केले. तिला गिऱ्हाईके ओळखू येत असल्याबद्दल व त्यांची खाण्याची आवडनिवड माहिती असल्याबद्दल अभिमान होता.

ती दोन माणसे कोपऱ्यातील टेबलावर बसल्यावर, ती म्हणाली, “सर, शुभ संध्याकाळ. आज तुम्ही भाग्यवान आहात. आज तुमचे आवडते बदाम घातलेले टर्की बनवले आहे. आणि आमच्याकडे खूप छान गाईच्या दुधापासून बनवलेले चीजही आहे. तुम्ही पहिल्यांदा सूप घेणार की मासे?”

मिस्टर बोनीग्टननी या बाबीवर चर्चा केली. तो मेनूकार्ड बघणाऱ्या पायरोला ताकीद देत म्हणाला, “तुमचे फ्रेंच किकशॉज आता नको. छान शिजवलेले इंग्लिश पदार्थ घेऊ.”

पायरोने हात हलवत म्हटले, “मलाही ते आवडेल. मी मला सर्वस्वी तुझ्या हवाली करतो.”

मिस्टर बोनीग्टन त्याकडे खास लक्ष देत उत्तरले, “आहा, हुर्ये!”

हे जड पदार्थ व वाइनचा प्रश्न सोडवून, मिस्टर बोनीग्टन सुस्कारा टाकत मागे रेलले आणि मॉली गेल्यावर, त्यांचा रुमाल उघडला.

ते पसंतीची पावती देत म्हणाले, “ती चांगली मुलगी आहे. एके काळी ती छान दिसायची --- चित्रकार तिचे चित्र काढत असत. तिला पदार्थांची चांगली माहिती आहे. ते जास्त महत्वाचे आहे. सर्वसाधारणपणे स्त्रिया अन्नपदार्थांबद्दल फार खात्रीने काही सांगू शकत नाहीत. अशा खूप बायका आहेत की ज्या त्यांच्या आवडत्या व्यक्तीबरोबर बाहेर गेल्या तर, त्या काय खात आहेत, ते देखील त्यांच्या लक्षात येत नाही. ती बाई पहिल्यांदा जी गोष्ट बघेल, ती मागवून टाकेल.”

पायरोने डोके हलवले.

“असे करणे भयानक आहे.”

मिस्टर बोनीग्टन स्वसमाधानाने म्हणाले, “पुरुष तसे नसतात.”

पायरो डोळ्यात चमक आणत बोलला, “कधीच नसतात?”

मिस्टर बोनीग्टन कबूल करत म्हणाले, “हं, कदाचित ते फार तरुण असतात, तेव्हा असेल. छोटे बच्चे! हल्लीची सर्व तरुण मुले सारखीच असतात --- धमक नाही --- दम नाही.” कोणाचीही कड न घेता, ते बोलले, “मला त्यांचा काही उपयोग नाही --- त्यांचा मला काही उपयोग नाही. कदाचित ते बरोबर असतील. पण यातील काही तरूणांना तुम्ही बोलतांना ऐकले, तर तुम्हाला वाटेल, की माणसाला साठ वर्षानंतर जिवंत रहायचा अधिकार नाही! त्यांचे जे काही चालू असते, ते पाहून तुम्हाला आश्चर्य

वाटेल, की त्यातले कोणीच वयस्क लोकांना चाकोरीबाहेर जाऊन मदत करत नाहीत.”

पायरो म्हणाला, “शक्य आहे, कदाचित ते करत असतील.”

“मला म्हटले पाहिजे, की पायरो, तुमचे मन मोठे आहे. हे सगळे पोलिसांचे काम आहे. ते तुमच्या कल्पनांमधील हवा काढून घेतात.’

पायरो हसला. तो बोलला, “तरीही अपघातामुळे झालेल्या साठ वर्षांवरील मृत्यूंची सारणी बनवणे, रुचीपूर्ण असेल. ते तुम्हाला तुमच्या मनात नक्की काही चौकस तर्क करायला भाग पाडेल, याची मला खात्री आहे.”

“तुमचा त्रास असा आहे, की तुमच्याकडे तपासासाठी गुन्हा येण्याऐवजी तुम्ही गुन्हा शोधायला जाता.”

पायरो म्हणाला, “मी क्षमा मागतो. माझ्या मित्रा, तुम्ही ज्याला ‘खरेदी’ म्हणता, त्याबद्दल मी बोलतो. तुम्ही काय करता, सांगा. जग तुमच्याबरोबर कसे चालते?”

मिस्टर बोनीग्टन म्हणाले, “वाईट! हल्लीच्या जगाची तीच समस्या आहे. फारच वाईट! अती चांगली भाषा --- त्यामुळे वाईट लपवले जाते. जसे की उग्र वासाचे सॉस, आतील खराब मासा लपवते. पण तळाशी काही चांगले नसते. तसे मला हाडे नसलेला निव्वळ मऊ मासाचा तुकडा दाखवा. आणि त्यावर वाईट सॉस नसलेले दाखवा.

त्याच क्षणी मॉलीने त्याला ते दिले आणि त्याने पसंतीची पावती दिली. तो म्हणाला, माझ्या मुली, मला काय आवडते, ते तुला बरोबर माहिती असते.

“तुम्ही इथे नेहमी येता नाही का, सर? तुम्हाला काय आवडते ते मला माहिती पाहिजेच.”

पायरो म्हणाला, “पण प्रत्येक वेळी माणसाला तेच तेच आवडेल का? कधीतरी त्यांना बदलही बरा वाटत असेल, नाही का?”

“तसे नाही, सर. बायकांना विविधता आवडते --- पुरुषांना नेहमी तीच गोष्ट आवडते.”

बोनीग्टन खर्जातल्या आवाजात बोलला, “जिथे अन्नाचा संबंध येतो, तिथे बायका मुळात विश्वासार्ह नसतात!”

त्याने तिथे आजूबाजूला पाहिले.

“जगातील विनोदी जागा. तो कोपऱ्यातील विचित्र दिसणारा दाढीवाला म्हातारा बघा. मॉली तुम्हाला सांगेल. दर मंगळवारी व गुरुवारी रात्री तो इथे असतो. गेली दहा वर्षे हे चालू आहे. या जागेतील तो खास माणूस आहे. तरीही इथे कोणालाही त्याचे नाव, तो कुठे रहातो, काय करतो, हे काहीही माहिती नाही. तुम्ही याचा विचार करता, तेव्हा ते विचित्र वाटते.”

जेव्हा वेट्रेसने टर्की आणला, तेव्हा तो म्हणाला, “अजून तो म्हातारा इथे येतो, असे दिसते आहे?

“ते बरोबर आहे. मंगळवार व गुरुवार हे त्याचे वार आहेत. पण गेल्या सोमवारी तो इथे आलेला बघून, मी नाराज झाले. मला वाटले मी वार चुकले. मला वाटले आज मंगळवार असणार. पण तो दुसऱ्या दिवशी रात्री पण आला. म्हणजे असे दिसत होते, की सोमवारी तो एक वार जास्त आला होता.”

पायरो पुटपुटला, “असे सवयीपासून दूर जाणे, रुचीपूर्ण आहे. मला नवल वाटते, याचे काय कारण असेल?”

“हे पहा, सर, तुम्ही मला विचारले, तर मला वाटते, त्याला काही काळजी असावी.”

“तू असे कशावरून म्हणतोस? त्याच्या पद्धतीत काही बदल झाला होता का?”

“नाही, सर. त्याच्या पद्धतीत असा नव्हे. तो नेहमीप्रमाणेच शांत होता. तो येतो आणि जातो, तेव्हा, शुभ संध्याकाळ सोडून, तो विशेष काही बोलत नाही. नाही. तशीच त्याची पद्धत आहे.”

“त्याची पद्धत?”

मॉली लाजली. “मी असे म्हणण्याचे धाडस करते, तुम्ही लोक हसाल, पण एखादा मनुष्य इथे दहा वर्षे येत असतो, तेव्हा आम्हाला त्याच्या आवडीनिवडीदेखील कळू लागतात. त्याने दाट सूप घेतलेले मी कधी पाहिलेले नसते. त्याला कधी गाईच्या मासाचे पुडिंग वा काळया बेरीज

सहन होत नाहीत. पण त्या सोमवारी रात्री त्याने दाट टोमॅटो सूप, गाईच्या मासाचे पातळ तुकडे, किडनीचे पुडिंग व काळया बेरीजचे आंबटसर तुकडे मागवले. असे वाटत होते, की त्याने काय मागवले आहे, हे त्याला स्वतःलाही कळत नव्हते!"

पायरो म्हणाला, "तुम्हाला माहिती आहे का, मला ते असामान्यपणे रुचीपूर्ण वाटते.

मॉली समाधानी व हरवलेली दिसली.

हेन्री बोनीग्टन शांतपणे हसत म्हणाला, "यावरून आपण तुझ्याकडून सर्वात चांगल्या पद्धतीने काही अवगामी निष्कर्ष मागवू."

"मला पहिल्यांदा, तू काय म्हणतोस, ते ऐकायला आवडेल."

"तुला मी वॉटसन बनायला हवे आहे का? तर तो म्हातारा डॉक्टरकडे गेला आणि डॉक्टरने त्याचे जेवण बदलले."

म्हणजे दाट टोमॅटो सूप, गाईच्या मासाचे पातळ तुकडे, किडनीचे पुडिंग व काळया बेरीजचे आंबटसर तुकडे, हे बदलले? असे कुठला डॉक्टर करेल, याची मी कल्पना करू शकत नाही.

"अरे, तू विश्वास ठेऊ नकोस. पण डॉक्टर तुझ्या बाबतीतदेखील काहीही करू शकतील."

"तुला एवढेच सुचते आहे का?"

हेन्री बोनीग्टन म्हणाला, “खरे तर गंभीरपणे, फक्त एकच स्पष्टीकरण शक्य आहे. आपल्या अनोळखी मित्रावर कुठल्यातरी ताकदवान मानसिक भावनांचा पगडा होता. खरे तर तो इतका काळजीत होता, की तो काय मागवत आहे व काय खात आहे, हे त्याला कळतच नव्हते.”

तो मिनिटभर थांबून म्हणाला, “आता पुढे तू मला सांगशील, की त्याच्या मनात काय चालले होते. कदाचित तू म्हणशील, की तो एक खून करण्यासाठी मनाची तयारी करत होता.”

स्वतःच्या या तर्कावर तो हसला.

पायरो हसला नाही. त्याने कबूल केले, की त्या क्षणी तो फार चिंतीत झाला होता. आता काय होण्याची शक्यता आहे, हे थोडेसे जाणून घेण्याची गरज असल्याचे, तो म्हणाला.

त्याचे मित्र त्याला म्हणाले, की ही कल्पना अफलातून आहे.

त्यानंतर तीन आठवड्यांनी, पायरो आणि बोनीग्टन परत भेटले --- यावेळेस ते ट्यूब रेल्वेत भेटले. त्यांनी वरच्या दांड्याला धरून हलतडुलत, एकमेकांकडे बघून मान हलवली. मग पिकॅडेली सर्कसला खूप गर्दी उतरून गेल्यावर, डब्याच्या अगदी पुढच्या टोकाला त्यांना बसायला जागा मिळाली. ती जागा निवांत होती. तिथून कोणी जात येत नव्हते.

मिस्टर बोनीग्टन म्हणाले, “हे छान झाले. स्वार्थी जमाव, माणसांची शर्यत, ते त्याना सांगितले, तरी पुढे सरकत नाहीत.”

पायरोने खांदे शहारवले. "काय करणार? आयुष्य फार बेभरवशाचे आहे."

मिस्टर बोनीग्टन पुसट समाधानाने म्हणाले, "खरे आहे. आज आला, उद्या गेला आणि त्याबद्दल बोलतांना, तुम्ही गालँन्ट एन्डेव्होअरमध्ये भेटलेल्या त्या म्हाताऱ्याला लक्षात ठेवाल ना? त्याने आहे त्यापेक्षा चांगल्या जगाची अपेक्षा केली, तर मला काही आश्चर्य वाटणार नाही. तो काही तिथे आठवडाभर येत नाही. पण त्यामुळे मॉली फार उदास झाली आहे."

बसल्या बसल्या पायरोचे हिरवे डोळे चकाकले. तो म्हणाला, "खरे की काय? खरे की काय?"

बोनीग्टन बोलला, "तुला आठवते का, मी म्हणालो होतो, की तो डॉक्टरकडे जाईल व ते त्याला पथ्यावर ठेवतील. पथ्यामध्ये तसा फारसा अर्थ नाही --- पण त्याने त्याच्या तब्येतीसाठी डॉक्टरांचा सल्ला घेतला, तर मला नवल वाटणार नाही. आणि त्यांच्या सल्ल्यामुळे, त्याला अचानक बरे वाटेल. त्यामुळे त्याने त्याच्या नकळत, वेगळयाच गोष्टी मागवल्या असतील. असेही शक्य आहे, की त्याच्या बरे वाटण्यामुळे त्याला फार छान वाटू लागले असेल आणि त्याच्याकडून, ती कृती घडली असेल. डॉक्टर रुग्णाला काय सल्ला देतात, याबद्दल त्यांनी जागरूक रहाणे गरजेचे आहे."

पायरो म्हणाला, 'तसे ते असतातच."

मिस्टर बोनीग्टन बोलले, “माझे स्टेशन आले. बाय बाय. आता असे धरून चालू नकोस, की तो म्हातारा कोण होता, त्याचे नाव काय होते, हे आपल्याला समजेल. जग विनोदी आहे.”

तो डब्यातून बाहेर पडला.

पायरो भुवई चढवून बसला होता, जसे काही त्याला जग इतके विनोदी वाटत नव्हते.

तो घरी गेला व त्याच्या विश्वासू नोकराला, जॉर्जला काही सूचना दिल्या.

पायरोने त्याचे बोट नावाच्या सूचीवरुन फिरविले. ठराविक जागेमध्ये झालेल्या मृत्युंची ती नोंद होती. पायरोचे बोट थांबले. हेन्री गॅसकॉइन. एकोणसत्तर. मी पहिल्यांदा त्याच्यासाठी प्रयत्न करतो.”

नंतर उरलेल्या दिवसात, पायरो किंग्ज रस्त्याच्या बाजूस असलेल्या, डॉक्टर मॅकअड्र्युच्या शस्त्रक्रिया खोलीत बसला होता. डॉक्टर मॅकअड्र्यु उंच, लाल केसांचा, बुद्धिमान चेहऱ्याचा स्कॉटलंडचा रहिवासी होता.

तो म्हणाला, गॅसकॉइन? हो, बरोबर. विचित्र म्हातारा. एकटाच जुन्या, पडीक घरात रहायचा. तिथे नवीन सदनिकांची इमारत बांधण्यासाठी ती वस्ती मोडण्यात आली होती.

मी त्याला कधी भेटलो नव्हतो, पण मी त्याला पाहिले होते आणि तो कोण होता, ते मला माहिती होते. डेअरीशी संबधित लोकांनी पहिल्यांदा

त्याचा व्यवसाय बंद पाडला. त्याने बाहेर दुधाच्या बाटल्यांच्या थप्प्या लावायला सुरवात केली. शेवटी शेजारच्या लोकांनी पोलीसांकडे तक्रारी केल्या व त्यांनी दार तोडून त्याला शोधले. जिन्यात वरखाली करून, त्याने त्याची मान मोडून घेतली होती. त्याच्या अंगात फाटक्या नाडीचा जुना गाउन होता. त्यासकट त्याने सहज स्वतःला मारून घेतले असावे."

पायरो म्हणाला, 'अस्स! ते अगदी साधे होते --- एक अपघात."

"बरोबर."

"त्याला कुणी नातेवाईक होते का?

"एक पुतण्या होता. तो मधून मधून, साधारणपणे महिन्यातून एकदा काकांना भेटायला येत असे. त्याचे नाव जॉर्ज लोरीमर होते. तो स्वतः डॉक्टर होता व विम्बल्डनला रहात होता."

"म्हाताऱ्याच्या मरणाने तो व्यथित झाला का?"

"मला माहिती नाही, की तो व्यथित झाला का, म्हणजे त्याला म्हाताऱ्याचे प्रेम होते, पण तो त्याला खरे तर नीटसा ओळखत नव्हता."

"तुम्ही मिस्टर गॅसकॉइन यांना मेलेले पाहिलेत, तेव्हा त्याना मरून किती वेळ झाला होता?"

डॉ मॅकअड्र्यु उद्गारले, "आहा! इथेच आम्ही पोलिसांना आणले. त्यांनी म्हटले, मरून झालेला वेळ अठ्ठेचाळीस तासांपेक्षा कमी नाही व बाहत्तर तासांपेक्षा जास्त नाही. सहा तारखेच्या सकाळी तो सापडला. खरे

तर आम्हाला त्यापेक्षा नेमकी वेळ कळली. त्याच्या गाउनच्या खिशात तीन तारखेला लिहिलेले, त्याच दुपारी विम्बल्डन पोस्टात टाकलेले एक पत्र सापडले --- ते त्या दिवशी रात्री नऊ वीसला पोचले असेल. त्यामुळे मृत्यूची वेळ त्यानंतरची असली पाहिजे. त्यामुळे पोटातील पदार्थ व पचनक्रिया यांचा ताळमेळ जमतो. त्याच्या मृत्युपूर्वी दोन तास त्याचे जेवण झाले होते. मी त्याला सहा तारखेच्या सकाळी तपासले. तेव्हा त्याची अवस्था साठ तासांपूर्वी मरण आल्यासारखी दिसत होती --- तीन तारखेला साधारण रात्री दहा वाजता."

"हे सगळे बरोबर वाटते आहे. मला सांग, त्याला जिवंत शेवटचे केव्हा पाहिले गेले?

त्या दिवशी संध्याकाळी सात वाजता त्याला किंग्ज रस्त्यावर पाहिले गेले. तीन तारखेला, गुरुवारी तो साडेसात वाजता गालँन्ट एन्डेव्होअरमध्ये जेवत होता. असे दिसत होते, की तो दर गुरुवारी तेथे जेवत असे. तो कलाकार असल्यामुळे, तुला माहिती आहे का, की तो फारच वाईट कलाकार होता."

"त्याला हा पुतण्या सोडून अजून कोणी नातेवाईक नव्हते का?"

"एक जुळा भाऊ होता. ती सर्व गोष्ट थोडी चौकस स्वरूपाची आहे. त्यांनी अनेक वर्षात एकमेकांना पाहिले नव्हते. तो भाऊ, अँथनी गॅसकॉइन याने एका श्रीमंत बाईशी लग्न केले होते आणि कला सोडून दिली होती. त्यावरून दोन्ही भावांची भांडणे झाली. तेव्हापासून त्यांनी एकमेकांचे तोंड

बघितले नाही. पण आश्चर्य म्हणजे, ते एकाच दिवशी मेले. जुळ्या भावातील मोठा तीन तारखेला दुपारी तीन वाजता मेला. मला अजून अशी एकाच दिवशी जगातील वेगळ्या भागात मेलेल्या जुळ्या भावांची केस माहिती आहे. कदाचित हा योगायोग असावा, पण असे आहे खरे.”

“दुसऱ्या भावाची बायको जिवंत आहे?”

“नाही, ती काही वर्षांपूर्वीच मेली.”

“अँथनी गॅसकॉइन कुठे रहायचा?”

“किंगस्टन रस्त्यावर त्याचे घर होते. माझ्या माहितीप्रमाणे व जे मला डॉ लॉरीमरने सांगितले, त्यावरून, तो फार एकाकी होता.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.

स्कॉटलंडच्या माणसाने त्याच्याकडे निरखून पाहिले. त्याने थंडपणे विचारले, “मिस्टर पायरो, तुमच्या मनात काय आहे? --- तुम्ही महत्वाच्या प्रश्नात लक्ष घालून माहिती मिळवलीत, म्हणून मी तुमच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पण हे सर्व काय चालले आहे, याबद्दल मी अंधारात आहे.

पायरो सावकाशीने बोलला, “ही साधी अपघाताची केस आहे, असे तुम्ही म्हणालात. माझ्या मनात सुद्धा तेवढेच सोपे काही आहे --- एक साधा धक्का.”

डॉ मॅकअड्र्युने आश्चर्याने पाहिले. “म्हणजे दुसऱ्या शब्दात, खून! तुमच्या या वक्तव्याला काही आधार आहे का?”

पायरो म्हणाला, “नाही. हा माझा निव्वळ तर्क आहे.”

दुसरा म्हणाला, “पण काहीतरी असले पाहिजे --- “

पायरो काही बोलला नाही.

“जर तुम्हाला पुतण्या, लॉरीमरचा संशय असेल, तर मला तुम्हाला हे सांगायला काही वाटणार नाही, की तुम्ही नको त्या माणसावर भुंकत आहात. लॉरीमर विम्बल्डनमध्ये साडेआठपासून मध्यरात्रीपर्यंत ब्रिज खेळत होता. चौकशीवरून, हे सिद्ध झाले आहे.”

पायरो पुटपुटला, “आणि त्याची खात्रीदेखील केली गेली. पोलीस काळजी घेत आहेत.”

डॉक्टर म्हणाला, “कदाचित तुम्हाला त्याच्याविरुद्ध काही माहिती असेल?”

“मला अशी कुणी व्यक्ती आहे, हेदेखील आतापर्यंत माहिती नव्हते.

“मग तुम्हाला अजून कुणाचा संशय आहे का?”

“नाही. नाही. तसे मुळीच नाही. हे माझे नेहमीचेच काम आहे. ते महत्वाचे आहे. आणि मृत मिस्टर गॅसकॉइन त्यात बरोबर बसत नाहीत. सर्व काही चुकते आहे.”

“मला तर खरेच काही समजत नाही.”

पायरो पुटपुटला, “त्रास हा आहे, की खूप वाईट गोष्टी एकत्र आल्या आहेत.”

‘काय म्हणता आहात, सर?”

पायरो हसला. ”डॉक्टर, तुम्हाला लवकरच मला वेडा म्हणून बंद करायला लागणार आहे. पण खरे तर मी काही मानसिक रुग्ण नाही. फक्त शिस्तप्रिय व पद्धतशीर माणूस आहे. आणि माझ्या त्या साच्यात जेव्हा गोष्टी बसत नाहीत, तेव्हा मी दुःखी होतो. तुम्हाला इतका त्रास दिल्याबद्दल, मला माफ करा.”

तो उठला. डॉक्टरही उठले.

मॅकअड्र्यु म्हणाला, “खरे तर मला मिस्टर गॅसकॉइन यांच्या मृत्यूत अजिबात काहीही संशयास्पद दिसत नाही. मी म्हणतो, तो पडला --- तुम्ही म्हणता, त्याला कोणीतरी ढकलले. एवढेच --- ठीक आहे --- सगळे धूसरच आहे.”

पायरोने सुस्कारा टाकला.

तो म्हणाला, “हो, हे कामगारासारखे आहे. कोणीतरी ते चांगले काम करून ठेवले आहे.”

“तुम्हाला अजूनही वाटते --- “

त्या लहानशा माणसाने त्याचे हात पसरले. “मी हट्टी माणूस आहे. थोडी कल्पनाशक्ती असलेला माणूस --- आणि त्याला आधार काहीही नाही. तसेही, हेन्री गॅसकॉइनला खोटे दात होते का?”

“नाही, त्याचे दात खरे होते आणि ते चांगले होते. या वयाला हे खरेच कौतुकास्पद होते.”

तो त्यांची नीट काळजी घेत असे --- ते पांढरे शुभ्र होते आणि नेहमी छान घासले जात. का?”

“हो, मी ते लक्ष देऊन पाहिले होते. माणूस वयाने वाढत गेल्यावर ते थोडे पिवळे होऊ लागतात, पण ते चांगल्या अवस्थेत होते.”

“रंग उडाला नव्हता?

“नाही, मला वाटते, तो सिगरेट ओढत नसे. म्हणजे तुम्हाला तसे म्हणायचे असेल तर.”

“मला तसे म्हणायचे नव्हते --- हा त्याच्या मृत्यूचा तपास म्हणजे खूप लांबचा पल्ला आहे. तो इतक्यात संपणार नाही. डॉक्टर मॅकअड्र्यु, अच्छा आणि तुमच्या दयाळूपणाबद्दल आभार”

त्याने डॉक्टरांशी हातमिळवणी केली व निघाला.

तो म्हणाला, “आणि आता, लांबचा पल्ला सुरु.”

गालॅन्ट एन्डेव्होअरमध्ये तो बोनीग्टनबरोबर ज्या टेबलावर बसला होता, त्याच टेबलावर बसला. पण त्यांची वेटर मुलगी मॉली नव्हती. जी होती ती मुलगी म्हणाली की मॉली रजेवर आहे.

फक्त सात वाजले होते आणि पायरोला त्या मुलीबरोबर जुन्या मिस्टर गॅसकॉइन या विषयावर संभाषण सुरु करायला काही त्रास पडला नाही.

ती म्हणाली, “हो, तो इथे खूप वर्षे येत होता. पण आम्हा मुलींपैकी कुणाला त्याचे नाव माहिती नव्हते. आम्ही वर्तमानपत्रात कायदेशीर कारवाईबद्दल वाचले आणि तिथे त्याचे चित्रही होते. तेव्हा मी मॉलीला म्हणाले, “हा बघ, हाच आपला म्हातारबाबा नाही का? आम्ही त्याला तसे संबोधत असू.”

“तो त्याच्या मरणाच्या दिवशी इथे जेवला ना?”

“हो, तीन तारखेच्या गुरुवारी. तो दर गुरुवारी इथे येत असे. मंगळवारी आणि गुरुवारी ---अगदी घडयाळाच्या काटेकोरपणे.”

“मला वाटते, तुला आठवत नाही, तो काय पदार्थ मागवत असे?”

“आता मी आठवते, तो मुलीगटावनी सूप, गाईच्या मासाचे पुडिंग की मटण? नाही पुडिंग नाही. बरोबर काळया बेरी आणि सफरचंदाचा केक आणि चीज. हे खाऊन मग तो घरी गेला, मग त्याच संध्याकाळी जिन्यावरून पडला. त्याने जीर्ण गाउन घातला होता. त्याच्या नाडीने त्याचा घात झाला. अर्थात, त्याचे कपडे नेहमीच विचित्र असत --- जुन्या फॅशनचे, फाटके आणि तरीही त्याला, तो कुणी खास असल्यासारखा, एक प्रकारचा अभिमान असे. ओहो, आमच्या इथे खूप रुचीपूर्ण लोक येतात.”

ती गेली.

पायरोने मनसोक्त खाल्ले. त्याच्या डोळयात हिरवा प्रकाश दिसू लागला. तो स्वतःशी बोलला, “हे विचित्र आहे. अगदी हुशार लोकदेखील महत्वाची इत्यंभूत माहिती विसरतात. बोनीग्टनला यात रुची असेल.”

पण अजून बोनीग्टनबरोबर आरामशीरपणे चर्चा करायची वेळ आली नाही. अचानक व आक्रमकपणे झालेल्या मृत्यूंची दखल घेणाऱ्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्याशी ओळख होऊन, पायरो सहज बोलू लागला.

“रोगिष्ट गॅसकॉइन ही एक नवलपूर्ण व्यक्ती होती. एकाकी, विचित्र माणूस. पण त्याच्या आजाराने असामान्य रीत्या लक्ष वेधून घेतले, नाही का?”

बोलतांना, तो पाहुण्याकडे काहीशा उत्सुकतेने पहात होता.

पायरोने काळजीपूर्वक शब्द वापरले. “मिस्टर, परिस्थिती त्याबरोबर जोडलेली असते. त्यामुळे तपास करावासा वाटतो.”

“ठीक आहे, मी तुम्हाला कशी मदत करू शकतो?”

“मला वाटते, तुमच्या आधिपत्याखाली असलेल्या भागात, कोर्टात सादर केलेली कागदपत्र नाहीशी करायला सांगून किंवा ताब्यात घेऊन. हेन्री गॅसकॉइनच्या गाउनच्या खिशात पत्र सापडले होते, नाही का?”

“हो, बरोबर.”

“ते त्याच्या पुतण्याचे, डॉ जॉर्ज लॉरीनरचे होते?”

“बरोबर. मरणाची वेळ निश्चित करण्यासाठी ते कोर्टात वापरले गेले.”

“वैद्यकीय पुराव्याबरोबर ते खात्रीने जुळले?”

“तंतोतंत.”

“अजून ते बघायला मिळेल का?”

पायरो उत्सुकतेने उत्तरासाठी थांबला.

जेव्हा त्याला समजले, की ते त्याला परीक्षण करण्यासाठी मिळू शकते, तेव्हा त्याने सुटकेचा निःश्वास टाकला. शेवटी जेव्हा ते त्याच्या हातात पडले, तेव्हा त्याने ते नीट अभ्यासले. ते थोडे वेड्यावाकड्या अक्षरात, झरझर उठणाऱ्या फाऊन्टन पेनने लिहिलेले होते. ते असे होते:

प्रिय हेन्री काका,

मला तुम्हाला सांगायला खेद होतो, की मला अँथनीकाकांच्या बाबतीत यश आले नाही. तुम्हाला भेटायला जाण्याच्या बाबतीत त्यांनी उत्साह दाखवला नाही. ‘झाले ते झाले’ या तुमच्या विनंतीला त्यांनी उत्तर दिले नाही. अर्थात ते खूप आजारी आहेत. आणि त्यांच्या मनात फिरायचे आहे. मला वाटते, की त्यांचा शेवट जवळ आला आहे. त्याना तुम्ही जवळजवळ आठवत नाही. मी यशस्वी झालो नाही, म्हणून मला माफ करा. पण मी माझ्याकडून शक्य ते प्रयत्न केले.

तुमचा प्रेमळ पुतण्या,

त्यावर तीन नोव्हेंबर ही तारीख होती. पायरोने पोस्टाच्या शिक्क्याकडे पाहिले. दुपारचे ४: ३०, ३ नोव्हे.

तो पुटपुटला, “हे अगदी व्यवस्थित लिहिले आहे, नाही का?”

किंगस्टन हिल्स त्याचे पुढचे उद्दिष्ट होते. थोडा त्रास घेतल्यावर, चांगल्या तऱ्हेच्या विनोदीपणाला चिकटून राहिल्यावर, त्याला मृत अँथनी गॅसकॉइन याची स्वयंपाकीण व घर सांभाळणारी, अमिलीया हिल हिची मुलाखत घ्यायची संधी मिळाली.

पहिल्यांदा मिसेस हिलकडे तो गेला. ती संशयी व कडक होती. दिसायला विचित्र असलेल्या पण मित्रत्वाने व आनंदाने वागणाऱ्या परदेशी माणसाने दगडावरसुद्धा परिणाम घडवला असता. मिसेस अमिलीया हळूहळू सौम्य होऊ लागली. इतर बायकांप्रमाणे ती तिचे त्रास सहानुभूतीने ऐकणाऱ्या माणसाला भरभरून सांगू लागली.

गेली चौदा वर्षे ती मिस्टर गॅसकॉइनच्या घराची देखभाल व स्वयंपाक करत होती --- ते काही सोपे काम नव्हते. खरेच सोपे नव्हते. त्या ओझ्याने अनेक बायकांनी ते काम सोडले होते. पण मिसेस अमिलीयाने ते निभावून नेले. तो बिचारा माणूस जरा विचित्र होता, हे न नाकारता, मिसेस अमिलीया विश्वासूपणे ते काम करत राहिली. त्याच्या लहरी सांभाळत राहिली. त्यामुळे नैसर्गिकपणे, तिची अपेक्षा होती, की ती कायम

आठवणीत रहावी. पैशांचा त्याला जरा गर्व होता. तो बऱ्यापैकी श्रीमंत होता. पण नाही. तिला काहीच मिळाले नाही. त्याच्या जुन्या इच्छापत्रा प्रमाणे, सगळी संपत्ती त्याच्या बायकोला आणि ती त्याच्या आधी वारली, तर भावाला, हेन्रीला मिळणार होती. हे इच्छापत्र खूप वर्षांपूर्वी केलेले होते आणि चांगले वाटत नव्हते.

हळूहळू पायरोने तिला असमाधानातून, पैशांच्या लोभातून बाहेर काढले. हा खरेच निष्ठुर अन्याय होता. मिसेस हिलला नवल वाटले व दुखावल्यासारखे वाटले, तर त्यात काही गैर नव्हते. हे सर्वश्रुत होते, की मिस्टर गॅसकॉइन पैशाच्या बाबतीत चिक्कू होता. असेही बोलले जात होते, की त्याने त्याच्या एकुलत्या एक भावाची मदत नाकारली होती. मिसेस हिलला बहुधा हे सर्व माहिती होते.

मिसेस हिलने विचारले, “डॉ लॉरीमर मालकांना भेटायला आले होते का? मला माहिती होते, की ते त्यांच्या भावासंबंधी काही होते. पण मला वाटले, ते इतकेच होते, की त्यांच्या भावाला परत नाते जोडण्याची इच्छा होती. अनेक वर्षांपूर्वी त्यांचे भांडण झाले होते.”

पायरो बोलला, “मला समजले आहे, की मिस्टर गॅसकॉइनने म्हणे पूर्णपणे नकार दिला?”

मिसेस हिल मान हलवत म्हणाली, “ते खरेच आहे. हेन्रीचा भाऊ थोडा अशक्त असल्यासारखे म्हणे, “हे हेन्रीचे काय चालले आहे? त्याला

खूप वर्षात भेटलो नाही व त्याला भेटायची इच्छाही नाही. तो भांडखोर आहे. तो होता, तसाच आहे.”

नंतर संभाषण मिसेस हिलच्या स्वतःच्या विशेष दुःखाकडे व मिस्टर गॅसकॉइनच्या वकिलाच्या कठोर दृष्टीकोनाकडे वळले.

पायरोने एकदम तोडल्यासारखे संभाषण न संपवता, कसाबसा काढता पाय घेतला.

आणि त्यामुळे, तो जेवणाच्या वेळेनंतर, विम्बल्डन येथील डोरसेट रस्त्यावरील एल्मक्रेस्टला आला. ते डॉ लॉरीमरचे निवासस्थान होते. तो नुकताच जेऊन उठला होता.

पायरोला शस्त्रक्रियेच्या खोलीत बसवण्यात आले आणि डॉ लॉरीमर तिथे आला.

पायरो म्हणाला, “मी काही रोगी नाही. आणि कदाचित माझे इथे येणे तुम्हाला अधीरपणाचे वाटले असेल --- पण मी म्हातारा माणूस आहे आणि माझा एकमेकांशी सरळसरळ बोलण्यावर विश्वास आहे. मी वकिलांची व त्यांच्या लांबलचक पद्धतींची काही पर्वा करत नाही.”

त्याने नक्कीच लॉरीमरचे स्वारस्य वाढवले. लॉरीमर घोटून दाढी केलेला, मध्यम उंचीचा माणूस होता. त्याचे केस तपकिरी होते, पण पापण्या जवळजवळ पांढऱ्या झाल्या होत्या. त्यामुळे त्याचे डोळे मंद दिसत होते. त्याची पद्धत झटपट स्वरूपाची व विनोदी नसलेली वाटत होती.

तो भुवई चढवत म्हणाला, “वकील? मी त्यांचा द्वेष करतो. माझ्या आवडत्या सर, तुम्ही माझी रुची वाढवली आहे. आपण बसा.”

पायरो बसला आणि त्याचे व्यवसायिक कार्ड पुढे केले व डॉक्टरला दिले.

जॉर्ज लॉरीमरच्या पांढऱ्या पापण्या फडफडल्या

पायरो आत्मविश्वासाने पुढे वाकला. “माझ्या बऱ्याच पक्षकार बायका असतात.”

डोळे मिचकावत, लॉरीमर म्हणाला, “नैसर्गिकपणे असणारच.”

पायरोने कबूल केले, “तुम्ही नैसर्गिकपणे असे म्हणत आहात. पण त्या पोलीस वरिष्ठांना विश्वासात घेत नाहीत. त्यांना खासगी गुप्तहेर बरा वाटतो. त्याना त्यांचे त्रास जाहीर करायचे नसतात. काही दिवसांपूर्वी एक वयाने मोठी बाई माझ्याकडे सल्ला मागायला आली. ती अनेक वर्षांपूर्वी भांडलेल्या नवऱ्याबाबत सुखी नव्हती. हा नवरा म्हणजे तुमचे काका, कैलासवासी मिस्टर गॅसकॉइन.”

जॉर्ज लॉरीमरचा चेहरा जांभळा झाला.

“माझे काका? तुम्ही काहीही सांगता आहात. माझी काकू वारली, त्याला अनेक वर्षे झाली.”

“तुमचे काका अँथनी गॅसकॉइन नव्हे, हेन्री गॅसकॉइन.”

“हेन्रीकाका? पण त्यांचे तर लग्न झाले नव्हते!”

पायरो न लाजता म्हणाला, “हो, झाले होते. त्याबद्दल काही संशय नाही. त्या बाईने लग्नाचे प्रमाणपत्रदेखील आणले होते.”

जॉर्ज लॉरीमर ओरडला, “हे खोटे आहे.” आता त्याचा चेहरा प्लम सारखा जांभळा झाला होता. ”माझा यावर विश्वास नाही. तुम्ही त्यांची मानहानी करत आहात. खोटारडे आहात.”

पायरो म्हणाला, “हे फार वाईट आहे, नाही का? तुम्ही काही कारण नसतांना खून केला आहे.”

लॉरीमरचा आवाज थरथरला. त्याचे मंद डोळे भीतीने फुगले. “खून?”

पायरो म्हणाला, “तसेही मी तुम्हाला काळ्या बेरींचा केक परत खाताना बघतो आहे. शहाणी नसलेली सवय. काळ्या बेरींमध्ये भरपूर जीवनसत्वे असतात, पण दुसऱ्या तऱ्हेने त्या प्राणघातक असू शकतात. या प्रसंगी मला वाटते, त्यानी एका माणसाच्या मानेभोवती फास आवळायला मदत केली आहे. तुमची मान, डॉक्टर लॉरीमर.”

पायरो शांतपणे मिरवत, टेबलाच्या दुसऱ्या बाजूने म्हणाला, “असे बघ माझ्या मित्रा, तुझी पायाभूत गृहीतकेच चुकली. खूप मानसिक ताण असलेली व्यक्ती त्या वेळी, त्याने पूर्वी कधी केले नाही, असे काही करत नाही. त्याची सहजप्रवृत्ती कमीत कमी विरोध असणारा मार्ग निवडते. जो

मनुष्य काही कारणाने उदास झाला आहे, तो जेवायला नक्कीच त्याच्या स्वतःच्या पायजम्यात येईल --- दुसऱ्याच्या नव्हे.

ज्या माणसाला दाट सूप, , गाईच्या मासाचे पुडिंग व काळया बेरीज आवडत नाहीत, तो अचानक एका संध्याकाळी ते मागवतो. तुम्ही म्हणता, की त्याने असे करायचे कारण, तो काही वेगळा विचार करत होता. पण मी म्हणतो, ज्याच्या मनात काही वेगळे विचार चालू आहेत, तो सहजपणे त्याने अनेक वेळा मागवलेले पदार्थच मागवेल.

"ठीक आहे, मग दुसरे कुठले स्पष्टीकरण असू शकते? मला तर दुसरे काही योग्य असे स्पष्टीकरण दिसत नाही. मग मी काळजीत पडलो. सगळी घटना चुकीची होती. ती चपखल बसत नव्हती. माझे मन शिस्तशीर आहे. आणि मला गोष्टी चपखल बसलेल्या आवडतात. मिस्टर गॅसकॉइनने केलेल्या जेवणाच्या विचित्र मागणीने, मी नाराज झालो.

"मग तुम्ही मला सांगितलेत, की तो मनुष्य नाहीसा झाला. त्याने वर्षभरात पहिल्यांदाच मंगळवार व गुरुवार चुकवला. मला ते अगदी कमी आवडले. माझ्या मनात काहीबाही विचार येऊ लागले. जर ते खरे असते, तर तो मनुष्य मरण पावला होता. मी चौकशी केली. तो मेला होता. आणि फार चांगल्या तऱ्हेने, व्यवस्थितपणे मेला. दुसऱ्या शब्दात, उग्र वासाचे सॉस आतील खराब मासा लपवते. पण तळाशी काही चांगले नसते.

किंग्ज रस्त्यावर तो सात वाजता दिसला होता. इथे त्याने साडेसातला जेवण केले. मरणापूर्वी दोन तास --- हे सर्व चपखल बसले --

- पोटातील पदार्थांचा पुरावा, पत्राचा पुरावा. फार सॉस होते. इतके की खालील मासा दिसतच नव्हता!”

एकनिष्ठ पुतण्याने पत्र लिहिले. ते मरणाची वेळ निश्चित करण्यासाठीचा पुरावा ठरले. मरण खूप साध्या तऱ्हेने आले. जिन्यातून पडल्याने. साधा अपघात? साधा खून? पण प्रत्येकजण खून म्हणतो.

नेक पुतण्याच फक्त जिवंत नातेवाईक. नेक पुतण्यालाच सगळे मिळेल --- पण मिळण्यासारखे काही आहे का? काका गरीब असल्याचे सर्वश्रुत आहे.

पण भाऊ कुठे गरीब आहे? आणि त्याने त्या काळात श्रीमंत बाईशी लग्न केले होते. तो किंग्स्टन रस्त्यावर मोठ्या, श्रीमंत घरात रहात होता. त्यामुळे असे वाटेल, की त्याच्या श्रीमंत बायकोने त्याला सर्व पैसे ठेवले असतील. तुम्ही ही साखळी कशी आहे, ते पहा. श्रीमंत बायको अँथनीला पैसे ठेवते, अँथनी ते हेन्रीसाठी ठेवतो आणि हेन्रीचा पैसा जॉर्जला जातो --- पूर्ण साखळी.”

बोनीग्टन म्हणाला, “ही गोष्ट ऐकायला बरी आहे, पण तू काय केलेस?”

“एकदा तुम्हाला माहिती झाले, की सहसा --- तुम्हाला हवे असलेले तुम्ही मिळवू शकता. हेन्री जेवणानंतर दोन तासांनी मेला. ती माहितीच त्रास देत होती. समजा जेवण रात्रीचे नसून, दुपारचे होते असे

धरले, तर तुम्हाला जॉर्जच्या जागी बघा. जॉर्जला पैसे हवे आहेत --- त्याला फारच गरज आहे. अँथनी गॅसकॉइन मरतो आहे --- पण हे मरण जॉर्जसाठी फारसे चांगले नाही. कारण त्याचे पैसे हेन्रीला मिळणार आहेत. आणि हेन्री गॅसकॉइन अजून कितीही वर्षे जगेल. त्यामुळे हेन्री पण मेला पाहिजे --- आणि जितक्या लवकर मरेल, तेवढे चांगले --- पण तो अँथनीनंतर मरायला पाहिजे. आणि जॉर्जकडे पुरावा पाहिजे. आठवड्यातून दोन वेळा हॉटेलात जेवायची हेन्रीची सवय जॉर्जला पुरावा सुचवते. काळजी घेणारा असल्यामुळे, तो पहिल्यांदा त्याचा बेत ठरवतो. तो त्याच्या काकांना सोमवारी संध्याकाळी त्या नेहमीच्या हॉटेलात जायला लावतो. ते सुरळीत पार पडते. तेथील सगळे त्याला लॉरीमरचा काका म्हणून मान्य करतात. त्याला समाधान मिळते. आता त्याला फक्त अँथनीकाका मरेपर्यंत वाट बघायची आहे. ती वेळ येते. तो त्याच्या काकांना दोन नोव्हेंबरला दुपारी पत्र लिहितो. पण त्यात तीन नोव्हेंबर तारीख लिहीतो. तो तीन तारखेला दुपारी त्याचा बेत प्रत्यक्षात आणतो. गावात येतो. काकांना फोन करतो. एक निसरडे वळण आणि जिन्यावरून हेन्रीकाका कोसळतात. तो काकांच्या गाउनच्या खिशात पत्र ठेवतो. दाढी, केसाळ भुवया असा सर्व जामानिमा करून . साडेसातला तो गालॅन्ट एन्डेव्होअरमध्ये जातो. निःसंशय मिस्टर हेन्री गॅसकॉइन साडेसातला जिवंत आहेत. नंतर बाथरुममध्ये जाऊन झटपट जामानिमा बदलणे आणि गाडीने जोरात विम्बल्डनला जाऊन, संध्याकाळी क्लबमध्ये ब्रिज खेळायला जाणे. हुशारीचा पुरावा.”

मिस्टर बोनीग्टन पायरोकडे बघतात. "पण पत्रावरील पोस्टाचा शिक्का?"

"ओहो, ते फार सोपे असते. पोस्टाचा शिक्का पुसट असतो. का? तो दिव्याच्या काजळीने दोन नोव्हेंबर या तारखेचा तीन नोव्हेंबर केलेला असतो. तुम्ही नीट बघितलेत, तरच तो तुम्हाला दिसतो. आणि शेवटी काळे पक्षी उडतात."

"काळे पक्षी?"

"केकमध्ये भाजलेले चोवीस काळे पक्षी! किंवा तुम्हाला पाहिजे तर काळया बेरीज म्हणू शकता. जॉर्ज, तुला समजले असेल, की तू फार चांगला नट नाहीस. तुला एकजण आठवतो का, ज्याने ऑथेल्लो साकारण्यासाठी, स्वतःला काळे रंगवून घेतले होते? गुन्ह्यातला अभिनय तसा करावा लागतो. जॉर्ज त्याच्या काकांसारखा दिसत होता. तसाच चालत होता. तसाच बोलत होता. तशाच भुवया आणि दाढी होती. पण तो काकांसारखे जेवायला विसरला. त्याने त्याला आवडणारे पदार्थ मागवले. काळया बेरीजनी दातांचा रंग जातो --- पण प्रेताच्या दातांचा रंग गेलेला नव्हता. तरी हेन्रीने गालँन्ट एन्डेव्होअरमध्ये त्या संध्याकाळी काळया बेरीज खाल्ल्या. पण पोटात काळया बेरीज नव्हत्या. मी सकाळी विचारले. आणि जॉर्ज इतका मूर्ख आहे, की त्याने अजूनही खोटी दाढी आणि भुवया तशाच ठेवल्या होत्या. ओहो! तुम्ही शोधलेत तर तुम्हाला पुष्कळ पुरावा सापडतो. मी जॉर्जला बोलावून त्याला पकडले. तेव्हा हे प्रकरण संपले. तो परत काळया

बेरीज खात होता. तसेही, तो अधाशी होता --- स्वतःच्या खाण्याची त्याला चांगलीच काळजी असायची. आता माझे काही चुकले नसेल तर, ती हाव त्याला फासावर लटकवेल”

वेट्रेसने त्यांना दोन ताटल्या काळया बेरीज आणि सफरचंदाचा केक आणला.

THE THIRD FLOOR FLAT

# तिसऱ्या मजल्यावरील सदनिका




एक भुवई वर करत, पॅट संध्याकाळच्या लहानशा, रेशमी बॅगेत काही शोधताना रानटीपणे बोलली, "अरे भावा!

दोन तरुण माणसे आणि दुसरी मुलगी तिला अस्वस्थपणे न्याहाळत होते. ते सर्वजण पॅट्रीशिया उर्फ पॅट गार्नेटच्या सदनिकेच्या बंद दाराबाहेर उभे होते.

पॅट बोलली, “हे चांगले नाही. किल्ली तर नाही. आणि आता आपण काय करायचे?”

जिमी फाउलकेनर पुटपुटला, “दाराची किल्ली असल्याशिवाय कसले आयुष्य? तो बुटका, रुंद खांद्यांचा, स्वभावाने चांगला, निळ्या डोळयांचा तरुण मनुष्य होता.

पॅट त्याच्याकडे रागाने वळली. “विनोद करू नकोस. जिमी, हे गंभीर आहे.”

डोनोव्हन बेले म्हणाला, “पॅट, परत एकदा पहा. ती तिथेच कुठेतरी असली पाहिजे.” त्याचा आवाज आळशी पण मंजुळ होता. तो त्याच्या नम्र, काळ्या आकृतीला शोभत होता.

दुसरी मुलगी, मिल्ड्रेड होप म्हणाली, “तू नेहमी तर ती पर्समधून बाहेर काढतेस.”

पॅट बोलली, “अर्थात मी ती बाहेर काढते. माझा विश्वास आहे, मी ती तुम्हा दोघांपैकी एकाला दिली.” ती त्या माणसांकडे शिव्या देत वळली.

“मी डोनोव्हनला म्हटले, ती माझ्यासाठी घे.”

पण तिला दोष द्यायला इतक्या सहज कुणी सापडला नसता. डोनोव्हनने किल्ली घेतल्याचे नाकारले आणि जिमीने त्याला अनुमोदन दिले.

जिमी पॅटकडे बघून बोलला, “मी स्वतः तुला ती तुझ्या बॅगेत ठेवतांना बघितले.”

“म्हणजे आता तुमच्या दोघांपैकी कुणीतरी माझी बॅग उचलली, तेव्हा ती पाडली. मीदेखील एकदोनदा ती पाडली होती.”

डोनोव्हन म्हणाला, “एकदोनदा! शक्य त्या प्रत्येक प्रसंगी, ती नीट ठेवण्याऐवजी, तू ती खूप वेळा पाडली आहेस.”

जिमी म्हणाला, “मला समजत नाही, प्रत्येक वेळी अशी गोष्ट बाहेर कशी पडत नाही!”

मिल्ड्रेड बोलली, “मुद्दा असा आहे --- आपण ती कशी मिळवणार आहोत?

ती एक शहाणी मुलगी होती. ती मुद्द्याला धरून बोलली. पण ती हट्टी आणि त्रासदायक असून, पॅटइतकी आकर्षक नव्हती.

ते चौघेही बंद दाराकडे दिग्मूढ होऊन बघत बसले.

जिमीने सुचवले, “हमाल मदत करू शकेल का? त्याच्याकडे सर्व कुलुपांना चालणारी मास्टर किल्ली किंवा तसे काही असेल का?”

पॅटने डोके हलवले. “फक्त दोन किल्ल्या होत्या. एक सदनिकेच्या आत स्वयंपाकघराच्या भिंतीला लावलेली होती आणि दुसरी त्या बेकार बॅगेत होती.”

पॅट रागाने बोलली, “जर सदनिका तळमजल्यावर असती, तर आपण बाहेरून खिडकी उघडली असती किंवा तोडली असती. डोनोव्हन, तुला मांजरचोर व्हायला आवडणार नाही का? की आवडेल?”

डोनोव्हनने मांजरचोर व्हायला ठामपणे, पण नम्रपणे नकार दिला.

जिमी म्हणाला, “चौथ्या मजल्यावरील सदनिका परवडली असती.”

“आग लागल्यावरच्या मार्गाचे काय?”

“तो नाही आहे.”

जिमी म्हणाला, “असलाच पाहिजे. पाच मजली उंच इमारतीला आग लागल्यास निसटायचा मार्ग असलाच पाहिजे.”

पॅट बोलली, “मी असे बोलण्याचे धाडस करते, की आपल्याला कसली मदत मिळणार नाही. मी माझ्या सदनिकेत कशी जाणार?”

डोनोव्हन म्हणाला, “इथे तात्पुरते विसरलेले किंवा मुद्दाम दुर्लक्ष केलेले असे त्याप्रकारचे कुणी नाही का? व्यापारी लोक त्यांचा माल कसा वर पाठवतात?”

पॅट बोलला, “वस्तु वर पाठवायची लिफ्ट. हो. हो. पण ती म्हणजे फक्त वायरची टोपली असते --- ओहो थांब --- मला माहिती आहे. कोळशाच्या लिफ्टचे काय?”

डोनोव्हन म्हणाला, “आता, ही छान कल्पना आहे.”

मिल्ड्रेडने एक खच्ची करणारी सूचना केली. ती म्हणाली, “तिला कडी असेल. पॅटच्या स्वयंपाकघरात, म्हणजे आतील बाजूने.”

पण ती कल्पना लगेच फेटाळून लावण्यात आली.

डोनोव्हन म्हणाला, “तुझा विश्वास नाही का?”

जिमी म्हणाला, “पॅटच्या स्वयंपाकघरात कडी नसेल. पॅट कधीच कड्याकुलुपे लावत नाही.”

पॅट म्हणाली, “मला नाही वाटत, की त्याला कडी लावलेली असेल. आज सकाळी मी केराची बादली रिकामी केली. आणि मला नक्की असे वाटते, की मी नंतर कडी लावली नाही व नंतर तिकडे गेलेही नाही.”

डोनोव्हन म्हणाला, “ठीक आहे. ती आपल्याला आज रात्रीसाठी फार उपयुक्त गोष्ट आहे. तसेच पॅट, मला तुला हे सांगू दे, की या भोंगळ सवयींमुळे तू दर रात्री, फक्त मांजरानाच नव्हे तर चोरांना आमंत्रण देते आहेस.”

पॅटने तिकडे साधेपणाने दुर्लक्ष केले.

ती ओरडली, “चला.” व ती जिन्यावरून धावत सुटली. बाकीचे तिच्यामागे गेले. पॅटने त्यांना अंधाऱ्या, बाबागाड्यांनी भरलेल्या जागेतून व दुसऱ्या चांगल्या सदनिकांच्या दारातून उजव्या लिफ्टकडे नेले. तिथे त्या क्षणी एक कचरा बादली होती. डोनोव्हनने ती उचलली व काळजीपूर्वक

रीत्या, ती उंचवट्यावर पायरीसारखी ठेवली. त्याने नाकाला सुरकुत्या पाडल्या.

त्याने शेरा मारला, ‘थोडा घाणेरडा वास येतो आहे. पण त्याचे काय एवढे? मी एकटाच हे साहस करू, की कोणी माझ्याबरोबर येणार आहे”?”

जिमी म्हणाला, मी येतो.”

तो डोनोव्हनच्या बाजूला गेला. तो संशयपूर्वक म्हणाला, “मला वाटते लिफ्ट माझे वजन घेईल.”

वजन आणि उंचीच्या तक्त्यात विशेष बुद्धी न चालणाऱ्या पॅटने म्हटले, “एक टन कोळशापेक्षा तुझे वजन जास्त नसेल.”

डोनोव्हन दोरीवर लोंबकळत आनंदाने बोलला, “आणि काही झाले तरी आपण लवकरच शोधून काढू.”

मोठ्या आवाजासकट, ते नाहीसे झाले.

ते अंधारातून गेल्यावर, जिमी म्हणाला, “ही गोष्ट फारच आवाज करते. इतर सदनिकांमधले लोक काय विचार करतील?”

डोनोव्हन म्हणाला, “मला वाटते, आपण त्याना चोरांची भुते वाटू.” या दोरीला टांगणे मोठे अवघड काम आहे. फेरीयर मॅँन्शनचे हमाल माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त काम करतात. जिमी, मी म्हणतो, तू मजले मोजतो आहेस का?”

“अरे देवा, नाही. मी ते विसरलोच.”

“ठीक आहे मी ते करतो आहे. आता आपण तिसऱ्याच्या वर गेलो. पुढचा आपला आहे.”

जिमी गुरगुरला, “आणि आता मला वाटते, बहुतेक पॅटने दाराला कडी लावलेली असेल.”

पण ही भीती निराधार ठरली. हात लावल्याबरोबर दार उघडले. जिमी आणि डोनोव्हन पॅटच्या निळसर अंधाऱ्या स्वयंपाकघरात शिरले.

डोनोव्हन उद्गारला, “आपण या रानटी अंधारातील कामासाठी विजेरी जवळ ठेवायला हवी होती. मला पॅटचे काम माहिती आहे. तिचे सर्व सामान जमिनीवर असते. मी दिव्यांच्या बटनांशी पोचण्यापूर्वी सर्व काचेच्या वस्तु फोडून टाकण्याची शक्यता आहे. जिमी, मी दिवा लावेपर्यंत, हलू नकोस.”

तो जमिनीवरून काळजीपूर्वक चालत गेला. त्याच्या तोंडाने “च्यायला!” अशा शिव्या फुटत होत्या. स्वयंपाकघरातील टेबलाचा कोपरा लागून त्याच्या बरगडीत दुखले. तो बटनापर्यंत पोचला. आणि पुढच्याच क्षणी, अंधारातून, त्याच्या तोंडून परत शिवी उमटली.

जिमीने विचारले, “काय झाले?”

“दिवा लागत नाही. दिवा गेला असावा. थांब मी हॉलमधला दिवा लावतो.”

पॅसेजनंतर लगेच हॉलचे दार होते. जिमीने त्याला दारातून जाताना ऐकले.

आणि लगेच त्याला शिव्याशाप ऐकू आले. तो स्वतः स्वयंपाकघरातून वाट काढत होता.

“काय झाले?”

“मला महिती नाही. मला वाटते, रात्री खोल्या जादूभरी भूल घालत आहेत. सगळे वेगळया जागी असल्याचे भासत आहे. टेबल खुर्च्या तुम्हाला वाटत आहे, त्यापेक्षा वेगळयाच जागी आहेत. अरेरे, अजून एक तडाखा!”

पण यावेळेस जिमीला नशीबाने दिव्याचे बटन सापडले. त्याने ते दाबले. दुसऱ्या मिनिटाला ते दोघे तरुण भीतीयुक्त शांतपणे एकमेकांकडे बघत होते. ते पॅटच्या हॉलमध्ये बसले नव्हते. ते चुकीच्या सदनिकेत आले होते.

सुरवातीला ती खोली पॅटपेक्षा दहापट सामानाने भरलेली होती. त्यामुळे डोनोव्हन सतत नजरेचे बाण खुर्च्या व टेबलांकडे मारून घाबरून गेल्याने, दयनीय दिसत होता. खोलीच्या मध्यभागी एक मोठे गोल टेबल होते. त्यावर पत्त्यांच्या टेबलावर घातले जाते तसे हिरवे लोकरीच्या कापडाचे आच्छादन घातले होते. आणि तिथे खिडकीत लिलीसारखे एशियन झाड होते. ती खरे तर अशी खोली होती, त्या दोघा तरुणांना वाटत

होते, की या सदनिकेच्या मालकाला हे स्पष्ट करणे अवघड आहे. शांतपणे ते भीतीने पत्रांची थप्पी पडलेल्या टेबलाकडे बघत होते.

डोनोव्हन श्वास घेत पत्र उचलून त्यावरील नाव वाचत म्हणाला, “मिसेस एर्नेस्टाइन ग्रँट, ओहो, तुला असे वाटते का, तिने आपल्याला ऐकले?

जिमी म्हणाला, तिने ऐकले नसेल, तर तो चमत्कार म्हणायला पाहिजे. काय तुझी भाषा आणि काय तुझे फर्निचरमध्ये धाडकन बसणे! चल, कृपा करून इथून झटपट बाहेर पडू.”

त्यांनी घाईने दिवा बंद केला आणि परत दबक्या पाऊलांनी लिफ्टकडे गेले. पुढे अजून काही गैरप्रकार न होता, तिथून बाहेर पडल्यामुळे, जिमीने सुटकेचा निःश्वास टाकला.

तो भलावण करत म्हणाला, “मला चांगली गाढ झोपणारी बाई आवडते. मिसेस एर्नेस्टाइन ग्रँटला चांगले गुण मिळाले.”

डोनोव्हन म्हणाला, “आता मला असे कळते आहे, की आपण मजला मोजण्यात का चूक केली. आपण तळमजल्यापासून मोजायला सुरवात केली.”

तो दोरीवर लटकला आणि लिफ्ट सुरु झाली. “यावेळेस आपण बरोबर जाऊ.”

अजून दुसऱ्या अंधाऱ्या विवरात शिरत, जिमी म्हणाला, “मी मनापासून तशी इच्छा करतो. आता अजून धक्के माझ्या मज्जातंतूना सहन होणार नाहीत.”

पण नंतर मज्जातंतूंवर अजून ताण पडला नाही. पहिला उजेडाचा कवडशाने त्याना पॅटचे स्वयंपाकघर दाखवले. दुसऱ्या मिनिटाला, ते पुढचे दार उघडून, बाहेर थांबलेल्या दोन मुलींना आत घेत होते.

पॅट टगुरगुरली, “तुम्हाला फारच वेळ लागला. मिल्ड्रेड आणि मी इथे युगानुयुगे थांबलो आहोत.”

डोनोव्हन म्हणाला, “आम्ही एक साहस केले. आम्हाला धोकादायक गुन्हेगार म्हणून, पोलीस चौकीत अटक व्हायची पाळी येऊ शकली असती.”

पॅट हॉलमध्ये गेली. तिथे तिने दिवा लावला. तिने खूप रस घेऊन, डोनोव्हनकडून त्याच्या साहसाचे वर्णन ऐकले. तिने शेरा मारला, “तिने तुम्हाला पकडले नाही, म्हणून मला आनंद झाला. माझी खात्री आहे की ती दुष्ट म्हातारी बाई असणार.

मला तिच्याकडून सकाळी चिठ्ठी आली आहे ---केव्हातरी तिला मला भेटायचे आहे --- तिला काही तक्रार करायची आहे --- मला वाटते, माझ्या पियानोबद्दल. मी म्हणते, ज्याना पियानोच्या आवाजाची कटकट

होते, त्यांनी सदनिकेत रहायला येऊ नये. डोनोव्हन, तुझ्या हाताला लागले आहे. सगळीकडे रक्त पसरले आहे. जा ते नळाखाली धू.”

डोनोव्हनने नवल वाटून, हाताकडे पाहिले. तो आज्ञाधारकपणे खोलीबाहेर गेला आणि त्याने जिमीला हाक मारली.

जिमी म्हणाला, “काय रे, काय झाले? तुला फार लागलेले नाही, नाही ना?”

“मला काहीच लागलेले नाही.”

पण डोनोव्हनच्या आवाजात इतके काही विचित्र होते, की जिमी त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. डोनोव्हनने त्याचा धुतलेला हात समोर धरला आणि जिमीने पाहिले, की तिथे काही खूण वा जखम नव्हती.

तो भुवई उंचावून म्हणाला, “हे विचित्र आहे. तिथे बरेच रक्त तर दिसत होते. मग ते कुठून येत होते? आणि मग अचानक त्याच्या लक्षात आले, की त्याच्या शहाण्या मित्राने आधी काय पाहिले. तो म्हणाला, “देवा रे, ते त्या सदनिकेतून आले असले पाहिजे.” तो काही शक्यतांचा विचार करत थांबला. मग बोलला, “तुझी खात्री आहे --- ते --- रक्त होते? रंग नव्हता?”

डोनोव्हनने डोके हलवले. तो म्हणाला, “ते रक्त होते, ठीक आहे.” तो शहारला.

त्यांनी एकमेकांकडे पाहिले. प्रत्येकाच्या मनात तोच विचार होता. पण जिमी प्रथम चाचरत बोलला, “मी म्हणतो, तुला असे वाटते का, की आपण --- म्हणजे --- पुन्हा खाली जाऊन --- एकदा खात्री करावी, नाही का?”

“मुलींचे काय?”

“आपण त्यांना काही सांगू नको या. पॅट ॲप्रन घालून आपल्यासाठी आम्लेट करणार आहे. त्याना आपण कुठे गेलो, असे वाटायच्या आत आपण परत येऊया.”

डोनोव्हन म्हणाला, “ठीक आहे, चल. मला वाटते आपण तिथे जायलाच हवे. मी अशी आशा करतो, की तिथे काही वाईट घडलेले नसेल.”

पण त्याच्या आवाजावरून तशी खात्री वाटत नाही. ते लिफ्टमध्ये चढले व खालच्या मजल्यावर गेले. फारसा त्रास न घेता, त्यांनी स्वयंपाकघरातून प्रवेश केला आणि पुन्हा हॉलमधला दिवा लावला.

डोनोव्हन म्हणाला, “ते इथेच असले पाहिजे. ते --- ते --- त्याचेच रक्त माझ्या अंगावर सांडले. मी स्वयंपाकघरातील कशालाही शिवलो नाही.”

त्याने त्याच्याभोवती पाहिले. जिमीनेही तेच केले आणि दोघांच्याही भुवया चढल्या. सर्व काही नीटनेटके व जागच्या जागी दिसत होते. काही आक्रमकता वा रक्ताचा सडा वगैरे दिसत नव्हते.

अचानक जिमीने आक्रमकपणे डोनोव्हनचा दंड धरला व म्हणाला, “इकडे बघ.”

डोनोव्हनने त्याच्या बोटाच्या दिशेने पाहिले. तो एकाएकी ओरडला, “छान!” जड पडद्यांमधून, एक पाऊल दिसत होते --- बाईचे चामडी बुटातील पाऊल दिसत होते.

जिमी पडद्याशी गेला आणि ते बाजूला केले. खिडकीजवळ बाईचा छिन्नविछिन्न देह पडला होता. शेजारी चिकट, गडद तळे साचले होते. ती मेली होती, यात काही शंका नव्हती. जिमी तिला उचलायचा प्रयत्न करत असतांना डोनोव्हनने त्याला थांबवले.

“थांब. तसे करू नकोस. पोलीस येईपर्यंत तिला हात लावायला नको.”

“पोलीस. ओहो, अर्थात. मी काय म्हणतो, डोनोव्हन, हा काय अघोरी प्रकार आहे! ती कोण असेल, असे तुला वाटते? मिसेस एर्नेस्टाइन ग्रँट?”

“असे वाटते आहे. काही झाले तरी सदनिकेत अजून कुणी असेल तर ते मजेत असावेत.”

जिमीने विचारले, “आपण पुढे काय करायचे?”

“धावत सुटू आणि पोलिसांना बोलावू किंवा पॅटच्या सदनिकेतून त्यांना फोन करूया का?”

“मला वाटते फोन करणे बरे राहील. चल. आपण पुढील दाराने बाहेर पडू. त्या घाणेरडा वास येणाऱ्या लिफ्टने आपण रात्रभर वरखाली करू शकत नाही.”

जिमी तयार झाला. ते दारातून जातांना, तो कां कू करू लागला. “इकडे बघ, तुला असे वाटते का, की --- येथील गोष्टींवर लक्ष ठेवायला --- पोलीस येईपर्यंत --- आपल्यापैकी एकाने इथे थांबावे?”

“हो. मला वाटते, तुझे बरोबर आहे. तू थांबलास तर मी धावत जाऊन फोन करतो.”

तो जिन्यावरून धावला व वरील सदनिकेची घंटी वाजवली. पॅटने दार उघडले. ॲप्रन घातलेल्या पॅटचा सुंदर चेहरा पडला होता. तिचे डोळे आश्चर्याने पूर्ण उघडले.

“तू? पण कसे काय? डोनोव्हन, काय झाले आहे? काही नको ते घडले आहे का?”

त्याने तिचे दोन्ही हात हातात घेतले व म्हणाला, “ठीक आहे, पॅट --- पण आम्हाला खालील सदनिकेत एक वाईट शोध लागला आहे. एक बाई --- मरून पडली आहे.”

ती श्वास रोखत बोलली, “किती भयंकर! तिला घेरी आली आहे की अजून काही?”

“नाही. असे दिसते आहे, की तिचा खून झाला आहे.”

“ओहो, डोनोव्हन!”

“हो ना, हे फारच पशुतुल्य आहे.

अजून तिचे हात त्याच्या हातात होते. तिने ते सोडवून घेतले. पण अजून ती त्याला चिकटून होती. प्रिय पॅट --- तो तिच्यावर किती प्रेम करत होता! तिला त्याच्याबद्दल काही वाटत होते का? काही वेळेला त्याला वाटायचे, की तिला तसे वाटते. काही वेळेस त्याला भीती वाटायची, की जिमी --- तो खाली वाट बघत असेल, ते आठवून त्याला अपराधी वाटले. तो निघाला.

“प्रिय पॅट, आपल्याला पोलीसांना फोन करायला हवा.”

त्याच्यामागून एक आवाज बोलला, “मिस्टर, तुमचे बरोबर आहे. आणि ते येईपर्यंत मधल्या वेळात, मी कदाचित काही उपयोगी ठरू शकेन.”

ते सदनिकेच्या दारात उभे होते. आता ते जिन्यावर डोकावू लागले. त्यांच्यापासून थोडे वर, जिन्यात एक आकृती उभी होती. ती खाली आली व त्यांच्या नजरेच्या टप्प्यात आली.

ते भीतीदायक मिशा असलेल्या एका छोट्याशा माणसाकडे पाहू लागले. त्याने रंगीत झगमगता गाउन व वेलबुट्टीच्या स्लीपर्स घातल्या होत्या. त्याने नम्रपणे पॅट्रीशियाला अभिवादन केले.

तो म्हणाला, "बाईसाहेब, कदाचित तुम्हाला माहिती असेल, की मी वरच्या सदनिकेतील भाडेकरू आहे. मला हवेत उंच रहायला व लंडनचे दृष्य बघायला आवडते. ती सदनिका मिस्टर ओ'कोनोर यांच्या नावावर आहे. पण मी आयरिश नाही. मला दुसरे नाव आहे. म्हणून मी तुमच्या या भानगडीत पडायला आलो आहे. मला परवानगी द्या. झटक्यासरशी त्याने त्याचे कार्ड काढून पॅटला दिले.

तिने ते वाचले.

"मिस्टर हर्क्युल पायरो. ओहो!" तिने श्वास रोधून धरला. "मिस्टर पायरो, थोर गुप्तहेर? आणि तुम्ही खरेच मदत कराल?"

"बाईसाहेब, माझा तोच मानस आहे. मी आधी संध्याकाळीच मदत करायची तयारी दाखवली होती.

पॅट कोड्यात पडली.

"मी आधीच तुमचे बोलणे ऐकत होतो, की सदनिकेत कसे शिरायचे. मी कुलुपे उघडण्यात तरबेज आहे. मी अगदी सहज तुमचे दार उघडून दिले असते. पण मी तसे सुचवायला धजलो नाही. तुम्हाला माझा संशय आला असता."

पॅट हसू लागली.

पायरो डोनोव्हनकडे बघत बोलला, “मिस्टर, आता जाऊन पोलिसांना बोलवा. मी खालच्या सदनिकेत जातो.”

पॅट जिना उतरून त्याच्याबरोबर खालच्या सदनिकेत आली. त्यांना तिथे जिमी भेटला. पॅटने त्याची पायरोशी ओळख करून दिली. जिमीने त्याला त्याचे व डोनोव्हनचे साहस कथन केले. त्या गुप्तहेराने नीट लक्ष देऊन सगळे ऐकून घेतले.

“लिफ्टचे दार लावलेले नव्हते, असे तू म्हणालास का? तू त्यातून स्वयंपाकघरात उतरलास. पण दिवा चालू झाला नाही.”

त्याने त्याला सांगितल्याप्रमाणे, स्वयंपाकघरात प्रवेश केला. त्याच्या बोटांनी दिव्याचे बटन दाबले.

दिवा लागल्यावर पायरो बोलला, “बापरे! हे तुम्ही खरेच मोठे धाडस केले! आता दिवा नीट लागतो आहे. मला नवल वाटते, आहा, आता खोली आपल्या हुकमतीखाली आली.” त्याने बोट उचलून शांता राखायचे आवाहन केले.एका बारीक आवाजाने शांततेचा भंग केला. तो खात्रीने घोरण्याचा आवाज होता.

तो स्वयंपाकघर ओलांडून, लहानशा पँट्रीमध्ये आला. तिथे अजून एक दार होते. त्याने दार उघडले आणि तेथील दिवा लावला. ते कुत्र्याच्या घरासारखे काही होते. पण इमारत बांधणाऱ्याने ते माणसासाठी बांधले

असावे. सबंध खोलीभर जवळजवळ पलंग होता. त्यावर गुलाबी गालांची एक मुलगी तोंड उघडे टाकून, पाठीवर पहुडली होती. ती शांतपणे घोरत होती.

पायरोने दिवा मालवला व तेथून परतला.

तो म्हणाला, “ती जागी होणार नाही. पोलीस येईपर्यंत आपण तिला झोपून देऊ.”

तो परत हॉलमध्ये गेला. डोनोव्हन पण तिथे आला.

तो धापा टाकत बोलला, “पोलीस लगेचच इथे येतील, असे ते म्हणाले. आपण कशाला हात लावायला नको.”

पायरोने मान डोलवली. “आपण हात लावायला नको. आपण फक्त बघू.”

तो खोलीत गेला. डोनोव्हनबरोबर मिल्ड्रेड खाली आली. ते सर्व चार तरुण लोक दारात श्वास रोधून त्याच्याकडे स्वारस्य घेऊन, बघत उभे राहिले.

डोनोव्हन म्हणाला, “सर, मला समजत नाही, की मी कधीच खिडकीजवळ गेलो नाही --- मग माझ्या हाताला रक्त कुठून लागले?”

“माझ्या तरुण मित्रा, त्याचे उत्तर तुला चेहऱ्याकडे निरखून बघायला लावेल. टेबलावरील आच्छादन कुठल्या रंगाचे आहे? लाल, नाही का? निःसंशयपणे तू तुझा हात तिथे ठेवला असणार.”

तो थांबला, "हो सर, मी ठेवला होता."

पायरोने मान हलवली. तो टेबलावर वाकत होता. त्याने हाताने एक गडद लाल डाग दाखवला. "इथे गुन्हा घडला. नंतर प्रेत हलवले गेले."

मग तो ताठ उभा राहिला आणि सावकाशीने पूर्ण खोलीभर नजर फिरवली. तो हलला नाही. त्याने काही हाताळले नाही. तथापि त्या चारजणांना असे वाटले, की खोलीतील गरम, शिळया वातावरणातील प्रत्येक वस्तु तिचे गुपित त्याच्या निरीक्षण करणाऱ्या डोळयांना काही सांगते आहे.

पायरोने समाधान झाल्यासारखे, डोके हलवले. एक लहानसा सुस्कारा त्याच्या तोंडून बाहेर पडला. तो म्हणाला, "अस्स!"

डोनोव्हनने चौकसपणे विचारले, "तुम्हाला काय दिसले?"

"तुम्हाला संशयातीतपणे जे जाणवते --- ती खोली फर्निचरने भरलेली आहे."

डोनोव्हन खंत करत हसला .त्याने कबूल केले, "मी जोरात एक पैज लावू इच्छितो. अर्थात, येथील प्रत्येक वस्तु पॅटच्या सदनिकेपेक्षा वेगळी आहे. आणि ते कसे, ते मला कळत नाही आहे."

पायरो म्हणाला, "प्रत्येक वस्तु नव्हे."

डोनोव्हनने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

पायरो क्षमा मागत बोलला, "मला असे म्हणायचे आहे, की काही वस्तु सारख्या असणार. एकाखाली एक असणाऱ्या सदनिकेत दार, खिडकी, शेकोटी --- त्याच जागी असणार. त्यात मला काही फरक दिसत नाही."

मिल्ड्रेड बोलली, "हे फार नगण्य गोष्टींमध्ये फरक करणे होते आहे, नाही का? ती पायरोकडे थोड्या नापसंतीने बघत होती.

"प्रत्येकाने नेहमी पूर्ण नेमकेपणे बोलावे. ते माझे थोडे ---तुम्ही कसे म्हणाल? --- थोडे फॅड आहे."

तिथे जिन्यातून, जोराचा पायरव आला. तीन माणसे आत आली. ते पोलीस इन्स्पेक्टर, कॉन्स्टेबल व सर्जन होते. इन्स्पेक्टरने पायरोला ओळखले व त्याचे जवळजवळ सहजतेने स्वागत केले. मग तो इतरांकडे वळला.

त्याने सुरवात केली, "मला प्रत्येकाची जबानी पाहिजे. पण पहिल्या प्रथम --- " पायरो मध्येच बोलला, "एक लहानशी सूचना. आपण वरच्या मजल्यावरील सदनिकेत जाऊ आणि बाईसाहेबांनी इथे जे ठरवले आहे, ते करतील --- त्या आपल्यासाठी आम्लेट करत आहेत. मग मिस्टर इन्स्पेक्टर, तुमचे इथले काम जेव्हा संपेल, तेव्हा तुम्ही आम्हाला प्रश्न विचारा."

मग तसे केले गेले आणि पायरो त्यांच्याबरोबर वरती गेला.

पॅट म्हणाली, “मिस्टर पायरो, मला वाटते तुम्ही फार आवडते आहात. आणि तुम्हाला छान आम्लेट मिळेल. मी खरेच आम्लेट फार छान करते.”

“बाईसाहेब, हे छान आहे. एकदा मी एका सुंदर इंग्लिश तरुण मुलीवर प्रेम करत होतो. ती तुमच्यासारखी दिसत असे. पण अरेरे! तिला स्वयंपाक येत नसे. त्यामुळे झाले, ते चांगले झाले.” त्याच्या आवाजात थोडा विषाद होता. जिमीने त्याच्याकडे उत्सुकतेने पाहिले. त्या सर्वांनी सदनिकेत त्याचे मनोरंजन करून त्याला खूष करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शोकाची गोष्ट विसरली गेली.

इन्स्पेक्टर राइसचा पायरव आला, तेव्हा आम्लेट खाल्ले गेले व वाखाणले गेले. तो डॉक्टरबरोबर आला. पण कॉन्स्टेबल मात्र खाली राहिला.

तो म्हणाला, “मिस्टर पायरो, “हे अगदी स्पष्ट दिसते आहे, की --- ही केस तुमच्या योग्यतेची दिसत नाही. तरीही आम्हाला त्या माणसाला पकडायला अवघड जाईल. मला शोध कसकसा घ्यावा लागेल, हे तुमच्याकडून ऐकायला आवडेल.”

डोनोव्हन आणि जिमी यांनी त्या संध्याकाळी कायकाय झाले, ते सांगितले. मग इन्स्पेक्टर पॅटकडे वळला. “तुम्ही लिफ्टचे दार उघडे ठेवता कामा नये. मिस, खरेच तुम्ही असे करता कामा नये.”

पॅट शहारत म्हणाली, “मी परत असे करणार नाही. कोणीतरी आत येऊन खालच्या त्या बिचाऱ्या बाईसारखा, माझा खून करू शकेल.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “पण ते काही त्या मार्गाने आले नाहीत.”

पायरो म्हणाला, “तुम्ही काय शोधून काढले, ते आम्हाला सांगाल का?”

“हो, पण मला पाहिजे तितके माहिती नाही --- पण मिस्टर पायरो, तुम्हाला इथे पाहून --- “

पायरो म्हणाला, “नेमकेपणा. आणि हे तरुण लोक गुळमुळीत असतात.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “लवकरच वर्तमानपत्रात ही बातमी येईल. यात खरे गुपित असे काही नाही. मेलेली बाई पस्तीस वर्षांची मिसेस ग्रँट आहे. ठीक आहे. हमालाने तिला ओळखले आहे. ती टेबलाशी बसलेली होती, आणि तिला छोट्या स्वयंचलीत पिस्तुलातून गोळी मारली गेली. बहुधा टेबलावर तिच्यासमोर बसलेल्याने. ती पुढे पडली. त्यामुळे टेबलावर रक्तप्रवाह वाहू लागला.”

मिल्ड्रेडने विचारले, “पण कुणी पिस्तुलातून मारलेल्या गोळीचा आवाज ऐकला नसेल का?””

“पिस्तुलातून आवाज येणार नाही, अशी यंत्रणा बसवलेली होती. नाही कुणाला काही ऐकू येणार नाही. पण नोकराणीला जेव्हा आम्ही

सांगितले, की तिच्या मालकिणीचा खून झाला आहे, तेव्हा तिने जी किंकाळी मारली, ती तुम्हाला ऐकू आली का? नाही? ठीक आहे. एकाने दुसऱ्याचा आवाज ऐकणे सहजसोपे नाही.''

पायरोने विचारले, ''नोकराणीकडे काही गोष्ट नाही का?''

''ती बाहेर गेली होती. तिच्याकडे तिची किल्ली असते. ती साधारण दहा वाजता आली. सर्व शांत होते. तिला वाटले तिची मालकीण झोपली आहे.''

''तिने हॉलमध्ये पाहिले नाही का?''

''हो, तिने तेथील संध्याकाळच्या डाकेने आलेली पत्रे घेतली. पण तिने, मिस्टर फाउलकेनर व मिस्टर बेले यानी पाहिले, त्यापेक्षा वेगळे काही पाहिले नाही. असे बघा, खुन्याने प्रेत जरा नीटपणे पडद्यामागे दडवून ठेवले होते.''

''पण असे करणे जरा वेगळेच होते, असे तुम्हाला वाटत नाही का?''

पायरोचा आवाज हळूवार होता, तरी त्यात असे काही होते की इन्स्पेक्टरने चमकून वर पाहिले. ''निदान तो पळून जाईपर्यंत तरी कोणाला प्रेत सापडायला नको, असे त्याला वाटले असेल.''

''कदाचित, कदाचित ---पण सांगा, तुम्ही काय सांगत होतात ते सांगा.''

नोकराणी पाच वाजता बाहेर गेली. येथील डॉक्टरने खुनाची वेळ साधारणपणे, चार ते पाच तासांपूर्वीची सांगितली आहे. ते बरोबर आहे, नाही का?”

थोड्या अबोल असणाऱ्या डॉक्टरने त्याचे डोके खात्रीपूर्वक हलवून, तो समाधानी असल्याचे सांगितले. “आता पावणेबारा वाजले आहेत. बरोबर वेळ, मला वाटते, नेमकेपणे किती ते माहिती हवे.”

त्याने एक चुरगळलेला कागद बाहेर काढला. “हा मृत बाईच्या ड्रेसच्या खिशात सापडला. तो हाताळायला तुम्ही मागेपुढे बघू नका. त्यावर ठसे नाही आहेत.

पायरोने तो सरळ केला. त्यावर मोठ्या कॅपिटल अक्षरात काही छापलेले होते.

आज संध्याकाळी साडेसात वाजता, मी तुला भेटायला येते

J. F.

पायरोने तो परत देतांना शेरा मारला, “काही गुपित उघड करणारा कागद मागे ठेवला आहे.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “ठीक आहे, तिच्या खिशात हा कागद असल्याचे खुन्याला माहिती नसावे. त्याला बहुधा वाटले असावे, की तिने तो नाहीसा केला असेल. तरी आपल्याकडे पुरावा आहे, की तो काळजी घेणारा मनुष्य होता. ज्या पिस्तुलाने तिचा खून झाला, ते तिच्या अंगाखाली

सापडले --- त्यावरही काही खुणा सापडल्या नाहीत. त्या फार काळजीपूर्वक रीतीने रेशमी रुमालाने पुसून टाकण्यात आल्या होत्या.”

पायरो म्हणाला, “रेशमी रुमालाने, हे तुम्हाला कसे काय माहित?” इन्स्पेक्टर अभिमानाने म्हणाला, “कारण आम्ही ते शोधून काढले. शेवटी पडदे ओढून घेतांना त्याला नकळत तो तिथे पडला असावा.”

त्याने एक मोठा, पांढरा रेशमी रुमाल दिला --- चांगल्यापैकी रुमाल आहे. त्यावर मध्यभागी असलेल्या खुणेकडे लक्ष जाण्यासाठी पायरोला इन्स्पेक्टरच्या बोटांची गरज नव्हती. पायरोने ते नाव वाचले.

“जॉन फ्रासर.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “जॉन फ्रासर --- J. F. हेच त्या कागदावरदेखील आहे. तेव्हा आपल्याला कुणाला शोधायचे आहे, ते आपल्याला माहिती आहे. मी सांगू शकतो, की आपण जेव्हा मृत बाईबद्दल थोडेफार शोधून काढू, तेव्हा तिच्या नातेवाईकांकडून आपल्याला त्याच्याबद्दल समजेल.”

पायरो म्हणाला, “माझ्या मित्रा, मला नवल वाटते, काही झाले तरी मला असे वाटत नाही, की जॉन फ्रासरला शोधणे सोपे असेल. तो विचित्र माणूस आहे --- काळजी घेणारा आहे, कारण त्याने गुन्हा केलेल्या पिस्तुलावरील खुणा पुसल्या आहेत. पण निष्काळजी आहे, कारण त्याने

रुमाल तिथे टाकून दिलेला आहे. आणि कदाचित त्याला गुन्हेगार म्हणून उघडे पाडेल, असा कागद त्याने शोधला नाही.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “तो रागावलेला किंवा सचिंत होता.”

पायरो बोलला, “शक्य आहे. हो, शक्य आहे. त्याला इमारतीत शिरतांना कुणी पाहिले नव्हते?”

त्याने चौघांकडे बघून म्हटले, “सगळ्या प्रकारचे लोक या इमारतीत सतत येतजात असतात. ही मोठी इमारत आहे. मला वाटते, तुमच्यापैकी कुणी या सदनिकेतून कुणाला बाहेर पडतांना पाहिले नसावे, नाही का?”

पॅटने डोके हलवले. “आम्ही लवकर बाहेर गेलो --- साधारण सात वाजता.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “अस्स!” पायरो त्याच्याबरोबर दरवाज्यापर्यंत गेला.

“मी माझ्या समाधानासाठी खालची सदनिका तपासू शकतो का?”

“का? खात्रीने, मिस्टर पायरो. तुमच्याविषयी आमच्या मुख्य कार्यालयात काय बोलले जाते, हे मला माहिती आहे. मी किल्ली तुमच्याकडे ठेवतो. माझ्याकडे दोन आहेत. तो रिकामा असेल. नोकराणीने काही नातेवाईकांची नावे सांगितली आहेत. ती एकटी इथे रहायला फार घाबरलेली आहे.”

मिस्टर पायरो म्हणाले, “आभारी आहे.” तो विचार करत त्या सदनिकेत गेला.

जिमी म्हणाला, “मिस्टर पायरो, तुम्ही समाधानी नाही का?”

पायरो म्हणाला, “हो, मी समाधानी नाही.”

डोनोव्हनने त्याच्याकडे चौकसपणे पाहिले. “तुम्हाला कसली काळजी वाटते आहे?”

पायरोने उत्तर दिले नाही. एकदोन मिनिटे तो भुवई चढवत, विचारात बुडाल्यासारखा स्तब्ध राहिला. मग त्याने अधीरपणे खांद्यांची हालचाल करत म्हटले, “मी तुम्हाला शुभरात्र म्हणतो. तुम्ही दमला असाल. बाईसाहेब, तुम्हाला आम्लेट करायचे फार काम पडले.”

पॅट हसली. “फक्त आम्लेट तर केले. जेवण नाही. डोनोव्हन आणि जिमी यांनी येऊन आम्हाला बोलावले. मग आम्ही सोहोमधील एका लहानशा जागी गेलो.”

आणि मग संशयातीतपणे, तुम्ही सिनेमागृहात गेलात?”

“हो. ब्राऊन आईज ऑफ कॅरोलीन.”

पायरो म्हणाला, “आहा, ते ब्लू आईज असे हवे होते --- बाईसाहेबांचे निळे डोळे.”

त्याने भावुकपणे हालचाल केली. मग परत एकदा पॅटला शुभरात्र म्हणून तो गेला. मिल्ड्रेडला विशेष विनंती केल्यामुळे, ती आजची रात्र इथे

रहाणार होती. पॅटने मनमोकळेपणे हे कबूल केले होते, की आज रात्री तिला एकटीला झोपायला भीती वाटेल.

दोन तरुण माणसे पायरोबरोबर दारापर्यंत गेली. जेव्हा दार लावले व ते त्याला अच्छा करू लागले, तेव्हा पायरोने त्यांना थांबायला सांगितले.

“माझ्या तरुण मित्रांनो, तुम्ही मला मी समाधानी नसल्याचे म्हटलेले ऐकलेत. ते खरे आहे. मी समाधानी नाही. मी आता माझे स्वतःचे काही शोध घ्यायला जातो आहे. तुम्हाला माझ्याबरोबर यायला आवडेल का?”

त्याचा उत्सुक आवाज त्यांचे स्वागत करत होता. पायरोने खालील सदनिकेकडे मोर्चा वळलला. इन्स्पेक्टरने दिलेली किल्ली त्याने कुलुपात घातली. आत शिरल्यावर, बाकी दोघाना वाटल्याप्रमाणे तो हॉलमध्ये गेला नाही. त्याऐवजी, तो सरळ स्वयंपाकघरात गेला. भांडी घासायच्या मोरीपाशी एक कचरा टाकायचे झाकणासकट असलेले लोखंडी भोक होते. पायरोने ते उघडले व उंच होऊन, तो ते चांगला जोर लाऊन खणू लागला.

जिमी आणि डोनोव्हन त्याच्याकडे आश्चर्याने बघत राहिले.

अचानक त्याने विजयाची आरोळी मारली. त्याच्या हातात एक लहान बंद बाटली होती. “मी जे शोधत होतो, ते मला सापडले.” त्याने नाजूकपणे त्याचा वास घेतला. “अरेरे! मला सर्दी होते आहे. माझ्या डोक्यात सर्दी साठली आहे.”

डोनोव्हनने त्याच्याकडून बाटली घेतली व वास घेतला. पण त्याला कसलाच वास आला नाही. त्याने झाकण उघडले आणि पायरोची तसे न करण्याची ओरडत केलेली सूचना न ऐकता, परत बाटली नाकाशी धरली. ताबडतोब तो ओंडक्यासारखा पडला. पायरोने पुढे उडी मारून, त्याला पडण्यापासून वाचवले.

तो ओरडला, “मूर्खा, झाकण काढण्याची कल्पना फारच नामी होती! मी ती बाटली किती नाजूकपणे हाताळत होतो, ते तू पाहिले नाहीस का? मिस्टर फाउलकेनर --- बरोबर ना? तू मला थोडी ब्रँडी देऊ शकशील का? मला हॉलमध्ये एक ब्रँडीची बाटली दिसलेली आहे.”

जिमी घाईने गेला. पण तो परत येईपर्यंत, डोनोव्हन उठून बसला होता व स्वतः ठीक असल्याचे सांगत होता. विषारी पदार्थ हुंगून घेताना घेण्याच्या काळजीबद्दलचा पायरोचा थोडा उपदेश त्याला ऐकून घ्यावा लागला.

डुगडुगत उभे रहात, डोनोव्हन बोलला, “मला वाटते, मी घरी जातो. माझा इथे काही उपयोग नाही. अजून मला थोडे गरगरल्यासारखे वाटते आहे.”

पायरो म्हणाला, “नक्कीच. ती चांगली गोष्ट ठरेल. मिस्टर फाउलकेनर, मला एक मिनिट द्या. मी आलोच.” त्याने डोनोव्हनला दारापर्यंत व थोडे पुढे सोडले. ते काही वेळ जिन्याशी बोलत उभे राहिले. शेवटी पायरो परत सदनिकेत शिरला, तेव्हा त्याने जिमीला हॉलमध्ये आजूबाजूला प्रश्नार्थक डोळ्यांनी उभे असलेले पाहिले.

तो म्हणाला, “ठीक आहे, मिस्टर पायरो, पुढे काय?”

“अजून काही नाही. केस संपली.”

“काय?”

“मला आता सर्व काही समजले.”

जिमी त्याच्याकडे बघत राहिला. “तुम्हाला सापडलेली ती लहान बाटली?”

“बरोबर, ती लहान बाटली.”

जिमीने डोके हलवले. मला काहीही समजले नाही. तो जॉन फ्रासर कुणी का असेना, पण त्याच्याविरुद्धचा पुरावा तुम्हाला काही कारणाने, फारसा पसंत पडला नाही, असे मला वाटत होते.”

“कुणी का असेना” पायरो पुनरुच्चार करत बोलला, “जर तो खरेच कोणी असेल, तर --- मला आश्चर्य वाटेल.”

“मला समजले नाही.”

“ते एक नाव आहे --- एवढेच --- रुमालावर काळजीपूर्वक लिहिलेले नाव!”

“आणि तो कागद?”

“तुझ्या लक्षात आले का, तो छापलेला होता. आता का? मी तुला सांगतो. हस्ताक्षर कदाचित ओळखले जाईल. पण टाइप केलेले पत्र, तुझी कल्पना आहे त्यापेक्षा जास्त सहज रीतीने शोधता येते --- पण ते खऱ्या

जॉन फ्रासरने लिहिले असेल, तर ते दोन मुद्दे त्याला जाणवले नसते. नाही. ते मुद्दाम लिहिले गेले. आणि आपल्याला शोधण्यासाठी, ते मृत बाईच्या ड्रेसच्या खिशात ठेवले गेले. जॉन फ्रासर नावाची कुणी व्यक्ती अस्तित्वात नाही.”

जिमीने त्याच्याकडे चौकसपणे पाहिले.

पायरो पुढे बोलत राहिला, “आणि म्हणून, मला पहिल्यांदा जाणवलेल्या त्या बाबीकडे मी पुन्हा एकदा मागे गेलो. असलेल्या परिस्थितीत, तू मला खोलीत काही गोष्टी बोलतांना ऐकले असशील, तर त्या तशाच होत्या. मी तीन उदाहरणे दिली. कदाचित मी चौथेही सांगितले असेल --- माझ्या मित्रा, विजेच्या दिव्याचे बटन.”

जिमी अजूनही काही न समजल्याप्रमाणे बघत होता.

“तुझा मित्र डोनोव्हन खिडकीजवळ गेला नाही --- त्याचा हात टेबलावर पडला व तो रक्ताने भरला. पण मी मला स्वतःला लगेच विचारले --- त्याने तिकडे हात का ठेवला? तो अंधारात या खोलीत काय करत होता? माझ्या मित्रा, आठव, विजेच्या दिव्याची जागा नेहमी तीच असते. दाराजवळ. मग तो जेव्हा या खोलीत आला, तेव्हा त्याला लगेच बटन का सापडले नाही? ती नैसर्गिक, सहज होणारी गोष्ट होती. त्याच्या म्हणण्या प्रमाणे, त्याने स्वयंपाकघरातील दिवा लावायचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही. तरी जेव्हा त्याने प्रयत्न केला, तेव्हा तो दिवा नक्की चांगल्या अवस्थेत होता. मग त्याला दिवा लागायला नको होता का? जर दिवा गेला

असता, तर तुम्हा दोघाना लगेच दिसले असते, की तुम्ही चुकीच्या सदनिकेत आला आहात. तुम्हाला इथे येण्याचे काही कारण नव्हते.”

“मिस्टर पायरो, तुमचा रोख कशावर आहे? मला समजत नाही, तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“मला --- हे म्हणायचे आहे.”

पायरोने पुराणातील शिंगवाल्या पशुची किल्ली काढली. “या सदनिकेची किल्ली?”

“नाही मित्रा, ती वरच्या सदनिकेची आहे. मिस्टर डोनोव्हन बेलेने पॅट्रीशियाच्या बॅगेतून संध्याकाळी केव्हातरी काढून घेतली, ती ही तिची किल्ली आहे.”

“पण का? का?”

“अरे बापरे! म्हणजे त्याला जे करायचे होते, ते करता आले असते --- या सदनिकेत कुणालाही संशय न येता प्रवेश करणे. त्याने आधीच्या संध्याकाळी खात्री केली, की लिफ्टच्या दाराला कडी लावलेली नसेल.”

“तुम्हाला ही किल्ली कुठे मिळाली?”

पायरोचे हास्य रुंदावले. “जिकडे मी ते शोधले, तिकडे मला ते आताच सापडले. मिस्टर डोनोव्हनच्या खिशात. असे बघ, ती लहान बाटली मला सापडल्याचे मी ढोंग केले, ती माझी चलाखी होती. मिस्टर डोनोव्हनला ती समजली. तो काय करणार, ते मला माहिती होते. त्याने तेच

केले. बाटलीचे झाकण उघडून वास घेतला. त्यात इथाइल क्लोराइड होते. ते फार जहाल गुंगी आणणारे आहे. त्याने मला गरज असलेली एकदोन मिनिटे गुंगी त्याला आली. मी त्याच्या खिशातून, दोन गोष्टी काढल्या. त्या तिथे असणार, हे मला माहिती होते. ही किल्ली आणि दुसरी --- "

तो थांबला आणि पुढे बोलू लागला.

"मी इन्स्पेक्टरला विचारले होते, की प्रेत पडद्यामागे का दडवले गेले होते. वेळ मिळावा म्हणून? नाही. त्यापेक्षा जास्त काही होते. त्यामुळे मला वाटले, एकच गोष्ट --- माझ्या मित्रा, डाक. साधारण साडेनऊला येणारी पत्रे. खुन्याला जे हवे आहे, ते त्याला सापडत नाही. पण ते नंतर पोस्टाने येऊ शकते. मग स्पष्टपणे त्याला परत यायलाच पाहिजे. पण नोकराणी येईल, तेव्हा तिला गुन्हा घडल्याचे कळता कामा नये. नाहीतर मग पोलीस सदनिकेचा ताबा घेतील. त्यामुळे तो, प्रेत पडद्यामागे लपवतो. त्यामुळे नोकराणीला काही कळत नाही. ती नेहमीप्रमाणे आलेली पत्रे टेबलावर ठेवते."

"पत्रे?"

"हो. पत्रे." पायरो त्याच्या खिशातून काहीतरी काढतो. "ही मी डोनोव्हनकडून तो बेशुद्ध असताना त्याच्याकडून घेतलेली दुसरी वस्तु. तो दाखवतो. टाइप केलेले व त्यावर मिसेस एर्नेस्टाइन ग्रँटचे नाव लिहिलेले पाकीट "पण मिस्टर फाउलकेनर, आपण पत्रात काय लिहिले आहे, हे

वाचण्यापूर्वी, पहिल्यांदा मी तुला एक गोष्ट विचारतो, तू मिस पॅट्रीशियावर प्रेम करतोस, की करत नाहीस?"

"मी पॅटची फार काळजी करतो --- पण मला वाटते, मला कधी संधी मिळाली नाही."

"तुला वाटते का, की ती डोनोव्हनची काळजी करते? असेही असेल, की ती आताच त्याची काळजी करू लागली असेल. मित्रा, तिच्या त्रासामध्ये तिच्यामागे ठामपणे उभे राहून --- तिला त्याला विसरायला लावायचे काम तुला करायचे आहे."

जिमी कडकपणे बोलला, "त्रासात?"

"हो, त्रासात. आपण तिला या प्रकरणातून जितके दूर ठेवता येईल तितके ठेऊ. असे पूर्णपणे करणे शक्य नाही. कारण हे तिच्यासाठीच चालले होते."

त्याने त्याच्या हातातील पाकीट फोडले. आतून कागद बाहेर पडला. पत्र वकिलाकडून आलेले असून त्रोटक होते.

माननीय बाईसाहेब,

तुम्ही पाठवलेले पत्र अगदी नेमके होते. आणि परदेशातील लग्नाची गोष्ट, काही झाले तरी ग्राह्य धरली जाते.

तुमचा विश्वासू वगैरे

पायरोने ते नीट उघडून ठेवले. ते डोनोव्हन बेले व एर्नेस्टाइन ग्रँट यांच्या लग्नाचे आठ वर्षांपूर्वीचे प्रमाणपत्र होते.

जिमी म्हणाला, “अरे बापरे, पॅट म्हणाली, तिला भेटू इच्छिणाऱ्या एका बाईकडून तिला पत्र आले आहे. पण ते काही महत्वाचे असेल, असे तिला स्वप्नातही वाटले नसेल.”

पायरोने मान डोलावली. “डोनोव्हनला माहिती होते --- तो वरच्या सदनिकेत जाण्यापूर्वी आज संध्याकाळी, त्याच्या बायकोला भेटायला गेला होता --- काय विचित्र विरोधाभास आहे! तसेही त्या दुर्दैवी बाईला जिथे तिचा शत्रू रहात होता, त्या इमारतीत यायला लागले --- त्याने थंड डोक्याने तिचा खून केला. मग तो त्याच्या संध्याकाळच्या मनोरंजनासाठी गेला. त्याच्या बायकोने त्याला सांगितले असले पाहिजे, की तिने लग्नाचे प्रमाणपत्र तिच्या वकीलाला पाठवले आहे. आणि लवकरच तिला त्याच्याकडून काय ते समजेल. संशयातीतपणे त्याने स्वतः तिला असा विश्वास ठेवायला लावायचा प्रयत्न केला होता, की या लग्नात काहीतरी गोम आहे.”

पूर्ण संध्याकाळभर, तो चांगल्या मनस्थितीत दिसत होता. जिमी शहारत म्हणाला, “मिस्टर पायरो, तुम्ही त्याला निसटू द्यायला नको होते.

पायरो थंडपणे म्हणाला, “त्याची यातून सुटका नाही. तू काही घाबरू नकोस.”

जिमी म्हणाला, “मी मुख्यतः पॅटचा विचार करतो आहे. तुम्हाला असे वाटत नाही का, की तिने त्याची फारशी काळजी केली?”

“अरे मित्रा, ते तुझे काम आहे, की तिला तुझ्याकडे वळवणे आणि त्याला विसरायला लावणे. मला नाही वाटत, की ते तुला फार अवघड जाईल.”

THE MYSTERY OF THE BAGHDAD CHEST

# बगदाद पेटीचे गूढ



‘बगदाद पेटीचे गूढ’ हे लक्ष वेधून घेणारे शीर्षक होते, असे मी माझ्या मित्राला, हर्क्युल पायरोला म्हणालो. मला त्यापैकी कुणी माहिती नव्हते. रस्त्यातील फक्त एका सर्वसाधारण माणसामध्ये मला रस होता. पायरोने ते कबूल केले.

“हो, त्याला प्राचीन गूढतेचा वास आहे. ती बगदाद पेटी तोतेनहाम कोर्ट रस्त्यावरील, राजा जेम्स एकच्या काळातील असेल, हे खोटे वाटते.

शिवाय ज्या वार्ताहराला त्याला बगदाद पेटी, असे नाव द्यावेसे वाटले असेल, त्यामुळे तो खूप आनंदित झाला असेल. विरुद्ध परिणामांचे दोन शब्द, जसे की ‘गूढ’ व ‘पेटी’ विचारपूर्वक ठेवले असणार, जरी मला माहिती आहे की या केसमध्ये फार थोडे गूढ आहे.”

“तेच तर. हे सर्व जरा भयंकर आणि मरणांतिक भीतीचे आहे. पण त्यात गूढ असे काही नाही.”

पायरो विचार करत परत बोलला, “भयंकर आणि मरणांतिक भीतीचे,”

मी उभे रहात व खोलीभर चालत म्हणालो, “ही सर्व कल्पना बंड करणारी आहे. “खुन्याने माणसाला मारले ---त्याच्या मित्राला --- पेटीत भरले आणि अर्ध्या तासाने, त्याच खोलीत तो बळीच्या बायकोबरोबर नाचत होता. विचार करा! जर तिने क्षणभर कल्पना केली असती --- “

पायरो विचारपूर्वक बोलला, “खरे आहे. इतक्या बढाया! बाईचे सहावे इंद्रिय वा अंतर्दृष्टी काम करत नसावी.”

मी थोडा शहारत म्हणालो, “मेजवानी फार आनंदात पार पडली, असे दिसते आहे. सर्व वेळ ते नाचतांना व पोकर खेळतांना, त्यांच्याबरोबर खोलीन मृत मनुष्य होता. एखाद्याने अशा परिस्थितीवर नाटक लिहावे.”

पायरो दयाळूपणे म्हणाला, “असे लिहिले गेले आहे. पण हेस्टीग्ज, पण तू स्वतःला शांत कर, कारण ही गोष्ट एकदा वापरली गेली आहे. पण परत वापरू नये, असे काही नाही. तू तुझे नाटक लिही.”

मी कागद उचलले आणि पुनरुज्जिवित केलेले पुसट फोटो अभ्यासू लागलो.

मी सावकाश म्हणालो, “यावरून अंदाज येतो, की ती बाई सुंदर असली पाहिजे.”

फोटोखाली लिहिलेले होतेः

मिसेस क्लेटॉनचा अलीकडील फोटो

खून झालेल्या माणसाची बायको

पायरोने माझ्याकडून कागद घेतले. तो म्हणाला, “हो, ती सुंदर आहे. संशयातीतपणे पुरुषांना मानसिक त्रास देण्यासाठी ती जन्मली असावी.”

त्याने सुस्कारा टाकत, मला कागद परत दिले. “अरे देवा, माझा स्वभाव मृदुभाषिक नाही. त्यामुळे मी शरम वाटण्यापासून बचावलो. मी आभारी आहे.”

“मला केसची पुढे चर्चा केल्याचे आठवत नाही. त्यावेळी पायरोने त्यात विशेष रस दाखवला नाही. पण गोष्टी इतक्या स्पष्ट होत्या आणि त्याबद्दल काही गोंधळ नव्हता. त्यामुळे चर्चा फक्त निरर्थक होती.

मिस्टर, मिसेस क्लेटॉन व मेजर रिच खूप वर्षांपासून मित्र होते. प्रश्नार्थक दिवशी दहा मार्चला, क्लेटॉन यांनी मेजर रिचबरोबर संध्याकाळ घालवायचे आमंत्रण स्वीकारले होते. पण साधारण साडेसातला, क्लेटॉन यांनी मेजर कर्टीसकडे अचानक भेटायला व पेयपानासाठी जायचे ठरवले. कारण त्याला काही कल्पना नसतांना अचानक स्कॉटलंडला बोलावले गेले. तो आठच्या गाडीने निघणार होता.

क्लेटॉन म्हणाला, “मला त्याला भेटून फक्त स्पष्ट करता येईल, की मार्गारिटा अर्थात जाणार आहे. मी याबद्दल माफी मागतो. पण त्याला कळेल, की आहे हे असे आहे.”

मिस्टर क्लेटॉनने त्याचा शब्द पाळला. तो मेजर रिचकडे आठला वीस मिनिटे असतांना आला. त्यावेळेस मेजर बाहेर गेलेला होता. पण त्याच्या, मिस्टर क्लेटॉनला ओळखत असलेल्या पुरुष नोकराने सुचवले, की त्याने येऊन थांबावे. पण मेजर क्लेटॉन म्हणाला, की त्याला वेळ नाही आहे. पण तो येऊन एक चिठ्ठी लिहील. त्याने पुढे म्हटले, की गाडी गाठायला जातांना ते वाटेवर आहे.

नोकराने त्यांना त्याप्रमाणे हॉलमध्ये बसवले.

पाच मिनिटाने मेजर रिच नोकराने न बघता घरात आले. हॉलचे दार उघडले. नोकराला बोलावले व त्याला सिगरेटी आणायला बाहेत पिटाळले. नोकर त्या घेऊन परत आला, तेव्हा त्याचे मालक एकटेच

हॉलमध्ये बसलेले होते. त्यामुळे सहजच त्याला वाटले, की मिस्टर क्लेटॉन गेले.

त्यानंतर थोड्याच वेळात पाहुणे आले. त्यात मिसेस क्लेटॉन, मेजर कर्टीस आणि मिस्टर व मिसेस स्पेन्स होते. नाचगाण्यात व पोकर खेळण्यात, संध्याकाळ गेली. मध्यरात्रीनंतर थोड्याच वेळात पाहुणे गेले.

दुसऱ्या दिवशी हॉलची साफसफाई करायला नोकर आला, तेव्हा तो गालिच्यावर व बगदाद पेटी म्हणून मालकाने पूर्वेकडून आणलेल्या वस्तुसमोर पडलेल्या गडद डागाने गोंधळून गेला. नोकराला काय वाटले कुणास ठाऊक, पण त्याने त्या खोक्याचे झाकण उघडले आणि आतमधील घडी करून ठेवलेले, हृदयात भोसकलेल्या माणसाचे माणसाचे प्रेत बघून तो घाबरुन गेला. त्याने तेथून बाहेर धावत जाऊन, जवळून एका पोलिसाला आणले. तो माणूस म्हणजे मिस्टर क्लेटॉन असल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर लवकरच मिस्टर रिचला अटक करण्यात आली. मेजरच्या बचावावरुन असे लक्षात आले, की त्याने ठामपणे सगळ्या गोष्टी नाकारल्या. त्याने आदल्या दिवशी संध्याकाळी मिस्टर क्लेटॉनना पाहिले देखील नव्हते आणि तो स्कॉटलंडला गेले असल्याचे त्याने मिसेस क्लेटॉनकडूनच पहिल्यांदा ऐकले.

या केसचे वाईट मुद्दे असे होते. यावर सूचनांचा व वेड्यावाकड्या शेरेबाजींचा पाऊस पडला. मेजर रिच व मिसेस क्लेटॉन यांच्या जवळच्या

नातेवाईकांवर इतका दबाव आला, की एखाद्या मूर्खालाच फक्त काय झाले, ते समजले नसेल. या खुनामागील उद्देश सहज दिसून येत होता.

दीर्घ अनुभवाने मला शिकवले होते, की उगीच लंब्याचौड्या बाता मारण्यात काही अर्थ नव्हता. सर्व पुराव्यावरून, काय हेतू होता, ते कळत नव्हते. कुठल्यातरी दुसऱ्या कारणाने खून केला गेला असावा. पण एक गोष्ट स्पष्ट होती --- खून रिचनेच केला होता.

त्या रात्री चॅटेरटॉन बाईसाहेबांनी दिलेल्या मेजवानीला पायरो आणि मी गेल्यामुळे असे झाले, नाहीतर ते प्रकरण तेवढ्यावरच राहिले असते. सामाजिक भेटीगाठींबद्दल तीव्र खंत व्यक्त करतांना आणि एकांतवासाची भलावण करतांना, पायरो असल्या प्रकरणांचा खूप मनापासून आनंद घेत असे. त्यांचा फुगा फोडण्यासाठी व सिंहासारखा मान दिला गेल्याने पायरो नम्र झाला.

अशा प्रसंगी तो शांतपणे बोलत असे. त्याला अपेक्षित असलेल्या शेऱ्यांपेक्षा धक्कादायक शेरे मोठ्या थंडपणे दिले गेले, तर ते मला सहन होत नसत. पण तो ते मुकाट्याने ऐकून घेई.

कधीकधी तो माझ्याबरोबर वाद घाले.

‘‘पण माझ्या मित्रा, मी काही इंग्रज नाही. मी ताठा का दाखवेन? टेनिस अरेरे, ते तुम्ही करता. तुम्ही सगळे. विशेष धोक्याचे उड्डाण करणारा पायलट, टेनिसपटु --- ते नाक वर करून चालतात. ते ऐकू जाणार नाही असे

बोलतात, 'हे काहीच नाही.' पण खरेच त्यांना असे वाटते का? क्षणभर सुद्धा नाही. ते दुसऱ्यातील दुर्गुणांचे कौतुक करतील. त्यामुळे सुविचारी असल्यामुळे, ते स्वतःचेच कौतुक करतील. पण त्यांचे प्रशिक्षण त्यांना तसे म्हणू देत नाही. पण माझे तसे नाही. माझ्याकडे जे गुण आहेत --- त्यांना मी इतरांमध्ये बघून सलाम करतो. माझ्या बाबतीत असे होते. माझी बरोबरी कोणी करू शकत नाही. हे दयनीय आहे. हे आहे ते आहे. मी कुणी फार थोर माणूस आहे, असे ढोंग न करता, मी ते मान्य करतो. माझ्यात असामान्य प्रमाणात शिस्त, पद्धत व मानसशास्त्रीय जाण आहे. मी खरे तर हर्क्युल पायरो आहे. मी का लाल व्हावे, मी तोंडातल्या तोडात का पुटपुटावे की मी खरे तर मूर्ख आहे! ते खरे नसेल."

हर्क्युल पायरो एकमेव आहे, याबद्दल मला खात्री आहे. सुदैवाने, थोडासुद्धा दुष्टावा न दाखवता, मी कबूल करतो, की पायरो त्याच्याभोवती काय चालले आहे, याची अजिबात पर्वा करत नाही.

चॅटेरटॉन बाईसाहेब, पायरोच्या अनेक उत्साही स्तुतीपाठकांपैकी एक होत्या. पेकिंगीजच्या चमत्कारीक वागणुकीपासून सुरवात करून, त्याने एक साखळी सुटी केली होती. त्यामुळे चोर आणि घरफोड्यांचा शोध लागला होता. तेव्हापासून चॅटेरटॉन बाईसाहेब त्याची मोठ्याने स्तुती करत असत.

पायरोला गटात बघणे खूप छान होते. त्याचे संध्याकाळचे अचूक कपडे, त्याचा सुंदर पांढरा टाय, बरोबर मध्ये पाडलेली भांगाची रेषा, पोमेडने

चापून चोपून बसवलेले केस व त्याच्या प्रसिद्ध मिशा --- हे सर्व मिळून स्वतःच्या दिसण्याच्या बाबतीत आग्रही असणारे एक ठराविक व्यक्तिमत्व उभे राही. या क्षणी या छोट्या माणसाला गंभीरपणे घेणे अवघड होते.

साधारण साडेअकराला, चॅटेरटॉन बाईसाहेब पायरोला त्याच्या चाहत्यांच्या गटातून सोडवून घेऊन भरभर खाली आमच्याकडे आल्या आणि त्याला घेऊन लांब गेल्या --- अर्थात गाड्याबरोबर नाळयाच्या यात्रेसारखा, मी पण होतो.

इतर पाहुण्यांना ऐकू येणार नाही इतपत लांब गेल्यावर, चॅटेरटॉन बाईसाहेब धापा टाकत म्हणाल्या, “माझ्या लहानशा वरच्या खोलीत तुम्हाला मला न्यायचे आहे. मिस्टर पायरो, तुम्हाला ती कुठे आहे, ते माहिती आहे का? तिथे तुमच्या मदतीची अगदी गरज असणारे कुणीतरी तुम्हाला सापडेल --- आणि मला माहिती आहे, की तुम्ही तिला मदत कराल. ती माझी जवळची मैत्रिण आहे, तेव्हा नाही म्हणू नका.”

बोलता बोलता मोठ्या हुरुपाने रस्ता दाखवत, चॅटेरटॉन बाईसाहेबांनी एक दार उघडले व काही आश्चर्योद्गार काढले

“प्रिय मार्ग्युरीटा, मी त्याना आणले आहे. ते तुझ्यासाठी तुला पाहिजे, ते काहीही करतील. मिस्टर पायरो, तुम्ही मिसेस क्लेटॉनला मदत कराल ना?”

आणि होकार गृहीत धरून आणि आतापर्यंतच्या तिच्या हालचालीतील जोश कायम राखत, ती मागे झाली.

मिसेस क्लेटॉन खिडकीजवळ एका खुर्चीत बसली होती. आता ती उठली व आमच्याकडे आली. तिच्या अंगावर फिकट काळी शोकवस्त्रे होती. त्यामुळे तिचे गोरेपण उठून दिसत होते. ती नक्कीच सुंदर बाई होती. ती एखाद्या मुलासारखी प्रामाणिक व मोकळ्या मनाची होती. त्यामुळे ती अधिकच सुंदर दिसत होती.

ती म्हणाली, ॲलीस चॅटेरटॉन इतकी दयाळू आहे. तिने हे घडवून आणले. ती म्हणाली, तुम्ही मला मदत कराल. मिस्टर पायरो, अर्थात मला माहिती नाही, की तुम्हाला ते शक्य होईल की नाही. पण मला आशा आहे, की तुम्हाला ते जमेल.”

तिने तिचा हात पुढे केला. पायरोने तो हातात घेतला. त्याने जवळून तिचे निरीक्षण करत, क्षणभराने तो सोडून दिला. असे करण्यात, त्याच्या मनात काही भलते नव्हते. ती शोधक, दयाळू नजर होती. एखाद्या निष्णात डॉक्टरने नवीन, दडपण आलेल्या रुग्णावरून शोधक नजर फिरवावी, तसे ते होते.

शेवटी तो म्हणाला, “बाईसाहेब, तुमची खात्री आहे का, की मी तुम्हाला मदत करू शकेन?”

“ॲलीस तसे म्हणते.”

“हो, पण मी तुम्हाला विचारतो आहे.”

तिच्या गालांवर थोडी लाली चढली. “म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“बाईसाहेब, तुम्हाला मी काय करायला हवे आहे?”

तिने विचारले, “तुम्हाला --- तुम्हाला मी कोण आहे, ते माहिती आहे का?”

“नक्कीच.”

“मिस्टर पायरो व कॅप्टन हेस्टीग्ज, मग तुम्ही तर्क करू शकता, की मला काय हवे आहे.” ती मला ओळखत असलेले बघून, मी खूष झालो --- “मेजर रिचने माझ्या नवऱ्याला मारले नाही.”

“कशावरून नाही?”

“काय म्हणालात?”

तिची अस्वस्थता बघून, पायरो हसला. त्याने परत म्हटले, ”मी म्हणालो, कशावरून नाही?”

“मला असे वाटते. पण खात्री नाही.”

“तरीही, ते अगदी साधे आहे. पोलीस --- वकील --- ते सगळेजण तो प्रश्न विचारतील. की मेजर रिचने मिस्टर क्लेटॉनला का मारले? मी उलटे विचारतो, की मेजर रिचने मिस्टर क्लेटॉनला का मारले नाही?”

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे, की मी हे एवढे खात्रीपूर्वक कसे काय सांगू शकते? ठीक आहे. पण मला माहिती आहे. मला मेजर रिच चांगले माहिती आहेत.”

पायरो कशाही सुरात बोलला, “तुम्हाला मेजर रिच चांगले माहिती आहेत?”

परत तिचे गाल लाल झाले. “हो, ते तसेच म्हणतील --- ते काय विचार करतील --- ओहो, मला माहिती आहे.”

“नक्कीच खात्रीने ते तुम्हाला विचारतील ---तुम्ही मेजर रिच यांना किती ओळखता? कदाचित तुम्ही खरे बोलाल. कदाचित खोटे बोलाल. एका बाईला खोटे बोलणे गरजेचे आहे. ते चांगले शस्त्र आहे. पण तीन प्रकारचे लोक आहेत की ज्यांच्याशी तिचा विश्वास असेल तर, बाईने खरे बोलावे. तिच्या चुका पोटात घेणाऱ्या वडिलांशी, तिचे केस नीट राखणाऱ्याशी आणि खासगी गुप्तहेराशी. बाईसाहेब, तुमचा माझ्यावर विश्वास आहे का?” मार्ग्युरीटा क्लेटॉनने एक खोल श्वास घेतला. ती पोरकटपणे म्हणाली, “हो. माझा विश्वास आहे. असायलाच हवा.”

“मग तुम्ही मेजर रिचना किती चांगले ओळखता?”

तिने क्षणभर त्याच्याकडे शांतपणे पाहिले. मग तिने धीटपणे विरोध दाखवत, तिची हनुवटी उचलली.

"मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देते. मी दोन वर्षांपूर्वी जॅकला पाहिल्यांदा पाहिल्या क्षणापासून त्याच्यावर प्रेम करते --- अलीकडे मला असे वाटले --- माझा विश्वास आहे --- तो माझ्यावर प्रेम करायलाच आला आहे. पण तो तसे कधी म्हणाला नाही."

पायरो बोलला, "हे धक्कादायक आहे. तुम्ही प्रश्न विचारून या उत्तरावर येण्याचा माझा एक तास वाचवला आहे. तुमची जाण चांगली आहे. आता तुमचा नवरा --- त्याला तुमच्या भावनांचा संशय आला का?"

मार्ग्युरीटा सावकाश बोलली, "मला माहिती नाही. मला वाटते --- अलीकडे --- त्याला आला असावा. तो वेगळा वागू लागला होता --- पण तो माझा केवळ तर्क असू शकेल."

"बाकी कुणाला माहिती नव्हते?"

"असे मला वाटते."

"आणि बाईसाहेब, मला सांगा, तुमचे तुमच्या नवऱ्यावर प्रेम नाही का?"

मला वाटते, या बाईने दिले, तसे फार कमी बायकांना याचे उत्तर देता येईल. त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करायचा प्रयत्न केला असता.

मार्ग्युरीटा क्लेटॉन अगदी साधेपणे म्हणाली, "नाही."

"आता आम्हाला समजले, आपण कुठे आहोत. बाईसाहेब, तुमच्या मते, मेजर रिचने तुमच्या नवऱ्याला मारले नाही, पण सगळे पुरावे

त्याच्याकडेच बोट दाखवतात. त्या पुराव्यांमध्ये काही गफलत असल्याचे तुमचे स्वतःचे म्हणणे आहे का?

“नाही, मला काही माहिती नाही.”

“तुमच्या नवऱ्याने तो स्कॉटलंडला जात असल्याचे तुम्हाला पहिल्यांदा केव्हा सांगितले?”

“जेवण झाल्यावर लगेच. तो म्हणाला, ते कंटाळवाणे आहे. पण त्याला जायला लागेल. तो म्हणाला, ते जमिनीच्या किमतीसंबंधी काही आहे.”

“आणि त्यानंतर?”

“तो बाहेर गेला --- त्याच्या क्लबमध्ये, मला वाटते --- त्यानंतर मी त्याला पाहिले नाही.”

“आता मेजर रिच --- त्या संध्याकाळी त्याची मनस्थिती कशी होती? नेहमीप्रमाणे?”

“हो, मला तसे वाटते.”

“म्हणजे तुमची खात्री नाही का?”

मार्ग्युरीटाने तिच्या पापण्या फडफडवल्या. “तो थोडा बेचैन होता माझ्या बाबतीत --- इतरांशी नव्हे. पण मला वाटते, तो तसा का होता, हे मला माहिती आहे. समजले का? माझी खात्री आहे, की मुद्दाम केलेले दुर्लक्ष किंवा लक्ष नसणे, हेच याचे योग्य वर्णन असू शकते --- एडवर्डचा याच्याशी

काही संबंध नाही. एडवर्ड स्कॉटलंडला जात असल्याचे ऐकून, तो आश्चर्यचकित झाला, पण त्यात काही विशेष नव्हते.''

आणि मग त्या संध्याकाळी वेगळे काही घडले नाही?''

मार्ग्युरीटाने विचार केला. ''नाही. विशेष काही नाही.''

''पेटी तुमच्या --- लक्षात आली का?''

तिने शहारून मान हलवली. ''मला त्याची आठवणदेखील नव्हती --- किंवा ती कशी दिसते, तेही मला माहिती नव्हते. जवळजवळ संध्याकाळभर आम्ही पोकर खेळत होतो.''

''कोण जिंकले?''

''मेजर रिच. माझे आणि मेजर कर्टीसचेही, नशीब चांगले नव्हते. स्पेन्सेस थोडेफार जिंकत होते. पण मेजर रिच मुख्य जेता होता.''

''मेजवानी केव्हा संपली?''

''मला वाटते, साधारण साडेबाराला. आम्ही सगळे एकदमच बाहेर पडलो.''

''आहा!''

पायरो विचारात हरवून, शांत राहिला.

मिसेस क्लेटॉन म्हणाली, ''मला वाटते, मी तुम्हाला जास्त मदत करायला हवी होती. मी तुम्हाला फार थोडेच सांगू शकले.''

''आतापुरते ठीक आहे --- हो. बाईसाहेब, भूतकाळाबद्दल काय?''

"भूतकाळ?"

"हो. तेव्हा काही घडले नाही का?"

ती लाजली. म्हणजे तो स्वतःला मारून घेणारा भयंकर मनुष्य? तो काही माझा अपराध नव्हता. खरेच मी काही केले नव्हते."

"मी त्या घटनेबद्दल बोलत नाही आहे."

"ते भयंकर युद्ध? पण इटालियन्स युद्ध करतातच. मनुष्य मारला गेला नाही, म्हणून मी आभार मानले."

पायरोने थंडपणे कबूल केले, "तुम्ही सुटकेचा निःश्वास सोडला असेल."

ती त्याच्याकडे संशयाने बघत होती. तो उठला. त्याने तिचा हात हातात घेतला. तो म्हणाला, "बाईसाहेब, मी तुमच्यासाठी युद्ध करणार नाही. पण तुम्ही मला जे करायला सांगितले आहे, ते मी करेन. मी खरे काय ते शोधून काढेन. आपण अशी आशा करुया, की तुम्हाला जे वाटते, ते खरे असेल. सत्य तुम्हाला मदत करेल. त्रास देणार नाही."

मेजर कर्टीसबरोबर आमची पहिली मुलाखत झाली. तो साधारण चाळीस वर्षांचा, दणकट, काळयाभोर केसांचा आणि ब्रॉन्झच्या चेहऱ्याचा होता. त्याला गेली काही वर्षे मेजर रिच व क्लेटॉन्स माहिती होते. त्याने वर्तमानपत्रात छापून आलेले मान्य केले.

क्लेटॉन व त्याने साडेसातपूर्वी थोडाच वेळ, क्लबमध्ये बरोबर पेयपान केले होते. क्लेटॉन म्हणाला होता, की स्कॉटलंडला जाण्यासाठी तो उस्टन स्टेशनला जाताना मेजर रिचला भेटणार आहे .

“मिस्टर क्लेटॉन कसा होता? आनंदी की नाराज?”

मेजरने विचार केला. तो सावकाश बोलणारा मनुष्य होता.” शेवटी तो बोलला, “मला तो चांगल्या मनस्थितीत वाटला.”

“मेजर रिचबरोबर त्याचे पटत नसल्याचे वगैरे, तो काही बोलला नाही?”

“नाही. बरे झाले देवा, ते चांगले मित्र होते.”

“त्याने मेजर रिचबरोबरील त्याच्या बायकोच्या मैत्रीला काही हरकत घेतली का?”

मेजरचा चेहरा लाल झाला.

“तुम्ही ती बेकार वर्तमानपत्रे, त्यातील सूचना आणि खोटेनाटे वाचत असता. अर्थात तो तसे काही बोलला नाही. पण तो मला म्हणाला, “अर्थात मार्ग्युरीटा जाते आहे.”

“अस्स! आता संध्याकाळी --- मेजर रिचचे वागणे --- ते नेहमीसारखेच होते का?”

“मला काही फरक जाणवला नाही.”

“आणि बाईसाहेब? ती पण नेहमीसारखीच होती?”

तो विचार करत बोलला, “म्हणजे आता मी विचार केला, तर ती जरा गप्प होती, विचारात गुंग होती आणि वेगळी पडली होती.”

‘प्रथम कोण आले?”

“स्पेन्सर्स. मी आलो, तेव्हा ते तिथे होते. खरे तर मी मिसेस क्लेटॉनसाठी आलो होतो. पण मला असे कळले, की ती आधीच निघून गेली आहे. त्यामुळे मी तिथे थोडा उशीरा पोचलो.”

“तुम्ही तुमचे मनोरंजन कसे केले? तुम्ही नृत्य केले? तुम्ही पत्ते खेळलात?

दोन्ही थोडे. पहिल्यांदा नाच केला.”

“तुम्ही पाचजण होतात?”

“हो, पण ठीक होते. कारण मी नाचत नाही. मी गाणी लावतो व इतर लोक नाचतात.”

“कोणाबरोबर कोण नाचले?”

“खरे तर स्पेन्सर्सना एकत्र नाचायला आवडते. ते त्यासाठी वेडे आहेत. ते खूप प्रकारचे नाच करतात.”

“म्हणजे मिसेस क्लेटॉन जास्त करून मेजर रिचबरोबर नाचली?”

“बरोबर.”

“मग तुम्ही पोकर खेळलात?”

“हो.”

“तुम्ही केव्हा निघालात?”

“आहा, लवकरच. मध्यरात्रीनंतर थोड्या वेळाने.”

“सगळे एकदमच बाहेर पडलात का?”

‘हो. खरे तर आम्ही एकच टॅक्सी केली. पहिल्यांदा मिसेस क्लेटॉनला सोडले. मग मला आणि स्पेन्सेस केसिंग्टनला सोडायला गेले.”

आमची पुढची भेट मिस्टर आणि मिसेस स्पेन्स यांच्याकडे ठरली. फक्त मिसेस स्पेन्स एकट्याच घरात होत्या.

फक्त मेजर रिचच्या पत्त्यातील चांगल्या नशीबाबद्दल त्यांना थोडी असूया वाटत असल्याचे जाणवले.

सकाळी लवकर पायरोचे स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर जापशी फोनवर बोलणे झाले. त्याचा परिणाम म्हणून आम्ही मेजर रिचच्या घरी आलो आणि त्याच्या पुरुष नोकराला, बर्गोयनला भेटलो. तो आमची वाटच बघत होता.

त्याचा पुरावा अगदी नेमका व स्पष्ट होता.

आठला दहा मिनिटे असतांना मिस्टर क्लेटॉन आले. वाईट नशीबाने त्याच क्षणी मेजर रिच बाहेर पडले होते. मिस्टर क्लेटॉन म्हणाले, की ते थांबू शकत नाहीत, कारण त्यांना गाडी गाठायची होती. पण ते एक चिठ्ठी लिहितील. तसे करण्यासाठी ते हॉलमध्ये गेले. बर्गोयनने त्याचे मालक आल्याचे ऐकले नाही, कारण तो बाथरूममध्ये होता. मेजर रिच अर्थात

त्यांच्या किल्लीने दार उघडून आत आले. त्याच्या मते त्यांनी बर्गोयनला दहा मिनिटांने सिगरेटी आणायला बाहेर पाठवले. नाही. तो हॉलमध्ये गेलाच नाही. मेजर रिच दारात उभे होते. पाच मिनिटांनी तो सिगरेटी घेऊन परत आला आणि त्यावेळी तो हॉलमध्ये गेला. तेव्हा त्याचे मालक सोडून हॉल रिकामा होता. मालक खिडकीशी सिगरेट ओढत उभे होते. मालकाने विचारले त्यांची अंघोळीची तयारी झाली आहे का आणि त्यचे उत्तर हो असे आल्यावर ते अंघोळीला गेले. बर्गोयनने मिस्टर क्लेटॉन आल्याचे काही सांगितले नाही. कारण त्याने गृहीत धरले, की त्या दोघांची भेट झाली असणार व नंतर त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला असणार. त्याच्या मालकांचे वागणे नेहमीसारखेच होते. त्यांनी अंघोळ केली. कपडे बदलले आणि नंतर थोड्या वेळाने मिस्टर आणि मिसेस स्पेन्स आले. त्यांच्या पाठोपाठ मेजर कर्टीस आणि मिसेस क्लेटॉन आले.

बर्गोयनने स्पष्ट केले, की त्याचे मालक येण्यापूर्वी मिस्टर क्लेटॉन गेले असतील, असे त्याला मुळीच वाटले नाही. असे करण्यासाठी मिस्टर क्लेटॉनना पुढचे दार ओढून घ्यावे लागले असते व त्याचा आवाज नोकराला नक्की आला असता.

तरीही त्याच उघड पद्धतीने बर्गोयनला प्रेत सापडले. ते कसे ते तो सांगू लागला. पहिल्यांदाच माझे लक्ष त्या दुर्दैवी पेटीकडे गेले. ती एक चांगल्या मोठ्या आकाराची लाकडी पेटी होती. ग्रामोफोनच्या छोट्या खोलीच्या पुढच्या भिंतीला लागून ती ठेवलेली होती. ती गडद लाकडाची

बनवलेली होती व त्याला ब्रासचे खिळे ठोकलेले होते. त्याचे झाकण सहज उघडत होते. मी ते बघून शहारलो. जरी ते नीट पुसले असले, तरी त्यावरील अशुभ डाग राहिलेले होते.

पायरोने अचानक काही उद्गार काढले. "ती भोके विचित्र वाटत आहेत. एखाद्याला वाटेल, ती नव्याने पाडली आहेत."

ती तीन चार भोके पेटीच्या मागील बाजूस, भिंतीला लागून होती. ती साधारण पाऊण इंच व्यासाची होती आणि ती नक्कीच नुकतीच पाडल्यासारखी दिसत होती."

पायरो ती तपासण्यासाठी वाकला. तो नोकराकडे प्रश्नार्थक नजरेने बघत होता.

"हे खरेच काही नवलपूर्ण दिसते आहे. मला पूर्वी ती बघितलेली आठवत नाहीत. किंवा कदाचित आधी ती माझ्या लक्षात आली नसतील."

पायरो म्हणाला, "त्याचे एवढे काही नाही."

पेटीचे झाकण लाऊन, तो खोलीत मागे झाला व खिडकीकडे पाठ करून उभा राहिला. मग त्याने अचानक प्रश्न विचारला, "मला सांग, जेव्हा त्या रात्री तू तुझ्या मालकासाठी सिगरेटी आणल्यास, तेव्हा खोलीतील काही हलवले गेले नव्हते का?"

बर्गोयनने थोडे कां कू केले. मग थोड्या नाखुषीने तो म्हणाला, "सर, हे तुम्हाला सांगणे जरा विचीत्र आहे. पण आता तुम्ही विचारत आहात, तर

ते तसे होते. झोपायच्या खोलीपासून वाऱ्याची झुळूक ज्या पडद्यामुळे अडवली जाते, तो थोडा डावीकडे सरकवलेला होता.”

“असे का?”

पायरो चपळपणे पुढे आला व पडदा ओढला. तो चामड्याचा छान पडदा होता. पायरोने तसे केल्यामुळे, आधीच फारशी न दिसणारी पेटी पूर्णपणे दिसेनाशी झाली.

नोकर म्हणाला, “हं सर, बरोबर आहे. ते तसेच होते.”

“आणि दुसऱ्या दिवशी सकाळी?”

“ते तसेच होते. मला आठवते, मी ती पेटी हलवली आणि तेव्हा मला डाग दिसले. सर गालिचे धुवायला गेले. म्हणूनच त्याखालील जमीन दिसू लागली.”

पायरोने मान हलवली. “अस्स! आभारी आहे.” त्याने चुरचुरीत नोट नोकराच्या हातात ठेवली.

“सर, आभारी आहे.”

आम्ही रस्त्यावर आलो, तेव्हा मी म्हणालो, “पायरो, तो पडद्याचा मुद्दा --- तो रिचच्या बाजूने मदत करेल, असा आहे का?”

पायरो दुःखाने म्हणाला, “हा त्याच्याविरुद्धचा अजून एक मुद्दा आहे. पडद्यामुळे खोलीतून पेटी दिसेनाशी झाली. त्यामुळे गालीच्यावरचे डागदेखील झाकले गेले. आज ना उद्या रक्त लाकडात शोषले गेले असते

आणि गालिच्यावर डाग पडला असता. पडद्यामुळे हे सगळे तात्पुरते झाकले गेले. हो --- पण त्यात असे काही आहे, जे मला समजत नाही आहे. हेस्टीग्ज, नोकर, नोकर."

"नोकराचे काय? तो तर चांगला हुशार माणूस वाटतो आहे."

"तू म्हणतोस तसा खूप हुशार. ते चांगले आहे. पण मग मेजर रिचला हे समजले नाही का, की सकाळी तिथे प्रेत असल्याचे नोकराच्या लक्षात येईल? खून केल्याबरोबर त्याला वेळ नव्हता --- ठीक आहे. पण त्याने पेटीत कोंबलेले प्रेत, त्यापुढे ओढलेला पडदा, हे संध्याकाळभर तसे राहील. पण पाहुणे गेल्यावर? त्यानंतर त्याला प्रेताची विल्हेवाट लावायला वेळ होता."

"कदाचित त्याला वाटले असेल की डाग नोकराच्या लक्षात येणार नाहीत?"

"माझ्या मित्रा, हे विचित्र आहे. डाग पडलेला गालिचा, हा चांगल्या नोकराच्या पहिल्यांदा लक्षात येणार."

"आणि मेजर रिच, तो झोपायला जातो आणि आरामात घोरत पडतो आणि प्रेताचे काही करत नाही. हे फार उल्लेखनीय आणि रुचीपूर्ण आहे."

मी सुचवले, "परवा रात्री गाणी लावतांना, कर्टीसने कदाचित डाग पाहिले असतील."

ते शक्य वाटत नाही. पडद्यामुळे बरोबर तिथे गडद सावली आली होती. नाही. पण मला दिसू लागले आहे. मला पुसटसे डोळयांसमोर येऊ लागले आहे.”

मी उत्सुकतेने विचारले, “काय दिसू लागले?”

“शक्यता. आपण असे म्हणू शकू का, की वेगळे स्पष्टीकरण! आपली पुढची भेट यावर कदाचित प्रकाश टाकू शकेल.”

आमची पुढची भेट प्रेताची तपासणी केलेल्या डॉक्टरबरोबर होती. त्याने कोर्टाच्या चौकशीच्या वेळी जे सांगितले होते, त्याचीच त्याने पुनरावृत्ती केली. मिस्टर क्लेटॉनला एका लांब, अरुंद, बाईच्या टोकेरी बुटासारख्या सुऱ्याने छातीत भोसकले गेले होते. सुरा जखमेत तसाच होता. मरण तत्काळ आले. सुरा मेजर रिचचा होता. सहसा तो त्याच्या लिहायच्या टेबलावर पडलेला असे. त्यावर बोटांचे ठसे नसल्याचे डॉक्टरांना कळले. बहुधा रुमाल वापरला गेला असावा. वेळेच्या बाबतीत, सात ते नऊ मध्ये कधीही खून झाला असावा.

पायरोने विचारले, की मध्यरात्रीनंतर खून झाला असण्याची शक्यता नाही का?”

“नाही. ते मी सांगू शकत नाही. दहा वाजता बाहेर --- पण नाही. साडेसात ते आठमध्ये खून झाल्याचे स्पष्ट दिसते आहे.”

आम्ही परत घरी आलो, तेव्हा पायरो बोलला, “अजून एक शक्यता दिसते आहे. हेस्टीग्ज, मला नवल वाटते, तुला ती दिसते का. मला ती स्पष्ट दिसते आहे. आणि त्याविषयी खात्री होण्यासाठी मला फक्त एका बाबीची गरज आहे.”

मी म्हणालो, “हे चांगले नाही. मला काही दिसत नाही.”

“पण प्रयत्न तर कर. हेस्टीग्ज, प्रयत्न कर.”

मी म्हणालो, “ठीक आहे, सात चाळीसला क्लेटॉन चांगला जिवंत आहे. त्याला शेवटचे जिवंत पहाणारा माणूस रिच आहे --- “

“असे आपण गृहीत धरू.”

“का तसे नाही का?”

“माझ्या मित्रा, तू विसरतोस, की मेजर रिचने ही गोष्ट नाकारली आहे. तो ठामपणे सांगतो आहे, की तो घरी आला, तेव्हा क्लेटॉन आधीच गेलेला होता.”

पण नोकर म्हणतो त्याने दाराचा आवाज आल्याने, क्लेटॉनला जाताना ऐकले. आणि शिवाय जर क्लेटॉन बाहेर पडला असेल, तर तो परत कधी आला? तो मध्यरात्रीनंतर परत आला असला पाहिजे. कारण डॉक्टर खात्रीपूर्वक म्हणतो, की क्लेटॉन त्यापूर्वी निदान दोन तास मेला होता. त्यामुळे एकच शक्यता उरते.”

पायरो बोलला, “हो ना मित्रा?”

“म्हणजे पाच मिनिटे क्लेटॉन एकटा हॉलमध्ये होता. तेव्हा कोणीतरी आले व त्याला मारले. पण तिथेही तीच अडचण आहे. नोकराच्या नकळत फक्त ज्याच्याकडे किल्ली आहे, तोच आत येऊ शकतो. त्याच तऱ्हेने खुन्याला जाताना दार लावावे लागले असेल. त्याचा आवाज आला असेल. तो आवाजही नोकराने ऐकला असेल.”

पायरो म्हणाला, “तेच तर, आणि त्यामुळे --- “

मी म्हणालो, “आणि त्यामुळे --- काही नाही. मला तर याहून वेगळी उकल दिसत नाही.”

पायरो पुटपुटला, “हे दयनीय आहे. ते खरे तर इतके साधे आहे --- क्लेटॉन बाईसाहेबांच्या निळ्या डोळ्यांइतके स्पष्ट आहे.”

“तुला खरेच असे वाटते --- “

“जोपर्यंत मला पुरावा मिळत नाही --- तोपर्यंत मी कशावरच विश्वास ठेवत नाही --- एक लहानसा पुरावा मला पुरेसा आहे.”

त्याने फोन उचलून स्कॉटलंड यार्डच्या जापला फोन केला.

वीस मिनिटानंतर आम्ही टेबलावरील वेगवेगळया वस्तूंच्या लहानशा ढीगापुढे उभे होतो. त्या मृत माणसाच्या खिशातील वस्तु होत्या.

त्यात रुमाल, थोडी सुटी नाणी, तीन पौंड व दहा शिलिंग असलेले छोटे पाकीट, काही बिले आणि मार्ग्युरीटा क्लेटॉनचा एक झिजलेला फोटो होता. तिथे छोटा चाकू, सोनेरी पेन्सिल व त्रासदायक लाकडी अवजार होते.

त्यातील शेवटच्या वस्तूवर पायरोने झडप घातली. त्याने ते उकलले. त्यातून अनेक लहान लहान पाती बाहेर पडली.

"हे बघ हेस्टीग्ज, जीनसकट लिंबू सरबताची गोळी आणि इतर काहीबाही. या वस्तू वापरून त्या पेटीला काही मिनिटात, भोके पाडणे शक्य होते."

"आपण पाहिलेली भोके?"

"तीच ती."

"म्हणजे ती क्लेटॉनने स्वतः पाडली, असे तुला म्हणायचे आहे?"

"हो. हो. तुला ती भोके बघून काय वाटते? ती काही बघण्यासाठी नव्हती. कारण ती पेटीच्या मागील बाजूस होती. मग ती कशासाठी होती? स्पष्टपणे हवेसाठी होती? पण तुम्ही प्रेतासाठी काही हे करू शकणार नाही. त्यामुळे ती खुन्याने नक्की केली नव्हती. यामुळे एकच गोष्ट सुचवली जाते --- की माणूस त्या पेटीत लपून बसला होता. आणि या गृहीतकावर आधारित गोष्टी समजायला सोप्या होतात. मिस्टर क्लेटॉनला मिस्टर रिच व त्याच्या बायकोबद्दल असूया वाटते आहे. तो आपण गावाला निघून गेल्याची फार जुनी गोष्ट वापरतो. तो रिचला बाहेर जातांना बघतो. मग तो आत येतो. चिठ्ठी लिहिण्याच्या बहाण्याने एकटा रहातो. झटपट पेटीला भोके पाडतो आणि त्यात लपून बसतो. त्या रात्री त्याची बायको तिथे येणार असते. बहुतेक रिच बाकीच्यांना पाठवून देईल व ते गेल्यावर, जाण्याचे ढोंग

करून परत येईल. काय होते ते त्याला कळेल. वाईट संशयाने पोखरला जाण्यापेक्षा काहीही सहन करणे ठीक होते.”

मग बाकीचे सगळे गेल्यावर रिचने त्याला ठार मारले, असे तू सुचवतो आहेस का? पण डॉक्टर म्हणाले, ते अशक्य आहे.”

“तेच तर. त्यामुळे हेस्टीग्ज, तो संध्याकाळीच मारला गेला असला पाहिजे.”

“पण सगळे घरात होते.”

पायरो थंडपणे बोलला, “हो ना. तुला त्यातली सुंदरता दिसते का? प्रत्येकजण खोलीत होता. काय पुरावा! काय धारिष्ट्य! काय धसमुसळेपणा! काय थंड डोक्याने केलेले कृत्य!”

“बरोबर. हेस्टीग्ज, तो संध्याकाळीच मारला गेला असला पाहिजे.”

“मला अजूनही समजत नाही.”

पडद्यामागे फोनोग्राफ चालवायला व गाणी बदलायला कोण गेले? आठव, फोनोग्राफ व पेटी शेजारी शेजारी होते. बाकी सगळे नाचत होते --- फोनोग्राफ वाजत होता. जो मनुष्य नाचत नव्हता, त्याने पेटीचे झाकण उघडले आणि त्याच्या शर्टाच्या बाहीत लपवलेली सुरी त्या पेटीत लपलेल्या माणसाच्या हृदयात खोलवर भोसकली.”

“अशक्य. तो माणूस जोरात ओरडला असता.”

“जर त्याला आधी अमली पदार्थ दिले गेले असते, तर नाही, नाही का?”

“अमली पदार्थ?”

“हो. साडेसातला क्लेटॉनने कोणाबरोबर पेय घेतले होते? आहा! आता तुझ्या लक्षात येईल. कर्टीस. कर्टीसने क्लेटॉनच्या मनात मिसेस क्लेटॉन व रिचबद्दलच्या संशयाची आग भडकवली होती. . कर्टीसनेच हा बेत सुचवला होता --- स्कॉटलंडला जाण्याचा, पेटीत लपून बसण्याचा --- पडदा सरकवण्याचे शेवटचे दृष्य! क्लेटॉनला पेटीचे झाकण थोडेसे उचलून आराम मिळवता आला नसता, असे नाही. नाही कर्टीसलाही कुणाच्या नकळत ते थोडेसे उचलता आले असते. पण बेत कर्टीसचा आहे. आणि त्याचे सौदर्य लक्षात घे, हेस्टीग्ज. जर रिचच्या लक्षात आले असते, की पडदा थोडा सरकवला गेला आहे आणि त्याने परत तो होता तसा केला असता तर, त्याच्याकडे वेगळा बेत तयार होता. क्लेटॉन पेटीत लपला होता. सौम्य गुंगी आणणाऱ्या त्याला दिल्या गेलेल्या पेयाचा परिणाम होऊ लागला होता. तो बेशुद्ध होतो. कर्टीस झाकण उचलतो आणि कार्यभाग उरकतो --- फोनोग्राफ वाजत रहातो. त्यावर गाणे लागलेले असते --- ‘माझा बाळ घरी येतो आहे.’”

“मला माझा आवाज सापडला, “का? पण का?”


पायरो त्याचे खांदे शहारवतो.

“माणसे स्वतःला मारून का घेतात? दोन इटालीयन युद्ध का खेळतात? याचे उत्तर आहे अर्थात एका बाईसाठी! कर्टीस उग्र स्वभावाचा आहे. त्याला मार्ग्युरीटा क्लेटॉन हवी होती. तिचा नवरा आणि रिच याना बाजूला करून, तिला मिळवता येईल, असे त्याला वाटले. म्हणजे नवऱ्याला मारून आणि त्याचा आळ रिचवर आणून,”

तो विचारपूर्वक पुढे बोलला, “.या मुलांसारख्या साध्या बायका --- फार धोकादायक असतात. पण माझ्या देवा, काय कलात्मक रचनात्मक बेत! माझ्या मनात येते, त्या माणसाला फाशी द्यायला पाहिजे. मी बुद्धिमान असेन पण मला दुसऱ्यांची बुद्धिमत्तादेखील ओळखता येते. परिपूर्ण खून. माझ्या मित्रा, मी हर्क्युल पायरो तुला हे सांगतो. परिपूर्ण खून. धक्कादायकपणे वेगळा!

WASPS' NEST

# मधमाशांचे पोळे




जॉन हॅरीसन घराबाहेर आला आणि बागेकडे बघत, क्षणभर गच्चीत उभा राहिला. तो एक महाकाय, नम्र व हडकुळ्या चेहऱ्याचा माणूस होता. तो सहसा थंड असे, पण जेव्हा आताप्रमाणे त्याच्या ताठर चेहऱ्यावर हास्य फुलले, तेव्हा तो फार आकर्षक दिसू लागला.

जॉन हॅरीसनचे त्याच्या बागेवर प्रेम होते. ऑगस्टच्या या संध्याकाळपेक्षा ती कधीच जास्त चांगली दिसली नव्हती. ती उन्हाळ्यामुळे

आळसटलेली व दमणूक झालेली, पण गच्च फुललेली होती. वेली गुलाब अजून सुंदर होते. गोड वाटाणे हवेत सुगंध पसरवत होते.

चांगला परिचित असा कडकड आवाज आल्याने हॅरीसनने त्वरेने डोके वळवले. बागेच्या दारातून कोण आत येत होते? दुसऱ्याच मिनिटाला रस्त्याने येणारी, कपडे व दिसण्याबद्दल काळजी घेतलेली आकृती, जगाच्या या भागात बघून, त्याच्या चेहऱ्यावर फार नवलपूर्ण भाव पसरले. तो ओरडला, "फार आश्चर्यजनक आहे! मिस्टर पायरो!"

तो खरेच प्रसिद्ध हर्क्युल पायरो होता. गुप्तहेर म्हणून त्याची जगभर कीर्ती पसरली होती.

तो म्हणाला, "हो. मीच आहे. तू मला एकदा म्हणाला होतास, 'तू इथे आसपास कुठे आलास, तर नक्की मला येऊन भेट.' मी तुझे म्हणणे मानले व हजर झालो."

हॅरीसन मनापासून बोलला, "मी धन्य झालो. बस व काही पेय घे."

अगत्यशील हाताने त्याने गॅलरीतील वेगवेगळ्या प्रकारच्या बाटल्या ठेवलेल्या टेबलाकडे निर्देश केला.

खुर्चीवर बसत पायरो म्हणाला, "मी तुझा आभारी आहे. मला वाटते तुझ्याकडे सरबत नाही? नाही. नाही. मला वाटले नसेल. मग फक्त सोडायुक्त पाणी. व्हिस्की नाही." हॅरीसनने पेला त्याच्यासमोर ठेवल्यावर, त्याने

त्याच्या भावना बोलून दाखवल्या, “या गर्मीने माझ्या मिशा ओल्या झाल्या आहेत.”

दुसऱ्या खुर्चीत बसत हॅरीसनने विचारले, “या बिनगर्दीच्या शांत ठिकाणी तू कसे काय येणे केलेस? सहज?”

“नाही रे मित्रा, कामासाठी.”

“कामासाठी? अशा निवांत जागी?”

पायरोने थंडपणे मान हलवली. “पण हो, माझ्या मित्रा, सगळे गुन्हे काही गर्दीत केले जात नाहीत.”

हॅरीसन हसला. “मला वाटते, माझा तो शेरा मूर्खपणाचा होता. पण इथे तू कुठल्या प्रकारच्या गुन्ह्याचा शोध घेत आहेस? की मी हे विचारू नये?”

गुप्तहेर म्हणाला, “तू विचारू शकतोस, खरेच तुला विचारावासा वाटेल असाच गुन्हा आहे.”

हॅरीसनने त्याच्याकडे कुतुहलाने पाहिले. त्याला त्या गुप्तहेराच्या पद्धतीत काही वेगळे वाटले. तो थांबत थांबत म्हणाला, “तू गुन्ह्याचा शोध घेत असल्याचे म्हणतोस, गंभीर गुन्हा का?”

“फारच गंभीर गुन्हा.”

”म्हणजे --- “

“खून.”

हर्क्युल पायरोने तो शब्द इतक्या थंडपणे उच्चारला, की हॅरीसनला धक्काच बसला. तो गुप्तहेर सरळ त्याच्या डोळयात बघत होता. आणि त्याच्या नजरेत काही वेगळेच जाणवत होते. हॅरीसनला कळेना, की पुढे काय करावे. शेवटी तो म्हणाला, “पण मी तर खुनासंबंधी काही ऐकले नाही.”

पायरो म्हणाला, “नाही, तू ऐकले नसशील.”

“कोणाचा खून झाला?”

पायरो म्हणाला, “अजून तरी ‘कुणाचा’ नाही.”

“काय?”

“म्हणून मी म्हणालो, की तू याबद्दल ऐकले नसणार. अजून न झालेल्या खुनाचा मी तपास करतो आहे.”

“पण असे बघ, हा मूर्खपणा आहे.”

“मुळीच नाही. खून होण्यापूर्वी, त्याचा तपास केला जाऊ शकतो. नंतर तपास करण्यापेक्षा आधी केलेला नक्कीच जास्त बरे. एखादा तर --- लहानशी कल्पना --- तो खून होण्यापासून रोकूही शकतो.”

हॅरीसन त्याच्याकडे बघत राहिला. “मिस्टर पायरो, तू हे गंभीरपणे बोलत नाही आहेस.”

“मी गंभीर आहे.”

“तुझा विश्वास आहे, की खून होणार आहे? ओहो, हे विचित्र आहे!”

कोणाच्या आश्चर्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत, पायरोने वाक्याचा पहिला भाग संपवला.

“हो, माझ्या मित्रा, जोपर्यंत आपण तो रोकू शकत नाही, असे मला म्हणायचे होते.”

“आपण?”

मी आपण म्हणालो. मला तुझ्या मदतीची गरज आहे.”

“त्यासाठीच तू इथे आला आहेस?”

पायरोने पुन्हा त्याच्याकडे पाहिले. ज्याचे वर्णन करता येणार नाही, अशा कशामुळे तरी हॅरीसन अस्वस्थ झाला.

“मिस्टर हॅरीसन, मी इथे आलो, कारण --- म्हणजे --- मला तू आवडतोस.”

मग एकदम वेगळ्या आवाजात तो म्हणाला, “मिस्टर हॅरीसन, तुझ्याकडे मधमाशांचे पोळे आहे. तुला ते नाहीसे केले पाहिजे.”

विषय बदलल्यामुळे हॅरीसनने गोंधळून जाऊन भुवई उंचावली. त्याने पायरोच्या नजरेला नजर मिळवली आणि घाबरलेल्या आवाजात विचारले, “खरे तर, मी ते करणार आहे किंवा तरुण लँगटॉन करणार आहे. तुला क्लॅउड लँगटॉन आठवतो का? ज्या जेवायच्या जागी मी तुला भेटलो, तिथेच तो देखील होता. तो आज संध्याकाळी पोळे काढायला येतो आहे. त्याला वाटते, त्याला ते जमेल.”

पायरो म्हणाला, “आहा, आणि तो ते कसे करणार आहे?”

“पेट्रोल आणि बागेची सुई. तो त्याची सुईसुद्धा आणणार आहे. माझ्या सुईपेक्षा त्याची सुई आकाराने जास्त सोयीस्कर आहे.”

पायरोने विचारले, “अजून दुसरा काही उपाय नाही का? पोटॅशियम सायनाईड?”

हॅरीसनला थोडे नवल वाटले. “आहे. पण तो जरा जास्त धोकादायक आहे. त्या पोळ्याच्या जागी ते विष ठेवण्यात धोका आहे.”

पायरोने थंडपणे मान हलवली. “हो. ते भयंकर विष आहे.” एक मिनिट थांबून, त्याने परत म्हटले, “भयंकर विष”.

हॅरीसन हसून बोलला, “जर तुम्हाला तुमच्या सासूला वाटेतून दूर करायचे असेल, तर काय?”

पण पायरो थंडच राहिला. “मिस्टर हॅरीसन, आणि तुमची त्याबद्दल खात्री आहे, की मिस्टर लँगटॉन ज्या पेट्रोलने मधमाशीचे पोळे नाहीसे करणार आहे, तेच ते आहे?

“अगदी खात्री आहे. का?”

“मला नवल वाटते. आज दुपारी मी बारचेस्टर येथील केमिस्टकडे गेलो होतो. माझ्या एका खरेदीसाठी मला विष पुस्तिकेवर सही करावी लागली. मी त्यातील शेवटचे नाव पाहिले. ते पोटॅशियम सायनाईड असून, त्यापुढे क्लॅउड लँगटॉनची सही होती.”

हॅरीसन, बघत राहिला व बोलला, “हे विचित्र आहे. लँगटॉन मला त्या दिवशी म्हणाला होता, की तो ते वापरायचा विचारदेखील करत नाही आहे. खरे तर तो म्हणाला, की त्या कारणासाठी ते विकले जाता कामा नये.”

पायरोने बागेकडे पाहिले. त्याने अगदी शांत आवाजात विचारले, “तुला लँगटॉन आवडतो का?”

हॅरीसनसाठी हा प्रश्न अनपेक्षित असल्याने, तो चाचरत म्हणाला, “मला --- मला --- म्हणजे, मला म्हणायचे आहे --- अर्थात, आवडतो. का आवडू नये?”

पायरो शांतपणे म्हणाला, “मला नवल वाटले की तुम्ही ते केले का?”

दुसऱ्याने उत्तर न दिल्याने, तो पुढे बोलत राहिला, “मला आश्चर्य वाटते, की त्याला तू आवडतोस का?”

‘मिस्टर पायरो, तुला काय म्हणायचे आहे? तुझ्या मनात काय आहे, मला समजत नाही.

“मी अगदी मोकळेपणे सांगतो. मिस्टर हॅरीसन, तुझे लग्न ठरले आहे. मला मॉली डीन माहिती आहे. ती खूप मोहक व सुंदर आहे. तुझ्याशी लग्न ठरण्यापूर्वी तिचे लग्न क्लॅउड लँगटॉनशी ठरले होते. तिने तुझ्यासाठी, ते मोडले.”

हॅरीसनने मान डोलवली.

पायरो म्हणाला, “त्याची काय कारणे होती, ते मी तिला विचारले नाही. ती बरोबर असतीलही. पण सांगायची गोष्ट म्हणजे लँगटॉन ते विसरला नाही किंवा त्याने तुला क्षमाही केलेली नाही.”

“मिस्टर पायरो, तू चुकत आहेस. मी खात्रीने सांगतो, तू चुकत आहेस. लँगटॉन दिलदार, खेळाडूच्या जातीचा, माणूस आहे. तो नवलपूर्ण रीत्या माझ्याशी चांगले वागतो --- तो अगदी टोकाला जाऊन माझ्याशी मित्रत्वाने वागतो.”

“आणि ते तुला असामान्य वाटत नाही का?” तू ‘नवलपूर्ण रीत्या’ असा शब्द वापरलास. पण तुला त्याचे नवल वाटलेले दिसत नाही.”

“मिस्टर पायरो, तुला काय म्हणायचे आहे?”

पायरो नवीन स्वरात बोलला, “म्हणजे असे की, योग्य वेळ येईपर्यंत, मनुष्य त्याच्या हेवा वाटण्याच्या भावना दाबून ठेऊ शकतो.”

हॅरीसन मानेने नकार देत, हसून बोलला, “हेवा?”

पायरो म्हणाला, “इंग्लिश लोक फार मूर्ख असतात. त्याना वाटते, की ते कुणालाही फसवू शकतील. पण त्यांना कुणीच फसवू शकणार नाही. खेळाडूपणा, चांगला मनुष्य --- ते कधीच वाईट वागणार नाहीत, असे त्यांना वाटते. आणि ते शूर, पण मूर्ख असल्याने, कधीकधी ते कारण नसतांना मरतात.”

हॅरीसन खालच्या आवाजात म्हणाला, "तू मला धमकी देतो आहेस, आता मला समजले -- इतका वेळ मी गोंधळलेला होतो. तू मला क्लॅउड लॅंगटॉनविषयी धमकी देतो आहेस. तू आज इथे तेवढ्यासाठी आला आहेस --- "

पायरोने मान हलवली. हॅरीसनने अचानक उडी मारली. "मिस्टर पायरो, तू वेडा झाला आहेस. हे इंग्लंड आहे. इथे अशा गोष्टी होत नाहीत. लग्न मोडलेले लोक दुसऱ्याच्या पाठीत सुरा भोसकत नाहीत किंवा विष देत नाहीत. तुझा लॅंगटॉनविषयीचा होरा चुकलेला आहे. तो माशीलाही मारणार नाही."

पायरो शांतपणे म्हणाला, "माशांचे आयुष्य माझ्यासाठी काही नाही. जरी तू म्हणत असलास, की लॅंगटॉन कुणाला मारू शकणार नाही, तरी तू हे विसरतोस, की आता तो हजारो मधमाशांचे आयुष्य धोक्यात आणायच्या विचारात आहे."

हॅरीसनने लगेच काही उत्तर दिले नाही. छोटा गुप्तहेर उठून उभा राहिला. पुढे सरकून त्याने हॅरीसनच्या खांद्यावर हात ठेवला. तो इतका चिडलेला होता, की त्याने हॅरीसनला जवळजवळ घुसळले व त्याच्या कानात बोलला, "माझ्या मित्रा, धीर धर. आणि मी जे दाखवतो आहे, ते पहा. झाडाच्या मुळांजवळ कडेला बघ. दिवसाच्या शेवटी मधमाशा शांतपणे पोळ्याकडे परतत आहेत का?" थोड्याच वेळात तिथे विनाश होणार आहे. पण त्यांना ते माहिती नाही. त्याना तसे सांगणारे कुणी नाही.

त्यांच्याकडे हर्क्युल पायरो नाही. मात्र इथे मी माझे काम करतो आहे. खून हे माझे काम आहे. आणि तो होण्यापूर्वी व नंतर माझे काम आहे. मिस्टर लँगटॉन मधमाशांचे पोळे काढायला कधी येणार आहेत?"

"लँगटॉन कधीच येणार --- "

"कधी?"

"नऊ वाजता. पण तुला सांगतो, तुझे सर्व चुकते आहे. लँगटॉन कधीच –-- "

भावनेच्या भरात, पायरो ओरडला, 'हे इंग्रज! त्याने हातात टोपी व काठी घेऊन रस्ता चालायला सुरवात केली. पण तो बोलण्यासाठी थांबला. "मी इथे थांबून तुझ्याशी वाद घालू इच्छित नाही. मी मला फक्त रागीट बनवू शकतो. पण लक्षात घे, मी नऊ वाजता परत येतो?"

हॅरीसनने बोलायला त्याचे तोंड उघडले पण पायरोने त्याला संधी दिली नाही. मला माहिती आहे, तू म्हणणार, 'लँगटॉन असे कधीच --- ! इत्यादी इत्यादी. "आहा, म्हणे लँगटॉन असे कधीच --- !

" पण तरीही! मी नऊ वाजता येतो आहे. पण हो, तू माझे मनोरंजन करणार आहेस --- असे समज --- किंवा असे म्हण की त्याने माझे मनोरंजन होईल ---मधमाशांचे पोळे काढतांना बघून, माझे मनोरंजन होईल. तुझे अजून एक इंग्लिश वागणे!"

तो उत्तरासाठी न थांबता, रस्त्याने भरभर चालत गेला. त्याच्यामागे दार करकर वाजले. एकदा बाहेर रस्त्यावर आल्यावर त्याचा वेग मंदावला. त्याचे अवसान गळून पडले. त्याचा चेहरा थंड व त्रासलेला झाला. एकदा त्याने खिशातून घड्याळ काढले व किती वाजले, ते पाहिले. आठ वाजून दहा मिनिटे झाली होती. तो पुटपुटला, “अजून पाऊण तास. मला वाटते, मी तिथेच थांबायला हवे होते.”

त्यच्या पाऊलांची गती मंदावली. तो जवळपास मागे फिरायच्या बेतात आला. काही अनोख्या शक्ती त्याला विरोध करत होत्या. तो जणू ठरवल्याप्रमाणे हलला व गावाच्या दिशेने चालू लागला. त्याचा चेहरा अजूनही त्रासलेला होता. एकदोनदा त्याने थोड्या असमाधानी माणसासारखे डोके हलवले.

जेव्हा तो बागेच्या फाटकाशी आला, तेव्हा अजून नऊला काही मिनिटे बाकी होती. अजून संध्याकाळ होती. क्वचित वाऱ्याची झुळूक पाने हलवत होती. कदाचित तेथील शांततेत, वादळापूर्वीच्या शांततेसारखी काही संकटाची चाहूल लागत होती.

पायरोचा वेग थोडासा वाढला. त्याला अचानक काही --- अतर्कतेचा धक्का बसला. कशाने कोणास ठाऊक, पण तो घाबरला.

त्याच क्षणी बागेचे गेट उघडले व क्लॉउड लँगटॉन त्यातून झटपट रस्त्यावर बाहेर पडला. त्याने पायरोला पाहिले.

“अरेच्च्या, शुभ संध्याकाळ.”

“मिस्टर लँगटॉन, शुभ संध्याकाळ. तुम्ही लवकर आलात का?”

लँगटॉनने त्याच्याकडे निरखून पाहिले. “तुम्हाला काय म्हणायचे आहे, मला समजले नाही.”

“तुम्ही मधमाशांचे पोळे काढले का?”

“खरे तर नाही.”

पायरो मवाळपणे बोलला, “ओहो, म्हणजे तुम्ही ते काढले नाही तर! मग तुम्ही काय केले?”

“थोडा वेळ बसलो आणि हॅरीसनबरोबर गप्पा मारल्या. पण मिस्टर पायरो, आता मला घाईने गेले पाहिजे. तुम्ही जगाच्या या भागात असाल, याची मला कल्पना नव्हती.”

“असे बघा, या भागात मला काम होते.”

“आहा, ठीक आहे. तुम्हाला हॅरीसन गच्चीत सापडेल. माफ करा, मी थांबू शकत नाही.”

तो गेला. पायरो त्याच्याकडे बघत राहिला. दिसायला चांगला तरुण, पण चेहरा पडलेला!

तो पुटपुटला, “तर मला हॅरीसन गच्चीत सापडेल. मला नवल वाटते.” तो गेट उघडून आत गेला. हॅरीसन टेबलाजवळ खुर्चीत न हलता, बसला होता. पायरो त्याच्याजवळ आला, तरी त्याने डोके हलवले नाही.

पायरो म्हणाला, “अरे मित्रा, तू ठीक आहेस ना?”

खूप वेळ शांतता होती. मग हॅरीसन विचित्रपणे झोपेत असल्यासारख्या आवाजात म्हणाला, “काय म्हणतो आहेस?”

“मी म्हणालो, तू ठीक आहेस ना?”

“ठीक आहेस ना? हो, का नसेन?”

“तुझ्यावर काही दुष्परिणाम झाले नाहीत? मग चांगले आहे.”

“दुष्परिणाम? कशामुळे?”

“धुण्याच्या सोड्यामुळे.”

अचानक हॅरीसन उठला. “धुण्याच्या सोडा? तुला काय म्हणायचे आहे?”

पायरोने क्षमायाचनेची हालचाल केली. “मी गरजेची खूपच खंत प्रकट करतो. त्यातील काही तुझ्यावरदेखील टाकतो.”

“काही माझ्यावरदेखील टाकतोस, कशासाठी?”

हॅरीसन त्याच्याकडे बघत राहिला. पायरो कुणाला उद्देशून असे नाही, पण जणू लहान मुलांना शिकवल्याच्या स्वरात शांतपणे बोलला, “असे बघ, एक फायदा किंवा तोटा असा आहे की, मी गुप्तहेर असल्याने, नेहमी गुन्हेगारांच्या सहवासात असतो आणि ते तुम्हाला फार रुचीपूर्ण व चौकस गोष्टी शिकवू शकतात. एकदा एक पाकीट मारल्याची केस होती. मला स्वतःला त्यात स्वारस्य होते. कारण ते म्हणत होते, की त्याने पाकीट

मारले आहे. पण त्याने कधी एकदाही पाकीट मारले नव्हते. त्यामुळे मी त्याला बाजूला घेतले. तो ऋणाइत असल्याने, त्याने त्याला त्याला फक्त जे येत होते, ते करून दाखवले --- ते म्हणजे त्याच्या व्यवसायाचे गुपित होते.''

''त्यामुळे असे झाले, की मी ठरवले, तर मला कोणाही माणसाचे पाकीट त्याला न कळता मारता येते. मी एक हात त्याच्या खांद्यावर ठेवतो. स्वतःला तयार करतो आणि त्याला काही समजत नाही. तरीही मी त्याच्या खिशातील माल माझ्या खिशात टाकू शकतो. आणि त्याच्या बदली धुण्याचा सोडा त्याच्या खिशात टाकू शकतो.''

''स्वप्नाळूपणे पायरो म्हणाला, ''जर एखाद्याला पटकन विषाची पुडी कुणी न बघता, पेल्यात टाकायची असेल, तर तर त्याने ती नक्की त्याच्या कोटाच्या उजव्या हाताच्या खिशात ठेवायला पाहिजे. दुसरीकडे कुठेही नाही. मला माहिती आहे, ती तिथेच असली पाहिजे.''

त्याने त्याच्या खिशात हात घातला. आणि काही पांढरे गुबगुबीत खडे काढले. तो पुटपुटला, ''असे सुटे ठेवणे, अती धोकादायक!'' शांतपणे, घाई न करता, त्याने दुसऱ्या खिशातून, रुंद तोंडाची एक बाटली काढली. त्याने ते खडे टेबलावर ठेऊन बाटलीत टाकले व बाटली साध्या पाण्याने भरली. मग त्या बाटलीला काळजीपूर्वक बूच बसवले. खडे विरघळेपर्यंत बाटली जोरजोराने हलवली.

हॅरीसन भारल्यासारखा त्याच्याकडे बघत होता.

ते द्रावण तयार केल्यावर समाधानाने, पायरो पोळ्याकडे गेला. त्याने बाटलीचे बुच उघडले. त्याचे तोंड बाजूला केले व ते द्रावण मधमाशीच्या पोळ्यात ओतले. मग हात दोन हात अंतरावर उभा राहून बघत राहिला.

काही मधमाशा, ज्या परतत होत्या, थोड्या इकडे तिकडे उडाल्या व मग स्थिर झाल्या. इतर मधमाशा पोळ्याच्या भोकांमधून फक्त मरण्यासाठी बाहेर पडल्या. पायरोने एकदोन मिनिटे बघितले व मग डोके हलवून, परत गॅलरीत आला.

तो म्हणाला, “तत्काळ मरण. अगदी तत्काळ मरण.”

हॅरीसन बोलला, “त्यांना किती माहिती असते?”

पायरोने सरळ बघितले. “मी तुला सांगितले तसे, मी क्लॅउड लॅंगटॉनचे नाव पुस्तकात पाहिले. मी तुला सांगितले नाही ते असे, की लगेच नंतर माझी व त्याची भेट झाली. त्याने मला सांगितले, की तो तुझ्या विनंतीला स्मरून, मधमाशांचे पोळे काढण्यासाठी, पोटॅशियम सायनाईड विकत आणणार आहे. माझ्या मित्रा, ते मला थोडे विचित्र वाटले, कारण मला आठवले, ज्या जेवणाच्या वेळी तू म्हणालास, तसे पेट्रोलचे जास्त चांगले गुण व पोटॅशियम सायनाईडचा धोका आणि गरज नसणे माझ्या लक्षात आले.”

“चालू ठेव.”

“मला अजून काही माहिती होते. मी क्लॅउड लँगटॉन व मॉली डीन यांना एकत्र पाहिले. पण त्याना वाटत होते, की त्यांना कुणी पाहिले नाही. मला माहित नाही की त्याना वेगळे व्हायला लावणारे, व तिला तुझ्या बाहुपाशात पाडणारे, त्यांचे काय प्रेमाचे भांडण होते, पण माझ्या लक्षात आले की गैरसमज दूर झालेला आहे आणि मिस डीन तिच्या पहिल्या प्रेमाकडे वळते आहे.”

“चालू ठेव.”

“माझ्या मित्रा, मला अजून काहीतरी माहिती आहे. मी हार्ले रस्त्यावर होतो. मी तुला विशिष्ट डॉक्टरच्या घरातून बाहेर पडतांना पाहिले. मला तो डॉक्टर माहिती आहे व कुठल्या कारणासाठी लोक त्याचा सल्ला घ्यायला जातात, तेदेखील माहिती आहे. मी तुझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहिले. मी हे माझ्या आयुष्यात फक्त एकदोन वेळा पाहिले. तो मृत्यूच्या छायेत वावरणाऱ्या माणसाचा चेहरा होता. माझे बरोबर आहे ना? की नाही?”

“बरोबर आहे.”

“त्याने मला अजून दोन महिने आयुष्य असल्याचे सांगितले आहे.“

“माझ्या मित्रा, तू मला भेटला नाहीस. कारण तुला इतर गोष्टींबद्दल विचार करायचा होता. मला तुझ्या चेहऱ्यावर वेगळेच काही दिसले --- मी तुला आज दुपारी जे सांगितले व लोक जे लपवायला बघतात, ते. मी तिथे

द्वेष पाहिला. माझ्या मित्रा, तू तो लपवण्याचा प्रयत्न केला नाहीस, कारण तुला वाटले, की कोणी बघत नाही आहे.”

हॅरीसन म्हणाला, “चालू ठेव.”

“अजून सांगण्यासारखे विशेष काही नाही. मी इथे आलो. तुला सांगितल्याप्रमाणे अपघाताने विषाच्या पुस्तकात लँगटॉनचे नाव पाहिले. त्याला भेटलो आणि तुझ्याकडे आलो. तुझ्यासाठी मी सापळे लावले. तू लँगटॉनला सायनाइड आणायला सांगितल्याचे तू कबूल केले नाहीस किंवा तू आश्चर्य व्यक्त केलेस. मी आल्यावर, पहिल्यांदा तू अवाक् झालास. पण नंतर तुझ्या लक्षात आले की हे कसे बरोबर जमून येईल. आणि मग तू मला संशय घेण्यासाठी उत्तेजन दिलेस. मला स्वतः लँगटॉनकडूनच समजले होते, की तो साडेआठला येणार आहे. तू मला नऊची वेळ सांगितलीस, जेणेकरून मी येईपर्यंत सगळे संपलेले असेल. तर असे मला सर्व काही माहिती आहे.”

हॅरीसन ओरडला, “तू का आला आहेस? जर तू आला नसतास, तर!”

पायरोने स्वतःला सावरले. तो म्हणाला, “मी तुला सांगितले होते, खून हा माझा व्यवसाय आहे.”

“खून? तुला आत्महत्या म्हणायचे आहे.”

पायरोचा आवाज स्पष्टपणे व जोरात आला, “नाही. मला खूनच म्हणायचे आहे. तुझा मृत्यू झटपट व सहज होणार होता, पण तू लँगटॉनला मारायचा केलेला बेत मात्र माणूस जितक्या वाईट पद्धतीने मरू शकेल, तितका वाईट होता. त्याने विष आणले. तो तुला भेटायला आला. तो तुझ्याबरोबर एकटाच होता. तू अचानक मेलास आणि आणि तुझ्या पेल्यात सायनाइड सापडले. त्यामुळे क्लॅउड लँगटॉन फाशी गेला. असा तुझा बेत होता.”

पुन्हा हॅरीसन कण्हला.

“तू का आलास? “तू का आलास?”

“मी तुला सांगितले. पण अजून एक कारण आहे. मला तू आवडतोस. माझ्या मित्रा, ऐक, तू मरणार होतास. तू प्रेम केलेली मुलगी तू गमावली होतीस. पण एक गोष्ट तुझ्याकडे होती. तू खुनी नव्हतास. आता मला सांग मी आलेले तुला आवडले, की नाही?

क्षणभराच्या शांततेनतर हॅरीसनने स्वतःला सावरले. त्याच्या चेहऱ्यावर नवीन तकाकी आली --- त्याने स्वतःच्या स्वार्थावर, भित्रेपणावर विजय मिळवला होता. त्याने टेबलावरून त्याचा हात पुढे केला.

तो ओरडला, “बरे झाले, तू आलास. तू आलास, म्हणून मी आभारी आहे.”.

***समाप्त***

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*












डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके






ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)






*Agatha Christrie*
















डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE
SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**डॉ. वृषाली जोशी यांचे हे चौतिसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३७),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२१), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(८), श्याम कुलकर्णी(६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(१२) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।